म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २२५२

२९३

REFBK-0020242
REFBK-0020242

अवाप्ति 22512

वा।१०८२।

२२५१२

क्र. २९३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20242

# आनंद-गीत

## भाग तिसरा

REFBK-0020242

आनंदराव कृष्णाजी टेकाडे

कृत

## इतर पुस्तकें

| | |
|---|---|
| आनंद-गीत ( भाग पहिला, दुसरी आवृत्ति). ... ... | सव्वा रुपया |
| आनंद-गीत ( भाग दुसरा ). ... ... ... | सव्वा रुपया |
| संगीत मधुरमीलन नाटक ... ... ... ... | एक रुपया |
| संगीत मधुरा नाटक ( कंसवध ) ... ... ... | एक रुपया |
| संगीत मधुरा नाटकाची पद्यावली. ... ... ... | दोन आणे |

## खालील ठिकाणीं विकत मिळतील

१ महाराष्ट्र कचेरी, नागपूर शहर.

२ एस्. आर्. देशपांडे बुकसेलर्स, नमूना, उमरावती ( वऱ्हाड )

३ कर्मवीर बुक डिपो, महाल, नागपूरशहर.

**४ परचुरे पुराणिक आणि मंडळी, माधवबाग-मुंबई ४**



"वाजीव रे मुरारी"

All rights strictly reserved.

# आनंद-गीत

## [ भाग तिसरा ]

आनंदराव कृष्णाजी टेकाडे

आवृत्ति पहिली

१९२८

किंमत सव्वा रुपया

मुद्रकः—

**दामोदर रघुनाथ मित्र,**

मनोरंजन छापखाना,

गिरगांव—मुंबई.

[ या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. ]

प्रकाशकः—

**आनंदराव कृष्णाजी टेकाडे,**

गडकरी यांचा वाडा,

महाल—नागपूर शहर.

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | | पान | कवितेचें नांव | | पान |
|---|---|---|---|---|---|
| | पुरस्कार | ७–८ | ६० | चांदण्यांची मौज | १०९ |
| | प्रस्तावना | ९–२५ | १४ | जगाचा आनंद | २६ |
| ३५ | श्रीतिलक–स्मृति | ६१ | ६२ | जन्मोत्सव | ११२ |
| २५ | श्रीशारदावंदन | ४३ | ९४ | जयोस्तु तिलकस्य | १६९ |
| ९ | अरुणास | १६ | ३० | जागृति | ५३ |
| १२ | अपुरें चित्र | २३ | ८७ | झोला | १५८ |
| ९२ | अभिनंदन | १६७ | ७८ | टणत्कार | १४१ |
| ८८ | आनंदाचें साम्राज्य | १६३ | ४२ | तुझ्यासाठीं | ७५ |
| २२ | आरसा | ३५ | ६४ | तो कोण | ११६ |
| ४६ | ईश्वरी चीज | ८४ | ५५ | दर्शनयोग | ९९ |
| ६६ | उचित ही करणी | १२१ | ६१ | दिव्य लेखक | ११० |
| ५० | उद्गार | ९१ | २० | देशद्रोही | ३२ |
| ८६ | कलदार | १५६ | १३ | देशबंधूचा स्वर्गवास | २४ |
| ९१ | कविबाला | १६६ | ८१ | धन्यता | १४६ |
| ३८ | "कहां राजा भोज" | ६६ | २४ | ध्यास | ४२ |
| ४ | कोण जिंकणार | ५ | ८० | नव भारतास | १४३ |
| ९० | खरें काय | १६५ | १९ | नवल | ३१ |
| २८ | खुळा चांदोबा | ४७ | ५६ | नवस | १०१ |
| ३३ | खेळकर मुलास | ५७ | ४० | नादावली | ७१ |
| १० | गडी मावळा | १८ | ७४ | निवेदक | १३४ |
| ४७ | गीत शारदा | ८६ | ८५ | निर्झर | १५४ |
| ४९ | गंगायमुना | ८९ | ६३ | प्रबोधन | ११४ |
| ५४ | चमेली | ९७ | २९ | फुलांचें संमेलन | ४९ |
| ९५ | चंद्रग्रहण | १७१ | ७ | बघसि कशाला नभाकडे | १२ |
| १८ | चांदणी | ३० | ५९ | बालशिवाजी | १०६ |

## अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पान | कवितेचें नांव | पान |
|---|---|---|---|
| ७३ बिचारा अक्रूर | १३२ | ७५ वात्सल्य | १३५ |
| ४५ बंडखोर | ८१ | ६५ विकल्पविमोचन | ११८ |
| ८४ भाव-गीत | १५१ | ६८ विरोधाभास | १२५ |
| ५७ भाविक | १०३ | २७ वीराची बडबड | ४४ |
| ७१ भाविका | १२८ | ८ वेणुनाद | १४ |
| ६ मग बोल | ११ | २३ वैचित्र्य | ४० |
| ५२ मधुर यामिनी | ९३ | ७० शारदेचा फुलबाग | १२७ |
| ५ माझा महाराष्ट्र | ८ | ८३ शिलेदार | १४९ |
| ६७ माणिक मोती | १२४ | ९६ शेवटचें मागणें | १७२ |
| १५ माधुरी | २७ | ४८ श्यामसुंदर | ८७ |
| ४१ मानिनी | ७२ | ८९ सती | १६४ |
| ४४ मारुतास | ७९ | ९३ सदा मंगलम् | १६८ |
| २ मुरलीवाला | २ | ५१ सनातन धर्म | ९२ |
| २१ याचना | ३४ | ११ सर्वथा | २१ |
| ३ ये, गोपाळा ये | ४ | ७९ साधु कीं जादुगार | १४२ |
| ७७ राघो भरारी | १३८ | ३९ सुमना डोल रे | ७१ |
| ३२ राज्याभिषेक | ५६ | ५३ सूर्यास्त | ९५ |
| ३७ ललितसंगम | ६४ | ३१ संग्राम | ५५ |
| ७२ लहाना बाळ | १३० | ८२ स्वतंत्र भारत | १४८ |
| ७६ लीलावती | १३६ | २६ स्वयमेव | ४४ |
| १६ लीलाविलास | २८ | १७ स्नेहसंयोग | २९ |
| ६९ लीलासंगम | १२६ | ३६ हरि-स्मरण | ६२ |
| ५८ वसंत-कोकिल | १०४ | १ हा कोण | १ |
| ४३ वाजीव रे मुरारी | ७७ | ३४ हृदयपुष्प | ५९ |
| | | आमचा देश | १७५ |

# पुरस्कार.

**आनंद-गीताचा तिसरा भाग** परमेश्वरकृपेनें महाराष्ट्र रसिक वाचकांना आज आदरपूर्वक सादर करीत आहे. त्याचा पहिल्या दोन भागाप्रमाणेंच आनंद-गीताचे प्रेमी वाचक प्रेमानें आणि आनंदानें स्वीकार करतील अशी दृढ आशा आहे.

या तिसऱ्या भागांतील बहुतेक कविता विविधज्ञानविस्तार, चित्रमयजगत्, मनोरंजन, आनंद, काव्यरत्नावलि, मुलांचें मासिक, मधुकर, लोकमित्र, आत्मबोध, वऱ्हाडशाळापत्रक, रत्नाकर, सुबोधमाला, गोधन, मातृभूमि, मनोहरमाला, खेळगडी, अरुणमाला, स्फूर्ति, तत्त्वज्ञानमंदिर, श्रीटिळकमहाविद्यालय, वगैरे मासिक त्रैमासिकांनीं आणि दैनिक लोकमान्य, केसरी, महाराष्ट्र, प्रजापक्ष, विविधवृत्त, सचित्र करमणूक, बालवसंत, टणत्कार, श्रीशिवाजी इत्यादि वृत्तपत्रांनीं अगोदरच वाचकांना वाचावयास दिल्या आहेत. तेव्हां या सर्व संपादकांचें आणि चालकांचें मनःपूर्वक आभार मानणें योग्य आहे. त्याचप्रमाणें प्रस्तुत भागांतील कवितांसंबंधानें ज्या ज्या माझ्या स्नेह्यांनीं सूचना केल्या त्यांचेहि कृतज्ञतापूर्वक उपकार स्मरणें माझें कर्तव्य होय.

या भागांतील राधाकृष्णाचें दर्शनीं चित्र मूळचें मातीचें आहे. लखनौ येथें मातीचीं अत्यंत सुंदर चित्रें तयार होतात. अशा चित्रांपैकीं या एका मनोहर चित्राचें छायाचित्र, लखनौला सांप्रत असलेले माझे शालक प्रोफेसर गदाधरपंत भाके एम्. एस्. सी. एल्‌एल् बी. यांनीं मला मिळवून दिलें. प्रोफेसरांचा जरी इनकार असला किंवा उपकाराची भाषा माझ्या बाबतींत जरी त्यांनां मनापासून नको असली तरी त्यांच्या नकळत माझ्या वाचकांना मी सांगतों, कीं याबद्दल प्रोफेसरांचा मी फार ऋणी आहे. तसेंच दुसरें चित्र जयपूरला तयार झालेल्या सुंदर मूर्तीचें आहे. तिचें छायाचित्र नागपूरचे आर्टिस्ट रा. भो. वा. आठवले यांनीं कृपा करून मला दिल्याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें. त्याचप्रमाणें दे. भ. माधवरावजी अणे यांचें ताजें छायाचित्र देऊन यवतमाळच्या 'वगारे आर्ट ग्यालरी'चे मालक रा. वगारे आर्टिस्ट यांनींहि मला उपकृत केलें आहे.

'नवा काळ' पत्राच्या व्यवस्थापकांनीं चित्रें आणि फोटो यांचे ब्लॉक्स आपल्या कारखान्यांतून सुंदर आणि सुबकरीतीनें तावडतोव तयार करून दिले याबद्दल त्यांचेहि आभार मानावे तितके थोडेच आहेत.

प्रस्तुत **आनंद–गीता** चा भाग दुसऱ्या भागाप्रमाणेंच मनोरंजन छापखान्यानें, छापखान्यांत कामाची अतिशय गर्दी असतांही शक्य तितक्या लवकर छापून दिला; या बाबतींत मनोरंजन छापखान्याचे चालक रा. दामुअण्णा मित्र, म्यानेजर रा. गोळे आणि छापखान्यांतील हुषार व मेहनती हेड फोरमन रा. कांदे यांनीं स्वतःचेंच काम समजून फार परिश्रम घेतले. इतर व्यवसायाचा पाठीमागें सारखा व्याप असतां पुस्तकाचीं प्रुफें, मनोरंजन आणि नवयुग या मासिकांचे माजी संपादक आणि माझे स्नेही रा. आप्पासाहेब नाडकर्णी यांनीं काळजीपूर्वक आपलेपणानें तपासून दिलीं याबद्दल या सर्वांचे आभार मीच मनापासून मानतों असें नाहीं तर पुस्तकाचें चित्ताकर्षक स्वरूप पाहिल्यावर वाचकहि तितकाच त्यांच्याविषयीं निःसंशय आदर दाखवितील

माझा कल्पवृक्ष कालपुरुषानें हरण करून नेल्यानंतर ज्याच्या जोपासनेनें **आनंद-गीताचीं दोन फुलें** बहरलीं आणि जो मला उन्हाची तिरीप सुद्धां लागूं नये ह्मणून सदैव काळजी वहातो त्या माझे दादा (ती. स्व. शंकरराव टेकाडे) यांचे चरणीं माझे शतशः प्रणाम असोत.

अखेरीस, आनंद–गीताच्या तिसऱ्या भागानें ज्याच्या कृपाप्रसादानें आजचा हा दिवस अवलोकन केला त्या दयाघन प्रभूच्या पदकमलीं अनन्यभावानें अभिवादन करून असलेल्या लोभाची अभिवृद्धि व्हावी अशी वाचकांना प्रार्थना करितों आणि ह्या पुरस्कार संपवितो.

गडकरी यांचा वाडा,<br>महाल, नागपूर शहर.<br>ता. १७ जुलै १९२८.

**आनंदराव कृष्णाजी टेकाडे.**

**टीपः**—१२५ व्या पानावरील 'पवसासंगें' या ऐवजीं 'पवनासंगें' शब्द पाहिजे.

वा०२१
२२५२

## आनंद-गीताचे प्रस्तावनाकार



**दे. भ. माधवरावजी अणे,** ले० असेंब्लीचे सभासद.
( ग्वाल्हेरच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष )

# प्रस्तावना

देशांत कोणत्याही । कवि-काव्य जन्म घेई ।
परिणाम मात्र साचा । आनंद तो जगाचा ॥

—आनंदगीत, भा. ३ पा. २६.

**आनंदगीता**चा हा **तृतीय खण्ड** आज महाराष्ट्रांतील काव्यप्रेमी वाचकांच्या भेटीस सादर करण्यांत येत आहे. महाराष्ट्रांतील रसिक वाचकवर्गानें पूर्वी प्रसिद्ध झालेल्या दोन खंडांचें ज्या प्रेमानें स्वागत केलें, त्याच प्रेमानें या खंडाचेंहि स्वागत ते करतील असा माझा दृढविश्वास आहे. हा तिसरा खंड लौकरच प्रसिद्ध होणार अशी जाहिरात कांहीं महिन्यांपूर्वी एका सुप्रसिद्ध मराठी मासिकांत प्रसिद्ध झाल्यानंतर थोडक्याच अवधींत आनंदरावजींकडे पुस्तकें पाठविण्याकरितां अनेक वाचकांकडून पत्रें आलीं. यावरून देखील आनंदरावांच्या कवितेवर महाराष्ट्रांतील रसिक वाचक किती लुब्ध झाले आहेत याचा अजमास करतां येण्यासारखा आहे.

आनंदगीताचा पहिला खंड बाहेर पडून सरासरी नऊ वर्षे झालीं. या अवधींत पहिल्या खंडाच्या प्रत्येकीं दोन हजार प्रतींच्या दोन आवृत्त्या व दुसऱ्या खंडाचीहि तितक्याच प्रतींची पहिली आवृत्ति पार खपून गेली, आणि तिसऱ्या खंडाच्या प्रसिद्धीची जाहिरात फडकण्यावरोबर पुस्तकावर मागणीच्या उड्या पडावयास लागल्या आहेत यावरून आनंदरावजी हे महाराष्ट्रांतील एक अत्यंत लोकप्रिय कवि आहेत हें सहज दिसून येईल. आनंदरावांच्या कवितेनें संपादन केलेल्या लोकप्रियतेचें निदर्शक ह्मणून आणखीहि एक गोष्ट नमूद करावीशी वाटतें. गेल्या आठ नऊ वर्षांत महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें व मासिकें यांनां विशेषाङ्क काढण्याचे प्रसंग जेव्हां जेव्हां आले तेव्हां तेव्हां प्रत्येकानें आनंदरावजींना एखादें तरी काव्य विशेषाङ्काकरितां पाठविण्याचा आग्रह केला आहे. व ज्या विशेषांकांत आनंदरावांचें काव्य प्रसिद्ध झालें आहे त्यांची समालोचना करणारांनीं बहुशः त्या अंकांतील आनंदरावांच्या कृतीसंबंधानें अनुकूल मत प्रदर्शित करून संतोष व्यक्त केलेला आहे.

हा खंड प्रसिद्ध झाला ह्मणजे सरासरीं ६५० पानांची कविता महाराष्ट्र-सरस्वतीचे सेवेस अर्पण केल्याचें श्रेय आनंदरावजींस मिळेल, व आनंदरावजींची कवि या नात्यानें काय योग्यता आहे हें ठरविण्याची पुरेशी सामग्री काव्यचिकित्सकांस उपलब्ध होईल. बहुतेक कवींच्या कृतीसंबंधानें समकालीन टीकाकारांत एकमत असल्याचें सहसा आढळून येत नाहीं, व हाच अनुभव आनंदगीतासंबंधानें आलेला आहे. पुष्कळांना आनंदगीतांतील बहुतेक पद्यें अत्यंत सरस वाटतात, तर एकादोघांना तीं नीरस वाटतात. आनंदराव हे आधुनिक कविमंडळांतील एक उच्च दर्जाचे कवि आहेत ह्मणून बऱ्याच व्यासंगी व मार्मिक काव्यचिकित्सकांनीं त्यांचे कृतीचा गौरव केलेला आहे; तर उलटपक्षीं कविमंडळांत प्रतिष्ठित स्थान संपादन करण्याची यत्किंचित् पात्रता आनंदरावजींच्या कृतींत नाहीं असें विधानहि एकदोन टीकाकारांनीं बिनधोक ठोकून दिलेलें आहे. पहिले दोन खंड प्रसिद्ध झाल्यानंतर "आनंदगीता" वर लहान मोठे परीक्षणात्मक लेख बहुतेक मराठी वृत्तपत्रें व मासिकें यांतून प्रसिद्ध झालेले आहेत त्या सर्वांचा संग्रह मला पहावयास मिळाला. त्यावरून जर कांहीं एखादी गोष्ट मला निश्चितपणें कळली असेल तर ती एवढीच कीं, काव्यप्रेमी व काव्यचिकित्सक ह्मणून नाणावलेल्या लेखकांतसुद्धां काव्यविषयक मूलभूत कल्पनांसंबंधीं एकवाक्यता नाहीं.

परंतु मला याबद्दल फारसा विस्मयहि वाटत नाहीं. कारण, मला जो थोडासा इंग्रजी व संस्कृत साहित्याच्या इतिहासाचा परिचय आहे त्यावरून असें दिसून येतें कीं समकालीन कविकृतीचें परीक्षण करतांना असला कल्पनांचा गोंधळ महाराष्ट्रीय टीकाकारांतच तेवढा प्रथमतःच दृष्टीस पडतो असें नसून इतरत्रहि तो थोड्याबहुत प्रमाणांत दृग्गोचर होत आलेला आहे. टीकाकारांत प्राचीन सर्वमान्य कवींसंबंधानें मतवैचित्र्य दृष्टीस न पडण्याचें एक कारण असें आहे कीं त्या कवींच्या योग्यतेविषयींच्या कल्पनांचें बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळालें असतें. यास्तव त्यांच्या कृतीचें परीक्षण करतेवेळीं देखील टीकाकार या पूर्वग्रहापासून पूर्णपणें अलिप्त होऊं शकत नाहीं. उलट, या पूर्वग्रहास पोषक अशीच त्याची वृत्ति परीक्षणसमयीं असते, व त्यामुळेंच प्रत्येक नवीन टीकाकार असल्या सर्वमान्य कवींच्या कृतींतील आजतागायत अनुपलब्ध असलेला एखाद दुसरा गुण शोधून काढण्याच्या प्रयत्नांत प्रायशः गुंतलेला असतो, व असा शोध

त्याला लावतां आला तर त्याला मोठी कृतार्थता वाटत असते, परंतु आधुनिक कवीसंबंधानें त्याला आपलें मत ठरवितांना आनुवंशिक किंवा आनुसांप्रदायिक संस्कारांची मुळींच मदत होत नाहीं. येथें सर्व मदार त्याच्या वैय्यक्तिक रुचीवर व प्रकृतीवरच अवलंबून असते व यामुळेंच रुचिवैचित्र्यानुसार मतभेद उत्पन्न होतात. धर्मकीर्ति या प्रसिद्ध बौद्ध ग्रंथकारानें प्राचीन व प्रतिष्ठित कवींविषयीं टीकाकारांत दिसून येणाऱ्या पक्षपातित्वाचें आणि समकालीन कविकृतिविषयक दोषदृष्टीचें खालील पद्यांत मोठें मार्मिक वर्णन केलें आहेः—

**शैलैर्बन्धयति स्म वानरहृतैर्वाल्मीकिरम्बोनिधिम्**
**व्यासः पार्थशरैस्तथापि न तयोरत्युक्तिरुद्भाव्यते ॥**
**वागर्थौ च तुलाधृताविव तथाप्यस्मत्प्रबंधानयम् ।**
**लोको दूषयति प्रसारितमुखस्तुभ्यं प्रतिष्ठे! नमः ॥**

"वाल्मीकि वानरांनीं आणलेल्या शिळांनीं महोदधीवर सेतु बांधतात! तर व्यास अर्जुनाच्या बाणांनींच सेतु रचतात! पण त्यावर कोणी "अत्युक्ती"चा दोषारोप करीत नाहीं. माझ्या काव्यांत शब्द व अर्थ एखाद्या तराजूंत तोलून घेतल्याप्रमाणें विचारपूर्वक योजलेले आहेत, तथापि या माझ्या कृतीची लोक अगदीं आ पसरून मुक्तकंठानें निंदा करितात! प्रतिष्ठे! तुला माझा नमस्कार असो!!"

वरील उदाहरण हें समकालीन ग्रंथकर्त्यासंबंधानें टीकाकारांची दृष्टि प्रायशः कशी कलुषित असते याचें दर्शक आहे. ज्या नूतन ग्रंथकाराला अजून प्रतिष्ठा प्राप्त व्हावयाची असते, त्यावर टीकाकार बुद्धिपुरस्सर कलुषित दृष्टीनेंच आपलें टीकास्त्र चालवीत असतो असा माझ्या लिहिण्याचा आशय नाहीं, दोन प्रामाणिक तज्ज्ञांतहि एखाद्या काव्याच्या उत्कृष्टतेसंबंधीं तीव्र मतभेद असल्याचें बरेच वेळां आढळून येतें. अप्पय्या दीक्षित, मम्मट व जगन्नाथ पंडित हीं नांवें संस्कृत साहित्यशास्त्रकोविदांच्या पूर्ण परिचयाचीं आहेत. यांपैकीं प्रत्येकानें साहित्यशास्त्रावर सर्वमान्य असे ग्रंथ लिहिलेले आहेत व आजमित्तीसहि त्या शास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी वरील पंडितत्रयीच्या ग्रंथांचें परिश्रमपूर्वक परिशीलन करितात. तथापि या पंडितांत "काव्या"चे व्याख्येसंबंधानें तर एकवाक्यता नाहींच, पण विशिष्ट पद्य हें उत्तम काव्य आहे कीं नाहीं यासंबंधानें देखील क्वचितच एकवाक्यता झालेली आढळून येते.

हा खंड प्रसिद्ध झाला ह्मणजे सरासरीं ६५० पानांची कविता महाराष्ट्र-सरस्वतीचे सेवेस अर्पण केल्याचें श्रेय आनंदरावजींस मिळेल, व आनंदरावजींची कवि या नात्यानें काय योग्यता आहे हें ठरविण्याची पुरेशी सामग्री काव्यचिकित्सकांस उपलब्ध होईल. बहुतेक कवींच्या कृतीसंबंधानें समकालीन टीकाकारांत एकमत असल्याचें सहसा आढळून येत नाहीं, व हाच अनुभव आनंदगीतासंबंधानें आलेला आहे. पुष्कळांना आनंदगीतांतील बहुतेक पद्यें अत्यंत सरस वाटतात, तर एकादोघांना तीं नीरस वाटतात. आनंदराव हे आधुनिक कविमंडळांतील एक उच्च दर्जाचे कवि आहेत ह्मणून बऱ्याच व्यासंगी व मार्मिक काव्यचिकित्सकांनीं त्यांचे कृतीचा गौरव केलेला आहे; तर उलटपक्षीं कविमंडळांत प्रतिष्ठित स्थान संपादन करण्याची यत्किंचित् पात्रता आनंदरावजींच्या कृतींत नाहीं असें विधानहि एकदोन टीकाकारांनीं बिनधोक ठोकून दिलेलें आहे. पहिले दोन खंड प्रसिद्ध झाल्यानंतर " आनंदगीता " वर लहान मोठे परीक्षणात्मक लेख बहुतेक मराठी वृत्तपत्रें व मासिकें यांतून प्रसिद्ध झालेले आहेत त्या सर्वांचा संग्रह मला पहावयास मिळाला. त्यावरून जर कांहीं एखादी गोष्ट मला निश्चितपणें कळली असेल तर ती एवढीच कीं, काव्यप्रेमी व काव्यचिकित्सक ह्मणून नाणावलेल्या लेखकांतसुद्धां काव्यविषयक मूलभूत कल्पनांसंबंधीं एकवाक्यता नाहीं.

परंतु मला याबद्दल फारसा विस्मयहि वाटत नाहीं. कारण, मला जो थोडासा इंग्रजी व संस्कृत साहित्याच्या इतिहासाचा परिचय आहे त्यावरून असें दिसून येतें कीं समकालीन कविकृतीचें परीक्षण करतांना असला कल्पनांचा गोंधळ महाराष्ट्रीय टीकाकारांतच तेवढा प्रथमतःच दृष्टीस पडतो असें नसून इतरत्रहि तो थोड्याबहुत प्रमाणांत दृग्गोचर होत आलेला आहे. टीकाकारांत प्राचीन सर्वमान्य कवींसंबंधानें मतवैचित्र्य दृष्टीस न पडण्याचें एक कारण असें आहे कीं त्या कवींच्या योग्यतेविषयींच्या कल्पनांचें बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळालें असतें. यास्तव त्यांच्या कृतीचें परीक्षण करतेवेळीं देखील टीकाकार या पूर्वग्रहापासून पूर्णपणें अलिप्त होऊं शकत नाहीं. उलट, या पूर्वग्रहास पोषक अशीच त्याची वृत्ति परीक्षणसमयीं असते, व त्यामुळेंच प्रत्येक नवीन टीकाकार असल्या सर्वमान्य कवींच्या कृतींतील आजतागायत अनुपलब्ध असलेला एखाद दुसरा गुण शोधून काढण्याच्या प्रयत्नांत प्रायशः गुंतलेला असतो, व असा शोध

त्याला लावतां आला तर त्याला मोठी कृतार्थता वाटत असते, परंतु आधुनिक कवीसंबंधानें त्याला आपलें मत ठरवितांना आनुवंशिक किंवा आनुसांप्रदायिक संस्कारांची मुळींच मदत होत नाहीं. येथें सर्व मदार त्याच्या वैय्यक्तिक रुचीवर व प्रकृतीवरच अवलंबून असते व यामुळेंच रुचिवैचित्र्यानुसार मतभेद उत्पन्न होतात. धर्मकीर्ति या प्रसिद्ध बौद्ध ग्रंथकारानें प्राचीन व प्रतिष्ठित कवींविषयीं टीकाकारांत दिसून येणाऱ्या पक्षपातित्वाचें आणि समकालीन कविकृतिविषयक दोषदृष्टीचें खालील पद्यांत मोठें मार्मिक वर्णन केलें आहेः—

**शैलैर्बन्धयति स्म वानरहृतैर्वाल्मीकिरम्भोनिधिम्**
**व्यासः पार्थशरैस्तथापि न तयोरत्युक्तिरुद्भाव्यते ॥**
**वागर्थौ च तुलाधृताविव तथाप्यस्मत्प्रबंधानयम् ।**
**लोको दूषयति प्रसारितमुखस्तुभ्यं प्रतिष्ठे! नमः ॥**

"वाल्मीकि वानरांनीं आणलेल्या शिळांनीं महोदधीवर सेतु बांधतात! तर व्यास अर्जुनाच्या बाणांनींच सेतु रचतात! पण त्यावर कोणी "अत्युक्ती"चा दोषारोप करीत नाहीं. माझ्या काव्यांत शब्द व अर्थ एखाद्या तराजूंत तोलून घेतल्याप्रमाणें विचारपूर्वक योजलेले आहेत, तथापि या माझ्या कृतीची लोक अगदीं आ पसरून मुक्तकंठानें निंदा करितात! प्रतिष्ठे! तुला माझा नमस्कार असो!!"

वरील उदाहरण हें समकालीन ग्रंथकर्त्यासंबंधानें टीकाकारांची दृष्टि प्रायशः कशी कलुषित असते याचें दर्शक आहे. ज्या नूतन ग्रंथकाराला अजून प्रतिष्ठा प्राप्त व्हावयाची असते, त्यावर टीकाकार बुद्धिपुरस्सर कलुषित दृष्टीनेंच आपलें टीकास्त्र चालवीत असतो असा माझ्या लिहिण्याचा आशय नाहीं, दोन प्रामाणिक तज्ज्ञांतहि एखाद्या काव्याच्या उत्कृष्टतेसंबंधीं तीव्र मतभेद असल्याचें वरेच वेळां आढळून येतें. अप्पय्या दीक्षित, मम्मट व जगन्नाथ पंडित हीं नांवें संस्कृत साहित्यशास्त्रकोविदांच्या पूर्ण परिचयाचीं आहेत. यांपैकीं प्रत्येकानें साहित्यशास्त्रावर सर्वमान्य असे ग्रंथ लिहिलेले आहेत व आजमित्तीसहि त्या शास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी वरील पंडितत्रयीच्या ग्रंथांचें परिश्रमपूर्वक परिशीलन करितात. तथापि या पंडितांत "काव्या"चे व्याख्येसंबंधानें तर एकवाक्यता नाहींच, पण विशिष्ट पद्य हें उत्तम काव्य आहे कीं नाहीं यासंबंधानें देखील क्वचितच एकवाक्यता झालेली आढळून येते.

अपय्या दीक्षितांनीं चित्रमीमांसेंत ध्वनिकाव्याचें उदाहरण ह्मणून "**निःशेषच्युतचंदनं स्तनतटं निर्मृष्टरागोऽधरः**" हा श्लोक उद्धृत केला आहे, व त्यावर विस्तृत व्याख्यान करून त्यांतील "**वापीं स्नातुमितो गतासि न पुनस्तस्याधमस्यान्तिकम्**" या अंतिम चरणांतील प्रतिषेधरूप वचनांतून "**तस्याधमस्यान्तिकम् गतासि**" हा विधिरूप ध्वनि कसा निघतो हें दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मम्मटांनींहि आपल्या काव्यप्रकाशांत प्रतिषेधे विधिरूप वस्तुध्वनीच्या उदाहरणार्थ हा श्लोक दिलेला आहे. परंतु जगन्नाथ पंडितांनीं आपल्या रसगंगाधर नामक ग्रंथांत अपय्यादीक्षितांच्या वरील श्लोकाच्या व्याख्यानावर कडक टीका करून शेवटीं "**तदेतत्अलंकारशास्त्र तत्त्वानवबोधनिबंधनम् । प्राचीनसकलग्रंथविरुद्धत्वादुपपत्तिविरोधाच्च**" असा आपला अखेरचा अभिप्राय नमूद केला आहे. त्याचप्रमाणें आणखीहि विशिष्ट पद्यांच्या उत्कृष्टतेसंबंधीं मतभेद दर्शविणारीं उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत.

कित्येक अर्वाचीन लेखकांनीं पंडितरायांवर परोत्कर्षासहिष्णुता व पाण्डित्याभिनिवेश या दोषांचा आरोप करून जगन्नाथपंडितांच्या रचनेस व ठिकठिकाणीं त्यांनीं दर्शविलेल्या विरोधास गौणत्व देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु माझ्या मतानें हे दोष पंडितरायांच्या ठिकाणीं होते असें क्षणभर गृहीत धरलें तरी वरील विरोधाची योग्य मीमांसा तेवढ्यामुळें होऊं शकत नाहीं. 'काव्यस्वरूपा'संबंधीं संस्कृत साहित्यवेत्त्यांत फार प्राचीन कालापासून भिन्न भिन्न कल्पना होत्या. रस, अलंकार, रीति व ध्वनि यांपैकीं काव्यांत प्रधानगुण कोणता समजण्यांत यावा एतद्विषयक प्रायशः दुर्बोध वाटणाऱ्या वादविवादांनीं साहित्यशास्त्रावरील प्रमाण ग्रंथ व सर्वमान्य टीका खचून भरलेल्या दृष्टीस पडतात. साहित्यशास्त्रावरील लेखक हा यांपैकीं कोणत्यातरी एका मताचा अथवा तत्त्वाचा पुरस्कार करून इतर तत्त्वें हीं आनुषंगिक म्हणून प्रतिपादण्याचा प्रयत्न करीत असतो, यामुळेंच विशिष्ट पद्याकडे किंवा काव्याकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टि दुसऱ्याहून भिन्न असल्याचें आढळून येतें. त्या सर्वांचा समन्वय करून काव्याची व्यापक कल्पना पुढें मांडणारा ग्रंथकार संस्कृत साहित्यांत झाला नाहीं. त्यामुळें मतभेद व कल्पनांचा कोलाहल यांस पुष्कळच अवसर राहिलेला आहे. त्यांतल्या त्यांत जगन्नाथपंडितांनीं 'रसगंगाधरां'त **रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्**

हें जें काव्याचें लक्षण निरूपित केलेलें आहे तेंच इतर ग्रंथकर्त्यांनीं दिलेल्या व्याख्येपेक्षां अधिक व्यापक आहे असें ह्मणावें लागतें. या व्याख्येनेंहि व्यक्तिगत मतभेदाला जागा रहात नाहीं असें विधान करणें धाडसाचें होईल. कारण कोणता अर्थ रमणीय समजावा याविषयीं समंजस व अधीत व्यक्तींत मतभेद होऊं शकेल. लोकोत्तराल्हादजनक ज्ञान हें रमणीयतेचें गमक आहे ही पंडितरायांची व्याख्या जरी मान्य केली तरी वरील मतभेदाचा पूर्ण परिहार होईल असें निश्चितपणें ह्मणतां येत नाहीं. तथापि, साहित्यदर्पणकारांनीं "**रसवदेव काव्यम्** " अशी जी एकांगीण व्याख्या केलेली आहे किंवा " **अदोषौ शब्दार्थौ सगुणाव-नलंकृतौ पुनः क्वापि** " हें जें अलंकारांना सर्वस्वीं गौणत्व देणारें काव्याचें स्वरूप मम्मटानें काव्यप्रकाशांतून वर्णिलेलें आहे, त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आपत्तीचें निराकरण करण्याचा जगन्नाथपंडितांनीं काव्यलक्षण निश्चित करतांना मोठ्या कुशाग्रबुद्धीनें प्रयत्न केलेला आहे, हें प्रत्येक मार्मिक साहित्यभक्तास मान्य करावें लागेल.

जगन्नाथपंडितांच्या काव्यलक्षणाचें स्वारस्य समजण्याकरितां त्यांतील " लोकोत्तराल्हाद " या शब्दाचें थोडेंसें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. मराठींत लोकोत्तर शब्दाचा अर्थ अलौकिक असा आहे. परंतु अलौकिक हा शब्द मराठींत पुष्कळदां 'अतिशय,' 'कल्पनातीत' इत्यादि अर्थांत योजला जातो. सामान्य मनुष्याच्या शक्तीबाहेर किंवा कल्पनेबाहेर एखादी गोष्ट घडली म्हणजे अलौकिक गोष्ट घडली असें त्या गोष्टीचें वर्णन करण्याचा परिपाठ आहे. परंतु जगन्नाथरायांना 'लोकोत्तर' शब्दाचा उपयोग फक्त एका विवक्षित अर्थानेंच या व्याख्येंत करावयाचा आहे हें त्यांनीं स्वतःच या शब्दाचें स्पष्टी-करण करण्याकरितां दिलेल्या उदाहरणावरून स्पष्ट होतें. प्रत्यक्ष व्यवहारांत एखाद्याला 'तुला पुत्र झाला' अशी हकीकत जर कोणी सांगितली किंवा 'तुला अमुक लॉटरींत एक लाख रुपये मिळाले ' अशी बातमी दिली तर जो आनंद होतो तो लौकिक आनंद किंवा आल्हाद. तसा आनंद व्यवहारांत उत्पन्न करणारीं जीं लक्षावधि वाक्यें व्यवहारांत बोलण्यांत अथवा ऐकण्यांत येतात त्यांची गणना काव्यांत करतां येत नाहीं, हें सुचविण्याकरितांच पंडितांनीं " लोकोत्तर आल्हाद " या शब्दसमुच्चयाचा उपयोग वरील वाक्यांत केला आहे. ज्या पद्यवाचनापासून आल्हाद उत्पन्न होत नाहीं तें काव्य नव्हे असें

अ-विधिरूप काव्यलक्षण केलें तर तें वाचकांस सहज समजेल. आतां असा आल्हाद पद्यांतील अर्थामुळें उत्पन्न झाला असेल तर तें श्रेष्ठ काव्य, आणि केवळ तो शब्दरचनेच्या माधुर्यानेंच उत्पन्न झाला असेल तर कनिष्ठ काव्य, असें स्थूलमानानें काव्याचें वर्गीकरण केल्यास वावगें होणार नाहीं.

कांहीं साहित्यशास्त्रवेत्त्यांचा कटाक्ष असा आहे कीं पद्याचे अर्थांतून साहित्यशास्त्रांत निर्दिष्ट अशा नऊ किंवा दहा रसांपैकीं एखाद्या तरी रसाचा अनुभव वाचकास तें पद्य वाचतांना येईल तरच तें पद्य काव्य या थोर पदवीस पात्र समजण्यांत यावें. साहित्यदर्पणकारानें "**रसवदेव काव्यम्**" म्हणून जें काव्यलक्षण दिलें आहे त्याचा अर्थ हाच आहे, व वर काव्य-प्रकाशकाराचें काव्यस्वरूपाचें विवेचन करणारें वचन उद्धृत केलें आहे तें सकृद्दर्शनीं जरी इतकें एकाङ्गी दिसत नसलें तरी त्यांनीं काव्यगुणांची व्याख्या करतांना "रसाश्रयत्व" हें त्याचें एकच लक्षण सांगून ठेवलेलें आहे, त्यावरून त्यांच्याहि विवेचनाचा कल "**रसात्मकं काव्यम्**" हीच व्याख्या मान्य करण्याकडे आहे असें दिसून येतें. अष्टमोल्लासांत त्यांनीं खालील श्लोकांत गुणालंकारविवेक व्यक्त केला आहे.

**ये रसस्यांगिनो धर्माः शौर्यादय इवात्मनः ।**
**उत्कर्षहेतवस्तेस्युरचलस्थितयो गुणाः ॥**

व त्यावरील विवेचनांत "**आत्मन एवहि यथा शौर्यादयोनाऽकारस्य तथा रसस्यैव माधुर्यादयो गुणा न वर्णानाम्**" असें स्पष्टपणें निर्दिष्ट केलें आहे. माणिक्यचंद्रानें आपल्या काव्यप्रकाशावरील "संकेत" नामक टीकेंत वरील विवेचनाचा सारांश "**रसाश्रया एव गुणा इत्यर्थः**" या शब्दांत दिलेला आहे. तेव्हां रसनिष्पत्तीच्या दृष्टीनेंच माधुर्यादि काव्यगुणांची किंमत काव्यप्रकाशकार लावतात हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांच्या मतांत आणि साहित्यदर्पणकारांच्या मतांत काव्यलक्षणासंबंधानें असल्यास फारच सूक्ष्म भेद आहे असेंच ह्मणणें प्राप्त होतें.

या व्याख्येमुळें जी मोठी आपत्ति उत्पन्न होते ती अशी कीं कालिदासादि श्रेष्ठ कवींच्या महाकाव्यांतील अनेक वर्णनें काव्यव्याख्येंतून वगळावीं लागतात. याच्या उलट दंडी आपल्या काव्यादर्शांत सर्गबंध महाकाव्याचें लक्षण देतांना लिहितात कीं,

नगरार्णवशैलर्तुचन्द्रार्कोदयवर्णनैः ।
उद्यानसलिलक्रीडामधुपानरतोत्सवैः ॥

ह्मणजे, नगर, सागर, पर्वत, ऋतु, चन्द्रसूर्यांचे उदयास्त, वगीचे, जलक्रीडा, मधुपान वगैरेचीं वर्णनें असल्या काव्यांतून असावींत. दंडी आपल्या "काव्यादर्शा"तून

पूर्वशास्त्राणि संहृत्य प्रयोगानुपलक्ष्य च ।
यथासामर्थ्यमस्माभिः क्रियते काव्यलक्षणम् ॥

अशी प्रतिज्ञा करितात.

यावरून महाकाव्यांतून असलीं वर्णनें देण्याचा संप्रदाय त्याच्याहि पूर्वी फार पुरातन काळापासून चालत आला असला पाहिजे हें उघड आहे.

रामायण, महाभारत कालिदासादि महाकविविरचित कुमारसंभवप्रभृति महाकाव्यें, कादंबरीप्रमुख गद्यकाव्यें, वेंकटाध्वरीप्रभृतिकविविरचित विश्वगुणादर्शादि चम्पूग्रंथ वगैरे सहस्रावधि ग्रंथांतून आढळून येणारे मनोहर नगरार्णव वर्णनाचे उल्लेख त्यांतून कोणत्याहि एका विवक्षित रसाचीं निष्पत्ति झालेली दिसत नाहीं, ह्मणूनच काव्यसंज्ञेतून त्याज्य मानावीं लागतील. हाच दोष पंडितरायांनीं खालील वचनांत प्रामुख्यानें दाखवून

"रसवदेव काव्यम्"

ही व्याख्या चिन्त्य आहे असें विधान केलेलें आहे.

**"यत्तु रसवदेव काव्यम् इति साहित्यदर्पणे निर्णीतम् तन्न । वस्त्वलंकारप्रधानानां काव्यानां अकाव्यत्वापत्तेः । न च इष्टापत्तिः महाकविसंप्रदायस्य अकुलीभावप्रसंगात् । तथा च जलप्रवाहवेगनिपतनोत्पतनभ्रमणानि कविभिर्वर्णितानि कपिबालादिविलसितानि च न तत्रापि यथाकथंचित्परम्परया रसस्पर्शोऽस्त्येव इति वाच्यम् । ईदृशरसस्पर्शस्य "गौश्चलति" "मृगो धावति" इत्यादौ अतिप्रसक्तत्वेन अप्रयोजकत्वाच्च ।**

"**रसवदेव काव्यम्**" या व्याख्येनें काव्याचें क्षेत्र अत्यंत संकुचित होतें. अर्थचमत्कृति किंवा शब्दचमत्कृति प्रकट करून सहृदय श्रोत्यांच्या अंतःकरणास आल्हादित करणारीं लक्षावधि सुभाषितें, अन्योक्ति व भर्तृहरिकृत नीतिशतकासारखी प्रासादिक कृति, किंवा विठोबाअण्णांच्या सुश्लोकराघवा-

सारखी श्रुतिमनोहर श्लिष्ट व अर्थगंभीर रचना, यांनां काव्यक्षेत्रांत थारा मिळणें-देखील कठीण आहे. परंतु या सर्वांचा आजपर्यंत जाड्या पंडितांनीं व लक्षावधि सहृदय श्रोत्यांनीं 'काव्य' ह्मणून सत्कार केला आहे. ही गोष्ट जर लक्षांत घेतली तर वरील काव्यक्षेत्राचा निष्कारण संकोच करणारी व्याख्या जुन्या संस्कृत काव्यभोक्त्यांसहि फारशी मान्य झाली नव्हती हें उघड दिसतें. ह्मणूनच जगन्नाथपंडितांची काव्याची व्याख्या हीच अधिक व्यापक व सर्वसंमत मानण्यास हरकत नाहीं.

आधुनिक महाराष्ट्र कविश्रेष्ठ 'केशवसुत' यांनीं कविप्रतिभा ही नियमित कक्षेंत नित्य परिभ्रमण करणाऱ्या नवग्रहांप्रमाणें बद्ध नसून यदृच्छेनें अखिल विश्वांत संचार करणाऱ्या आणि आपल्या प्रकाशानें व डौलदार पुच्छानें आकाश मार्ग व्यापून यच्चावत् जनतेचें चित्त आपणाकडे वेधून घेणाऱ्या धूमकेतूप्रमाणें स्वैरसंचारी आहे, अशी कल्पना करून कवि आणि धूमकेतु यांतील साधर्म्य वर्णन करणारें एक लहानसें गोड गीत रचिलें आहे. तेव्हां कवींचा हा स्वैर-संचार करण्याचा हव्यास व 'रसवदेव काव्यम्' ही संकुचित क्षेत्राचा निर्देश करणारी व्याख्या याचा मेळ बसविणें दुरापास्त आहे. 'रस' शब्दाची व्याप्ति नऊ किंवा दहा रसापुरतीच जर ठेवली नाहीं व तिच्यांत आल्हादजनक सर्व प्रकारांचा अंतर्भाव केला तर मात्र या व्याख्येनेंहि निभाव होण्यासारखा आहे. परंतु असें केलें असतां रस व अलंकार यांत साहित्यशास्त्रकारांनीं मानलेला भेद लुप्तप्राय होतो.

रस हाच काव्याचा आत्मा आहे असें प्रतिपादन करणाऱ्या साहित्यशास्त्र-कोविदांस उपरिनिर्दिष्ट आक्षेप माहीत नव्हते असें मात्र नाहीं. त्यांतून निभाव करण्याकरितांच अनेक 'कविसंकेत' निर्माण झाले अशी माझी समजूत आहे. विशिष्ट ऋतूचें वर्णन विशिष्ट रसाला पोषक मानणें इत्यादि सर्व प्रकारांची गणना मी संकेतांतच करतों. व या प्रकारास साहित्यशास्त्रवेत्त्यांत जसजशी मान्यता मिळत गेली तसतसें संस्कृत काव्यकृतीचें पूर्व स्वभावरम्य स्वरूप पालटत जाऊन अत्यंत कृत्रिम असें स्वरूप तिला प्राप्त व्हावयास लागलें. व त्यामुळेंच अंतःकरणांत उठणाऱ्या भावनांच्या स्वैर विलासास संस्कृत कविता हळूहळू पारखी होत गेली. व असल्या कल्पनांच्या प्रसाराकरितां कविजन संस्कृतचा आश्रय करण्याऐवजीं क्रमाक्रमानें प्रौढावस्थेस येत असलेल्या प्राकृत

भाषांचा आश्रय करूं लागले. संस्कृत कवितेच्या या अपकर्षाच्या काळांत अभिजात कवि निर्माण न होतां प्राचीन कवींचें रहस्य साहित्यशास्त्रांतील प्रमेयांचें तराजूंत तोलून मापन करणारे कांटेतोल टीकाकार मात्र निर्माण झाले हें सर्व संस्कृतज्ञांस विदित आहेच.

मराठी कविता ही प्रायशः संस्कृत वाङ्मयांतील रामायण, महाभारत, भगवद्गीता व भागवत या ऐतिहासिक व पौराणिक ग्रंथावर आणि संतचरित्रें व नाममहिमा यावरच पुष्ट होत गेली. त्यामुळें संस्कृत-साहित्यशास्त्रवेत्त्यांनीं निर्माण केलेल्या बंधनांचा तिला फारसा उपसर्ग झाला नाहीं. किंबहुना तिच्या साध्याभोळ्या वेषामुळें तिचा या साहित्याभिमानी पंडितांकडून निरनिराळ्या निमित्तांनीं छळहि झाला असें ज्ञानेश्वरादि कविश्रेष्ठांनीं ठिकठिकाणीं काढलेल्या उद्गारांवरून व समाजांत प्रसृत असलेल्या अनेक आख्यायिकांवरून दिसून येतें. अंतःकरणांतील परमार्थविषयक तळमळ उच्च व उदात्त स्वरांत गाणारी कविता महाराष्ट्रांत जितकी निर्माण झाली तितकी हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत झाली असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. संतांनीं आपल्या काव्यमय वाणीनें महाराष्ट्रभूवर भक्ति ज्ञान वैराग्याच्या उपदेशाचा सारखा मुसळधार पाऊस पाडला. व त्यामुळें महाराष्ट्रीय समाजांत एक प्रकारची विलक्षण धर्मनिष्ठा व परमार्थप्रेम उदयास आलें; हें जरी खरें असलें तरी विविध रसांचा आस्वाद घेऊं इच्छिणाऱ्या काव्यभोक्त्यांस मराठी कविता वाचतांना एक प्रकारची निराशा वाटल्यावांचून रहात नव्हती. मराठी कविता ह्मणजे पंढरीची वारी करणारी व मुखानें हरिनामाचा गजर करणारी सत्त्वशील व वैराग्यसंपन्न साध्वी ह्मणून तिजविषयीं ते दुरून आदर व्यक्त करीत पण तिच्या नादीं लागत नसत. संतांनीं नाममहात्म्याबरोबरच रामायण, महाभारत व श्रीमत् भागवतांतील कृष्णचरित्र हें गाण्याचा हव्यास जर धरला नसता तर सर्व महाराष्ट्रांतील जनता ही कदाचित् सर्वथैव व्यवहारविन्मुखहि बनली असती. परंतु पारमार्थिक भावनांबरोबरच या तीन राष्ट्रीय ग्रंथांतील प्रमुख नायक, वीरपुरुष व शूर अबला यांच्या चरित्रांचा आदर्शहि त्यांनीं जनतेपुढें ठेविल्यामुळें परमार्थप्रेमाबरोबरच त्यांच्या व्यवहारदक्षतेचीहि थोडी बहुत जोपासना झाली. मराठी कवितेचा हा प्राथमिक उपेक्षेचा काळ व्यतीत होऊन तिला सुप्रतिष्ठितपणा यावयास लागल्यावर पंडितवर्गानेंहि मराठींत रचना करावयास

सुरवात केली. व यांच्या रचनेंत भक्तिप्रधान मराठी कविता व संस्कृत काव्य या दोन गंगायमुनेच्या संगमाचा नयनमनोहर चमत्कार पहाण्यास सांपडतो. रघुनाथ-पंडित, विठ्ठलकवि, वामनपंडित, मोरोपंत यांच्या काव्यावर संतकृतीची व संस्कृत महाकवींची छाप सारखीच वसलेली आहे हें मार्मिक वाचकांच्या निदर्शनास आल्याशिवाय रहात नाहीं. ओंवी, अभंग या सुलभ मराठी छंदांचा त्याग करून यांनीं संस्कृत साहित्यांतील विविध छंदांचा व गणमात्रानियमित वृत्तांचा उपयोग केला. व त्याप्रमाणेंच निरनिराळे रसालंकार काव्यांतून आणण्याचाहि प्रयत्न केला. यामुळें मराठी कवितेला पुष्कळच वैचित्र्य व मनोहरत्व प्राप्त झालें. यांतच रामजोशी, अनंतफंदी, अमृतराय, सगनभाऊ, होनाजीबाळप्रभृति कवींनीं निरनिराळ्या विषयांवर लावण्या, पोवाडे, कटाव, फटके व पदें रच-ल्यामुळें ऐतिहासिक प्रसंग व सामाजिक प्रपंचांतील प्रकृत प्रमुख विषय हेहि प्रसंगोपात कवितेचे वर्ण्य विषय व्हावयास लागले.

इंग्रजी अंमल सुरू होण्याच्या सुमारास मराठी कविता ही केवळ पारमार्थिक स्वरूपाचीच राहिली नव्हती, किंवा निव्वळ पौराणिक कथा गाणारी नव्हती तर व्यावहारिक विषयहि तिच्या कक्षेंत यावयास लागले होते, ही गोष्ट आधुनिक काव्यचिकित्सेच्या दृष्टीनें महत्वाची आहे.

यानंतरच्या ह्मणजे इंग्रजी कारकीर्द व पाश्चात्य शिक्षण सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या २५-३० वर्षांत कांहीं जुन्या संतकवींची परंपरा चालविणारे तर कांहीं संस्कृत वाङ्मयांतील काव्यग्रंथांचीं रूपांतरें करणारे परशुरामशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर वगैरेसारखे कवि निर्माण झाले. त्याबरोबरच इंग्रजी काव्याचा अनुवाद करण्याचा प्रघातहि कीर्तिकर, महाजनी वगैरेसारख्या कवींनीं पाडला. याच पिढींत ऐतिहासिक विषयांवर लहान मोठीं काव्यें लिहिण्याचे कुंटे प्रभृतींनीं केलेले यत्न सर्वविश्रुत आहेत. कुंट्यांच्या काव्यांत वामन मोरोपंत वगैरे कवींच्या कृतींतून असणाऱ्या संस्कृतप्रचुर वाक्प्रचाराविषयींचा तिरस्कार, वर्ड-स्वर्थप्रमाणें सुलभ व नित्य बोलण्याची भाषा काव्यांत रूढ करण्याचा अट्टहास आणि मिल्टनच्या धर्तीवर दीर्घोपमा वगैरे पाश्चात्य वीरकाव्यांतील प्रघाताचा उपक्रम करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो; परंतु या पिढीच्या हातून जी काव्य-रचना झाली ती जरी निकृष्ट नव्हती तरी महाराष्ट्रजनतेच्या रुचीस पटण्या-सारखी नसल्यामुळें तिची परंपरा त्रुटित झाली. 'भट्टवंश काव्य' किंवा

'राजा शिवाजी' हीं या काळच्या कवींनीं रचिलेलीं ऐतिहासिक महाकाव्यें भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यासच काय तीं आतां अवगत असतील. तथापि आंग्ल वाङ्मयांतील वर्डस्वर्थप्रभृति १९ व्या शतकांतील कवींचा महाराष्ट्रीय सुशिक्षितांच्या मनावर पगडा बसावयास लागल्याचें स्पष्ट चिन्ह तत्कालीन कवींच्या कृतींवरूनहि दिसून येतें.

या पिढींतील कवींनीं महाकाव्यें लिहिण्याचा केलेला प्रयत्न फारसा लोकप्रिय झाला नाहीं. त्याचा एक परिणाम असा झालेला दिसून येतो कीं यानंतरच्या काळांत केशवसुतप्रभृति स्वतंत्र काव्य लिहिणाऱ्या कवींची जी परंपरा उत्पन्न झाली त्या परंपरेंतील बहुतेक कवींनीं प्रायः खंडकाव्यें किंवा सुभाषितें लिहूनच आपली काव्य निर्माण करण्याची इच्छा तृप्त करून घेतली आहे.

या नूतन कविसंप्रदायांत बरेच प्रतिभासंपन्न कवि उदयास आले. रे. टिळक, केशवसुत, विनायक, चंद्रशेखर, मोगरे, घाटे, बालकवि वगैरे कवींनीं लिहिलेलीं बरींच लहान मोठीं काव्यें अत्यंत सरस अशींच आहेत. तथापि यांच्यापैकीं कोणी महाकाव्य लिहिण्याचा विचारहि मनांत आणला असें दिसत नाहीं. या बाबतींत वर जें एक कारण दिलें आहे त्याबरोबरच आर्नाल्ड या आंग्लवाङ्मयाच्या इतिहासकाराच्या ग्रंथांतून याच प्रश्नाचा उहापोह करणारा एक महत्त्वाचा उल्लेख आढळून आला त्याचाहि निर्देश करावासा वाटतो. त्या उताऱ्याचें मर्म कळण्याकरितां एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे. इंग्लंडांताहि ॲरिस्टॉटलप्रभृति ग्रीक साहित्यशास्त्रवेत्त्यांनीं घालून दिलेल्या काव्य-नियमांचें फारच मोठें प्रस्थ माजलें होतें. व त्या नियमानुसारच पंडितवर्गाकडून कोणत्याहि काव्याचें परीक्षण करण्याचा परिपाठ पडला होता. पुढें पुढें या कृत्रिम काव्यकल्पनाविरुद्ध बंड करणाऱ्या कवींचा संप्रदाय एकोणिसाव्या शतकांत निर्माण झाला. निसर्ग हा वर्ण्यविषय व स्फूर्ति हेंच काव्य–रीतिनियमनाचें साधन असें वर्डस्वर्थ शेलेप्रभृति कवींनीं प्रतिपादण्यास सुरवात केली. त्यांनीं केलेलीं तंतुगीतें अत्यंत रसाळ व लोकप्रिय झालीं. याच कवींचा आदर्श आधुनिक तंतुगीतें रचणाऱ्या मराठी कवींपुढें आहे, त्यामुळें इंग्रजी तंतुकाव्य-लेखकांच्या हातून महाकाव्यासारखी रचना कां होऊं शकली नाहीं किंवा जी झाली ती विशेष सरस कां वठली नाहीं याची आर्नाल्डनें केलेली मीमांसा वाचकांस मनोरंजक वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

" They loved to commune with nature and their own souls in solitude, believing here was the source of true poetic inspiration. The resulting forces were often, as far as they went, beautiful and spotless in art; they were worthy of profound and beautiful thoughts which they embodied. In diction, rhythm, proportion, melody–in everything, in short, that constitutes beauty of form no poems ever composed attained to greater perfection than Shelley's Sky-lark and Keat' s Hyperion. "

याप्रमाणें त्या नवीन संप्रदायांतील कविवर्यांच्या गुणांचें यथार्थ व भरपूर वर्णन केल्यानंतर आर्नाल्डनें यांच्या हातून वीरकाव्यें व नाटकें लिहिलीं गेलीं नाहींत ही गोष्ट नमूद करून खालील अभिप्राय व्यक्त केला आहे.

"Yet these forms, after all, were not of the highest order. The judgment of many generations has assigned the palm of superiority among poetic forms to Epos and the Drama; yet in neither of these did the school of poets of which we speak achieve any success of moment. This was probably due to the influence of the theory which we are considering.— The truth is that no extensive or complex poem was ever composed without large help from that constructive faculty which it was the object of the theory to depreciate."

नंतर लेखकानें शेक्सपिअर, डांटे, व्हर्जिल, टासो या महाकवींनीं काव्य-निर्मिति स्फूर्तिबरोबरच व्यासंग व परिश्रम यांचे जोरावर केली असें दाखवून दिलें आहे; व अखेरीस या विवेचनाचा समारोप करतांना अभिप्राय दिला आहे तो सर्व कवींनीं व विशेषतः आधुनिक वीणाकाव्याचे सुस्वर आलाप घेऊं पाहणाऱ्या महाराष्ट्रांतील सर्व होतकरू कवींनीं सदैव आपल्या उराशीं बाळगण्याइतका महत्त्वाचा आहे.

"The bright moments are transitory, even with minds endowed with the highest order of imagination; but by means of this labour:—

" Tasks in hours of insight willed,
May be in hours of gloom fulfilled"

But this truth was obscured, or but dimly visible, to minds which viewed poetry in the light we have described."

हा उतारा लांबलचक आहे पण अत्यंत महत्त्वाचा आहे असें वाटल्यामुळेंच वर दिला आहे. यांतील विचार व काव्यप्रकार मम्मट यांनीं काव्यहेतूंचें विवरण करतांना खालील श्लोकांत प्रकट केलेले विचार यांमध्यें वाचकांस बरेंच साम्य आढळून येईल.

> शक्तिर्निपुणता-लोकशास्त्रकाव्याद्यवेक्षणात्
> काव्यज्ञशिक्षयाऽभ्यास इति हेतुस्तदुद्भवे ॥

आधुनिक कविरचित कविता आज बहुतेक 'वीणा गीत' या नांवाखालीं मोडली जाते. वीणाकाव्यासंबंधीं कांहीं विवेचन आनंदगीताच्या पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या खंडांच्या प्रस्तावनेंत केलें असल्यामुळें त्याची पुनरुक्ति मी येथें करूं इच्छित नाहीं. या कवींचा संप्रदाय सध्यां महाराष्ट्रांत वाढत आहे, व या धर्तीची कविता आतां बरीच लोकप्रियहि होत आहे. हीं काव्यें लिहिणाऱ्यांच्या पुढें सदे, कीट, शेले, वर्डस्वर्थ, कोलरीज, बर्न, बायरन या वर निर्दिष्ट केलेल्या १९ व्या शतकांतील कवींचाच आदर्श आहे असें तीं काव्यें वाचणारांस वाटल्यावांचून रहात नाहीं.

'आनंदगीत'हि याच धर्तीच्या काव्यांत मोडलें जातें. तरी त्यासंबंधीं एक विशेष सांगण्यासारखा आहे तो हा कीं आनंदरावजींनां संस्कृत वाङ्मय किंवा आँग्ल वाङ्मय यांचा मुळींच परिचय नाहीं. काव्य करण्याची त्यांची स्फूर्ति ही यापैकीं एकाहि वाङ्मयांतील कवींच्या ग्रंथांच्या परिशीलनानें उत्पन्न झालेली नाहीं. त्यामुळें पाश्चात्य कविकल्पनांनां रूपांतरित करण्याच्या प्रयत्नांत मराठी कवितेचें शुद्ध स्वरूप विकृत झालेलें अनेकदां अशा काव्यांतून दृष्टीस पडतें तो दोष आनंदगीतांत सहसा आढळून येत नाहीं. आपल्या देशाच्या हल्लींच्या अवनत स्थितीसंबंधाचा तिरस्कार आणि १७ व १८ व्या शतकांतील मराठेशाहींतील मराठ्यांचा पराक्रम व वैभव याविषयीं वाटणारा अभिमान हा त्यांच्या प्रासंगिक व ऐतिहासिक काव्यांतून वाचकांस ठिकठिकाणीं मोठ्या आवेशयुक्त भाषेंत प्रगट झालेला दृष्टीस पडतो. श्रीशिवाजीमहाराज व लोकमान्य टिळक या पूज्य राष्ट्रविभूतींसंबंधानें त्यांच्या अंतःकरणांत वसत असलेलें अलोट प्रेम त्यांच्या अनेक पद्यांतून मनोवेधक रीतीनें व्यक्त झालें आहे. 'जन्मोत्सव'

'बाल शिवाजी' 'गडी मावळा' 'राज्याभिषेक' 'राघोभरारी' इत्यादि या खंडांतील पद्यांतून आनंदरावजींच्या अंतःकरणांतील मराठेशाहींतील महाराष्ट्रीय वैभवाचा अभिमान व आदर आणि प्रस्तुतकालीन अवनतस्थितीचा तिरस्कार व्यक्त झालेला स्पष्ट दिसतो. तथापि आनंदरावजींचें अंतःकरण केवळ नैराश्यग्रस्त नाहीं. भावी काळ भारतास भाग्योदयाचा जाणार व तो काळ आतां समीप येत चालला आहे अशी त्यांची मनोदेवता त्यांनां सुचवीत आहे. 'प्रबोधन' काव्यांत कवि मोठ्या कळकळीनें भारतीयांस 'काळ पालटला. ऊठ' ह्मणून जागृत करण्याचा प्रयत्न करीत आहे.

भारता ! ऊठ रे ऊठ । झोंपसी असा किति काळ
साम्राज्य तमाचें सरलें । हें गीत गाइ चंडोल
हा अरुणदूत सूर्याचा । जागवी सकल भूगोल
उदयाचल कर वरि करुनी । हर्षाचा उधळि गुलाल
उघडी रे उघडी नयन
तरि आलस्या टाकून
बघ जरा भंवतिंचें भुवन
तेजाग्नि स्वातंत्र्याचा । चहुंकडे उडवि कल्लोळ

पुढें कवि त्याला ही झोंपण्याची वेळ नाहीं कारण

या दीप्ताग्नीच्या ज्वाला
चौफेर तुझ्या शरिराला
दाहिती दावुनी लीला

तिकडे पहावयास सांगतात. चीनच्या जागृतीकडे बोट दाखवून कवि भारतास 'निकराचा प्रयत्न करून आपलें मुख उज्ज्वल करण्यास व पुन्हां कांतीनें मिरविण्यास' आग्रहानें सुचवीत आहे.

तव निकट स्नेही चीन । या प्रदीप्तशा तेजानें
अंधार सदनिंचा अपुल्या । घालवी यत्न निकरानें
मुख उज्ज्वल करुनी अपुलें । मिरवि तो पुन्हां कांतीनें,
परवशता त्याचा ठाव
परवशता त्याचा भाव
परवशता त्याचा देव
दृढ समज जगाचा ऐसा । निमिषांत करी वग्र फोल

ज्या चीनची "गुलाम राष्ट्र" म्हणून सारखी शतकानुशतकें अपकीर्ति चालली होती

**तो धनी आज त्यावरती । उधळिती फुलें दिक्पाल**

अशी स्पृहणीय स्थिति त्याला प्राप्त झाली आहे. आणि शेवटीं

**स्वातंत्र्य-तेज अनिवार । नच रोधन होइ तयाचें**
**धिःकारी वा सत्कारी । तें मात्र तुझ्या मनिषेचें**

अशी मार्मिक सूचनाहि त्यांनीं देऊन ठेविली आहे. हें काव्य वाचीत असतांना कवीच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्यप्रेम उचंबळून बाहेर पडत आहे असा वाचकांस क्षणोक्षणीं अनुभव आल्याशिवाय रहात नाहीं. व त्याच भावनेच्या पुरांत वाचकांसहि तेवढ्यापुरती तरी अवगाहन करण्याची बुद्धि उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं.

आनंदरावांनीं स्वातंत्र्यप्रेमानें गाइलेलीं गीतें हीं वाचकांवर परिणाम करणारीं अशींच आहेत. त्याचप्रमाणें निसर्गांतील एखादें मनोज्ञ शब्दचित्र जेव्हां ते काढतात किंवा सृष्टींतील न उकलणाऱ्या गूढांकडे जेव्हां ते रसिक वाचकांचें चित्त वेधून घेण्याचा प्रयत्न करितात तेव्हांहि त्यांची कविता वाचकांस तन्मय करून टाकणारी अशीच असते. " चांदणी " "खुळा चांदोबा " " अपुरें चित्र " " फुलांचें संमेलन " " ललितसंगम " इत्यादि लहानशा काव्यांतील काढलेलीं निसर्गाचीं चित्रें कोणत्याहि रसिकाचें मन वेधून घेतल्याशिवाय रहाणार नाहींत. " अपुरें चित्र " या काव्यांतील चंद्रावरील उत्प्रेक्षा फारच बहारीच्या व एकापेक्षां एक सरस व अभिनव आहेत. पौर्णिमेच्या चंद्रावर अनेक कवींनीं आजपर्यंत उत्प्रेक्षा केलेल्या आहेत. आनंदरावजींनीं या जुन्या विषयावरच हें काव्य रचिलें आहे. परंतु यांतील उत्प्रेक्षांची माधुरी रसिकांचे मनास चटका लावणारी आहे. त्यांतल्या त्यांत

**"सौभाग्य गौर मांडुनी**
**तिच्या पूजनीं । तारका बाला**
**हा काय लाविती भक्ति-दीप शोभेला"**

या उत्प्रेक्षेचें समर्पकत्व व सहजत्व पाहून कोणताहि रसिक आनंदानें मान डोलविल्याशिवाय खचित रहाणार नाहीं. चैत्राचे शुद्धपक्षांत सर्व सौभाग्यवती स्त्रिया घरोघर गौरणीचा किंवा हळदकुंकवाचा समारंभ करण्यांत दंग झालेल्या

असतात, हा प्रघात लक्षांत आला ह्मणजे वरील उत्प्रेक्षेचें समर्पकत्व व औचित्य कोणासहि सहज पटण्यासारखें आहे. " ललितसंगमां "तील आनंद वाचकांनीं तें समग्र पद्य वाचूनच लुटावा अशी आम्हीं जोराची शिफारस करतों.

**" हंसऱ्या जीवा हंसेंच भंवतीं विलसावें गमतें**
**रुष्टपणा कवणाचा कैसा रुचेल मग त्यातें "**

या पंक्तींत जें स्वभावचित्र दिलें आहे तें किती यथार्थ आहे हें असल्या " हंसऱ्या जीवाशीं " दृढ परिचय असण्याचें सद्भाग्य ज्याला लाभलें आहे त्याला सांगण्याची आवश्यकताच नाहीं. " कळ्या कां हंसत नाहीं " ह्मणून क्षणभर निराश झालेल्या ललनांच्या मनाचा विरस होतो न होतो

**" तोंच चिमुकल्या कळ्या हांसल्या सुगंध दरवळला**
**ओंठांच्या पाकळ्याहि फुलल्या उडुगण लुकलुकला "**

त्याबरोबर कवि विस्मयानंदानें लिहितात,

**" ओठ कोणते, कळ्या कोणत्या, ललित मधुर कोण ?**
**माधुर्याच्या ललित संगमीं करिल तुला कोण !"**

त्याचप्रमाणें 'दिव्य लेखक' या काव्यांत आकाशाच्या नील पटावर तारकारूपी लक्षावधि रत्नांचीं अक्षरें रोज नित्यनियमानें लिहिलीं जातात व पुसलीं जातात त्या दिव्य चमत्कारास अनुलक्षून जी रचना केली आहे तीहि रसिकांचीं मनें लुब्ध करून घेण्यासारखी आहे. पृथ्वीच्या शाळेंतील लक्षावधि विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याकरितांच हें कोडें निसर्गदेवतेनें मांडून ठेविलें आहे. परंतु

**' युगायुगाची स्फूर्ति-शारदा कष्टवुनी बुद्धिला**
**लागती नऊ अक्षरें तिला**
**स्फूर्ति-तुरंगम अगतिक पुढतीं, दहावें न उमजलें**
**सकल जरि वेंची बल आपुलें "**

हें किती खरें आहे ! मानवी बुद्धीच्या पंगुतेचें हें किती मार्मिक वर्णन आहे ! फलज्योतिष्यांच्या अभिमानावर ही कवीनें मोठी मार्मिक टीका केली आहे.

**" तीं नउच अक्षरें क्षणोक्षणीं नाचवी**
**गुण, कीर्ति तयांची गाउनि जग मोहवी**
**जणुं दुजें कुणिच ना त्याविण नभिं भासवी**

अंबरपट परि अक्षराविणें रिता न तसुभर दिसे
सत्य हें मानावें मग कसें "

हें गूढ केव्हांहि समग्र उकललें जाणें शक्य नाहीं. ह्मणून शेवटीं कवीनें या काव्याचा समारोप करतांना खालील उद्गार काढलेले आहेत.

" दिव्य लेखका ! पिसा खेळ हा थांबणार केधवां
तुजविना कळेल कवण्या जिवा "

'चमेली' या काव्यांतील वर्षाऋतूंतील रात्रीचें व फुललेल्या मालतीचें हीं वर्णनेंहि गोड आहेत. 'लहाना बाळ' व 'गंगायमुना' या दोन्ही काव्यांतील लहान मुलांच्या स्वभावाचें रेखाटलेलें चित्र पाहून कोणीहि कवीचें कौतुकच करील.

याशिवाय राधाकृष्ण, मुरली वगैरेवर निरनिराळे प्रसंग कल्पून कांहीं पद्यें या खंडांतहि आलीं आहेत तीं पूर्वखंडांतील पद्यांप्रमाणेंच सरस वठलीं आहेत. कवीनें आपली तिलक-भक्ति ज्या पद्यांतून व्यक्त केलेली आहे तीं पद्यें यापूर्वीच लोकप्रिय झालेलीं आहेत.

सारांश आनंदरावांस जी लोकप्रियता व रसिक-प्रशस्ति पूर्वीच्या दोन खंडांनीं प्राप्त झाली ती या खंडाच्या प्रकाशनानें वृद्धिंगत होईल. प्रस्तावनेच्या पूर्वभागांत जगन्नाथपंडितांच्या ज्या काव्याच्या व्याख्येचें थोडेसें विवेचन केलें तिची कसोटी लावून आनंदरावांचें काव्य वाचणाऱ्यास त्यांच्या बहुतेक पद्यांतून शब्दार्थ-चमत्कृतीचा आस्वाद भरपूर घ्यावयास मिळून एकप्रकारचा आल्हाद झाल्याशिवाय राहणार नाहीं असा माझा विश्वास आहे. इत्युत्तर आनंदरावजींचे हातून महाकाव्यरचनेच्या रूपानें महाराष्ट्र-शारदेची सेवा घडो अशी आशा प्रकट करून हा प्रस्तावनालेख येथेंच संपवितो.

| | |
|---|---|
| **यवतमाळ,**<br>ज्येष्ठ वद्य ६ रोज गुरुवार,<br>शके १८५१; ता. २७-६-१९२९. | आपला,<br>**माधव श्रीहरि अणे.** |

22542 काव्य
20482

॥ श्री ॥

# आनंद-गीत

१

## हा कोण

हा कोण उदयगिरिं येइ
दर्शनीं देइ । धीर जीवाला
सूर्यास्त बघुनिया उदास वाटे ज्याला
अंधार घोर दाटला
दिसेना डोळां । जवळिं दुरिं कांहीं
तोंच हा विराजुनि प्रकाश अपुला दावी
भासला इन्दुचा उदय
होइ मन अभय । वाटलें कवणा
कीं जरा शांतविल हताश अंतःकरणा

उगवतीं फुलें डोललीं
मधुर हांसलीं । भक्तिभावानें
तो पवन दिगंतीं उधळि गंध वेगानें

क्षण रवि-स्मरण तें नुरे
लोपती तारे । तरल तेजाचे
नच रूप देखतां तद्गुण गाती वाचें

हा अतां घडीनें जरा
तिमिर-पंजरा । खचित भेदील
अभिमानें ह्मणती, त्रिखंड पदिं तुडवील

असतांच वदनिं हे बोल
काय हें नवल । घडे नवलाचें
तत्प्रकाश घेई स्वरूप घनतिमिराचें

परि नवल कशाचें हें
चन्द्र तो नव्हे । सुधाजलधारी
क्षय, कलंक जरि त्या तरी तमा जो वारी

२

# मुरलीवाला

सोडिला कुठें । कुठें मुरलिवाला
दावि गे दावि झणीं त्याला
मुरलिवाला

तयाच्याविणें । मना चैन नाहीं
ठाउकें सकळ तुला बाई
चैन नाहीं

अतांवरि गे । श्रवणिं नाद ये तो
वाटलें तुझ्या पाठिशीं तो
नाद येतो

कृष्णविरहिता । परत येशि कैशी
राहिली कां न तन्निवासीं
येशि कैशी

जरी तुजसिही । कृष्ण-लाभ होता
संतोष होय तरी चित्ता
लाभ होता

तूंहि त्यागिलें । मजहि दूर केलें
काय गे यांत साधियेलें
दूर केलें

परी संशयी । बाइ वृत्ति माझी
अजुनिही मुळिं न होय राजी
वृत्ति माझी

तुझी मूकता । मूक बोल बोले
जपुनियां हरिस आणियेलें
बोल बोले

दिसेना तरी । हृदय फार शिणलें
पाहसी अंत किती विमले
फार शिणलें

पुरे ग अतां । तुझे नयन हंसले
राहुं दे ओठ तसे मिटले
नयन हंसले

तुझ्या हृदयिंचा । गडे भाव कळला
कोंडुनी हृदयिं ठेवियेला
मुरलिवाला

३

# ये, गोपाळा ये

[ सबसे राम भजन० या चालीवर ]

ये रे ये गोपाळा । कोठें असती या वेळा
कुठें वासुरें, कुठें धेनुका काय दशा त्यांची
अजुनि कळेना तुला माधवा गोष्ट बहू नवलाची
दुष्ट कालिया–शिरीं नाचुनी कंस मर्दियेला
हृदय तुझें तें कुठें आजला बोल नंदबाला
भुकेजला तुज बघुनि स्त्रवती अपाप पयधारा
हीच काय रे कृतज्ञता ती विश्वाच्या आधारा

मिळवुनि भंवतीं रंजविण्या त्या वाजविसी पावा
स्नेहाचा परिणाम आज त्या हाच काय गावा

ह्मणवाया ' गो-पाल ' हवें तुज सदा सर्व काळ
विटंबना वारणें तयांची नको काय गोपाळ !

४

# कोण जिंकणार ?

[ सुटला पितृदिशेचा० या चालीवर ]

गर्दी एकच समशेरींची
छाती छातिस रणमर्दांची
शिरदलें पटापट गळती समरतरूंचीं
स्मृति होइ तेधवां त्या झंझावाताची

कुठला शत्रु मित्रही कुठला
न दिसे कांहिंच तें कवणाला
किति वाहुं आपुल्या कंठनाल समशेरीला
हें एकच तेव्हां दिसे धुंद डोळ्यांला

उठला एकच रणकल्लोळ
हाले ब्रह्मांडाचा गोल
डळमळे परिसुनी फणीन्द्रमाथाडोल
गेलाच वाटलें अखिल जगाचा तोल

अंबरिं चंचल चपला अचल
भूवरि निश्चल चपला चपल
पाऊस उलटला खालुनि वरती, नवल
वरतुनीच वर्षे अजवरि जें घनसलिल

क्षण तो जरि भर मध्यान्हींचा
तरि तो गमे मध्य रजनीचा
महिवरिल उडाला रवि–मुखिं थर धूलीचा
जलसागर तेथें रक्तमिषें गगनींचा

वरती धूलिमेघ घनदाट
खालीं रक्तसमुद्र अफाट
अवकाशीं वीजा तेज दाविती धीट
रुधिराच्या धारा काढिति गर्जत वाट

तीं तरंगतीं शिरकमलें
बघुनी समरशौर्य उसळीलें
विजयाचें नौकाशीड तुफानीं झालें
जाईल कुठें तें बुडेल केव्हां गमलें

भीषण तांडव समशेरींचें
विलसे अंगीं प्रतिवीराचे
स्थल नसे असें कीं रोममात्र शरिराचें
'हा तोच' म्हणुनिया ओळखील कुणि साचें

कीं एक लढे परवशतेशीं
दुसरा भीषण स्वातंत्र्याशीं

परि अमोघ शक्ती एकाचे पाठीशीं
तशि शक्तिहीनता स्वतंत्रशा जीवासी
घेउनि पाश पारतंत्र्याचा
पुढतीं उभा दूत काळाचा
तरि धैर्यहिमालय जिवंत त्या जीवाचा
रतिभरहि न हाले निश्चल निज ठायींचा
न मुळीं खंती निज लघुतेची
तैशी खंति न दुर्बलतेची
पडुं नये शृंखला पायीं परवशतेची
प्रति रोम तयाचा शिकस्त करि शौर्याची
तेथें स्वातंत्र्याचें पाणी
निर्मल उज्ज्वल गंगेवाणी
रिपु सबल त्यावरी ताडन करि कोपानीं
रणरंग असा दिक्पाल देखिती नयनीं
अर्धे सूर्यबिंब क्षितिजाखालीं
अर्धे चन्द्रबिंब उदयाचलीं
रविबिंब दडालें, चंद्रबिम्ब घनजालीं
विजयश्री नकळे माळ कुणा मग घाली

* * *

ज्याच्या हृदयीं उत्कटतेची
इच्छा अभिनव स्वातंत्र्याची
धरितां न लालसा मुळिंही परिणामाची
कृष्णार्पण होणें स्वतां उचित त्या हेंचि

५

# माझा महाराष्ट्र

[ पोवाड्याच्या चालीवर ]

जगिं नाहिं कुणाचे अम्हीं
आमुचे नसति कोणिही
मग ह्मणो कुणी कांहिंही
केसरी केसरीच तो
काक काक तो
जुळे न मन उभयीं । केधवांही
हा गडी मराठा महाराष्ट्रिंचा मराठीच राही

जो सह्याद्रींत खेळला
करि कृष्णा-जलपानाला
फाटकी घोंगडी त्याला
जो सिंहनादगर्जनीं
पळवि भिववुनी
श्वान-काक-जीवीं । साक्ष देई
तो कोण असे मग महाराष्ट्रिंचा ?-मराठीच राही

निज नाथ राज्यदानाला
रिपुकरीं सोडि ज्या काला
तइं एक शूर ती अबला
शिवराष्ट्र-ध्वजरक्षणीं
असुरमर्दिनी

सुमनजीव श्रमवी । भक्तिभावीं
ती कोण रमा मग महाराष्ट्रिंची ?—मराठीच राही

जें मधुर बाल्य असुनिही
घे रणावेश चढवुनी
तळपलें प्रखर रविहुनी
अनुभवा व्यर्थ ठरविलें
.जगा कथियलें
ध्यास ज्या हृदयीं । तोच विजयी
तें बाल्य कोठलें महाराष्ट्रिंचें ?—मराठीच राही

ज्या दिव्य श्लोक-गायनें
जागलीं, झोंपलीं मनें
प्रति रोम भरे मी-पणें
आनंदवनभुवन
रुक्ष जें सदन
क्षणिंच तें होई । त्याच देहीं
तो श्लोक कोठला महाराष्ट्रिंचा ?--मराठीच राही

नच धर्म वर्ण जाणतां
लोपुनी हृदय—भिन्नता
जी दिसे एकरूपता
तो नादब्रह्म राउळीं
नभोमंडळीं
निनादित होई । 'विठाबाई'
तें ऐक्य कोठलें महाराष्ट्रिंचें ?—मराठीच राही

वाटलें जरी भ्रष्टला
भासलें जरी नष्टला
लक्षिलें जरी विसरिला
तरि मूलरूप आपुलें
जगा दाविलें
आश्चर्यें दिपवी । ऐन समयीं
तो महाराष्ट्र हा महाराष्ट्रिंचा मराठीच राही

जो महाराष्ट्रिं जन्मला
जो महाराष्ट्रिं रांगला
जो महाराष्ट्रिं क्रीडला
मग असो कुठेंही जरी
मेदिनीवरी
पुण्यवंत तो कीं । पापपंकीं
तरि शांत निशीं घे झोंप मनानें महाराष्ट्र—**अंकीं**

ही महाराष्ट्र—थोरवी
कालच्या दिनीं नाचवी
सर्वथा जगा थइथई
आजही नाचतो शिरीं
कालचेपरी
समस्त जगताच्या । सत्य वाचा
तैसेंच उद्यांही नाचणार तो मनिषेनें प्रभुच्या

६

# मग बोल

बाळा! बोलुं नये ऐसें
बोल हा राहिला न आपुला
कशाला त्वां मग मुखिं बोलिला
पारखा कधींच तो जाहला
अजुनि न ठावें कां तुजला

असती त्याविण धूळाक्षरें
शिकविती, शिकती अजि लेकरें
आचरी त्याच पथा तूंहि रे
बरवा नच हा वघ चाळा

एकदां या बोलाविण कुणा
दुसरा कसलाही येइना
जेथें तेथें ही गर्जना
पानोपानीं जणुं लिहिला

अगणित बोल दुजे आजला
दाविती नाट्यवेश आपुला
परि तो जीवन–बोल हरपला
ह्मणुनिच ह्मणतें वेल्हाळा

कितिक रे ह्या बोला विसरिती
ओळखी तीहि न कितिकांप्रति
नेणणें पुण्य कितिक समजती
तूंचि आजचा मग कुठला

चुकुनी त्वां जरि उच्चारिला
श्रवणीं जरि तो कुणि ऐकिला
जाणें फांस गळां लटकला
मन न शिवूं दे मुळिं त्याला

भंवतीं फिरविं जरा लोचना
जेथें तूंच तुझा राहिना
तेथें ' माझें ' म्हणसी कुणा
सोडुनि दे हा नाद खुळा

जरि हा बोल तुझा तुज हवा
वाही तया आत्मवैभवा
उलटली दावि घडी या भवा
होइ तुझा तूं लडिवाळा

बाळा! मग तूं बोल तसें

७

# बघसि कशाला नभाकडे ?

[ राग भैरवी ]

विलोकितां नच कुणीकडे
बघसि कशाला नभाकडे

प्रभात कालीं सूर्य उगवतो
सायंसमयीं अस्ता जातो

तारकगण तो निशीं विलसतो
काय उणें रे यांत घडे
बघसि कशाला नभाकडे

हर्षित होई का बघतां तें
नच बघतां वा दुःखित होतें
काय तुझी कल्पना बोलते
मुळिं न तया परि हंसे रडें
बघसि कशाला नभाकडे

कीं देवाचें कौतुक करिसी
अवलोकुनि ह्या रम्यपणासी
दाविसि अपुल्या कृतज्ञतेसी
कांहिं न का ह्यापलीकडे
बघसि कशाला नभाकडे

काय देखिला निशीं दिवाकर
माध्यान्हीं वा चंद्र शांत कर
पश्चिमेस कीं अरुण चारुतर
बोल, अतां कां मौन जडे
बघसि कशाला नभाकडे

तेंच तेंच हें सदैव दिसतें
परि तेथुनि निज दृष्टि न हलते
दृष्टि फिरवितां मन नच वळतें
काय तुला हें गूढ पडे
बघसि कशाला नभाकडे

गूढ ह्मणवि तें गूढचि राही
जें उकलें तें गूढचि नाहीं
हींच विभूची कृती लाघवी
हेंचि आढळे चोंहिकडे
बघसि कशाला नभाकडे

८

## वेणुनाद

वेणु–नाद वाई । श्रवणिं येई
अतांच गेला
करुनि पणाला
ऐकिलेंच कानीं
पहा ग हरिची ही करणी

किती विनविलें
किती बोलिलें
तरि न वळे मुळिंही
अतां ग वाजवि त्या ठायीं

नसेल कोणी
अशा ठिकाणीं
वाजवितो मुरली
अतां तरि जाणें वनमाली

तुझां गोपिंचा
समज मनाचा
मुकुंद राधेचा
नाहिं गे नाहिं सत्य वाचा

जसें अंतरीं
तसें आचरी
हरी सर्वसमयीं
नाहिं तो कुणाचाहि नाहीं

क्षणांत तुजला
क्षणांत मजला
हितगुजि नित धरितो
असें ग जग अपुलें करि तो

हरी एकला
जगती विपुला
परि त्या जग बाही
बघसि हें निशिदिन नयनांहीं

जगत्प्रवाहीं
वाहुनि जाई
काय तया मोल
येई गे अमोलास मोल

जीव थोरता
थोर न दिसतां

भासे अपुलासा
तोचि गे थोरपणा साचा
थोर जिवानें
थोर रहाणें
सकलांहुनि जगतीं
जगाची हीच मान्य रीति
प्रेमळतेनें
निश्चलतेनें
निर्विकल्प होई
सुखें मग तदानंद घेई
वेणु-नाद बाई । श्रवणिं येई

९

## अरुणास

तुझिया आगमनें
होति कां । प्रसन्न साधु मनें
वृक, तस्करांना
गमे कां । विषाद बघतांना
तुझ्या दर्शनानें
उधळिती । कवि कां वाक्सुमनें
बघुनी तव चरणा
चन्द्र कां । म्लान करी वदना

मुकीं फुलें फुलती
जगभरीं । सुगन्ध कां लुटती
तुझ्या नयनकिरणीं
लपवि कां । अपुलें मुख रजनी
दंवबिन्दू नटती
तारका । लज्जित कां होती
शांती हरपोनी
अशांति । प्रकटे कां भुवनीं
विहगांची वाणी
मोकळी । कां वातावरणीं
दीपांच्या ज्योति
उज्ज्वला । अतेज कां होती
अल्लड बालकसा
होइ कां । राजस मारुत हा
मनोज्ञ आकाश
घेइ कां । धूसर वनवेश
साधा तर दिससी
अनुभवीं । क्रांति कुशल कैशी
तूं साधा ह्मणुनी
गाइ तुज । साध्या वचनांनीं
जादुगिरी अशि ही
कोठली । अरुणा ! तव ठायीं

## १०

# गडी मावळा

[ पोवाड्याच्या चालीवर ]

सावळा मावळा गडी
फेंकितो कुडी । म्हणा तिज उडी
स्वातंत्र्य समरकुंडांत
दरकार कशाची मुळीं ठेविना अपुल्या हृदयांत

रंगेल जीव यापरी
कोण भूवरी । तसा सुरपुरीं
दिनरात वृत्ति रमलेली
जणुं रंगमहालीं रंगरसाची मूर्ति रंगलेली

लडिवाळ बाळकांवरी
लोभ कितितरी । वसे अंतरीं
तुलनाच जया मुळिं नाहीं
कीं मुलाविणें कुणि ब्रह्म दुजें निज जाणेना हृदयीं

आयुष्य अशा जीवनीं
जाइ दिनि दिनीं । क्षिति न मुळिं मनीं
स्वच्छन्द छन्दिं नित राही
दिन कधीं उगवतो कधिं मावळतो भान तया नाहीं

हा सिंह गुहेभीतरीं
झोंप घे बरी । नसे तिळभरी

जाणीव स्वतांची त्याला
हें दुरुनि विलोकुनि हर्ष न मावे हृदयिं खलां, कुटिलां

हा भास खरा समजुनी
बोल परजुनी । घोर गर्जनीं
वनराज—वना भिववीती
जणुं धरा भिवविण्या शरन्मेघ नभिं शुष्क गर्जताती

परि मनोराज्य अंतरीं
वनासह हरि । अतां पंजरीं
येईल पोपटावाणी
निःशंक राहती गुंग तयामधिं ऐकत शुक—वाणी

सिंहास शुकापरिसही
मोल ज्या ठायिं । मुळीं नच येइ
हें रंजन ज्या हृदयाला
निद्रिस्त तरी तो सिंह जातिचा कोंवि कळे त्याला

तो कुटिल चमू या भ्रमीं
धुन्द होउनी । विलोकित गगनिं
चालला वना तुडवीत
जणुं आपसुखें घे मशक उडीला दीपज्योतींत

तो सिंहद्वारिं ठाकला
हर्ष उसळला । बोल बोलिला
अस्मान ठेंगणें त्याला
इतुक्यांत तयानें सिंह झोंपला उचलि वरी डोळा

बघतांच नजर रोखिली
झांप घेतली । नरडि फोडिली
तीक्ष्ण नखाग्रें जेव्हां
दशदिशा उधळुनी क्षणहि बिचारा त्या न मिळे तेव्हां
उडतांच अशी गडबड
जाइ झांपड । करिति बडबड
घडींत धडपड सांवरितां
"रंगेल नव्हे हो असे काळ हा मूर्तिमंत बघतां"

हा असा स्नेहगंभीर
थोर रणधीर । मावळा वीर
एक भारतीं होई
स्वातंत्र्यापरता जो न ओळखी दुजें कशालाही
नरवीर गर्डा मावळा
वृत्ति प्रेमला । दिसे रंगला
निर्वंध राहुनी जैसा
निज राष्ट्र-संकटीं सकळां आधीं घालि उडी तैसा
म्हणुनीच राज्य हिंदवी
गाजलें भवीं । जगा गुंगवी
विक्रांत विक्रमें विजयी
त्या अम्हां, सांगतों, अजा म्हणुनि कुणि राहुं नये अभयी

११

# सर्वथा

[ जग नसे सरल हृदयाचें० या चालीवर
—आनंद-गीत, भाग दुसरा. ]

श्रृंगार कुणाच्यासाठीं । यापुढें
हांसणें कुणाच्यासाठीं । यापुढें
बोलणें कुणाच्यासाठीं । यापुढें
चालणें तसें पाहणें । विरह सोसणें । कुणासाठीं
सकलही विफल त्या गोष्टी । सर्वथा

माझाच काय हा दोष । सांग तूं
त्यजि काय सुखें कुणि तोष । सांग तूं
मग हरी धरी कां रोष । सांग तूं
कारणाविणें या जगीं । कृती वावुगी । अनुभवासी
तीहि गे थोर जीवाची । सर्वथा

सौंदर्य कौतुकासाठीं । सर्वथा
माधुर्य कौतुकासाठीं । सर्वथा
श्रृंगार कौतुकासाठीं । सर्वथा
दरवळे विजनिं कितितरी । सुमनमाधुरी । काय त्याचें
खेळ हे जाण दैवाचे । सर्वथा

वस्तुलाभ ज्याचा त्याला । या जगीं
तरिच ये मोल मोलाला । या जगीं
रमणीय तेंच विश्वाला । या जगीं

मग जन्म जिचा ज्यास्तव । जगतिं अभिनव । होइ साचा
का नको लाभ तिज त्याचा । सर्वथा

पण कुणा कथाया जावें । मानसा
जाणुनियां प्रेमळतेनें । मानसा
कथि सत्य कोण हृदयानें । मानसा
उपहासें बघुनी तदा । हंसति खदखदा । उलट त्याला
तीव्रता अणिति दु:खाला । सर्वथा

मन खरें जयाचें त्याला । ठाउकें
सुखदु:ख जयाचें त्याला । ठाउकें
हित, अहित जयाचें त्याला । ठाउकें
इतरां न कल्पना खरी । येइ तिळभरी । केधवांही
परि गोष्ट न नवलाची ही । सर्वथा

वद तूंचि काय गे वाटे । तव मना
नच काय गमे हें खोटें । बोल ना
फिरवुं नको भलत्या वाटे । लोचना
बघ जिथें तुझी ही स्थिति । काय मग गति । परजनांची
परि भूल न यांत कुणाची । सर्वथा

हरिनेंच जया जगतांत । निर्मिलें
हरिसाठिंच जें जगतांत । जन्मलें
हरिवरतिंच जें जगतांत । लोभलें
हरिवीणें दु:खित जिणें । उचित साहणें । जगिं तयानें
तेंहि गे त्याच भावानें । सर्वथा

## १२

# अपुरें चित्र

हा चन्द्र किती साजिरा
दिसे गोजिरा । सुधारस प्याला
दर्शनें चलित करि चित्तचकोरक लीला

ती लीला तइं रंगली
फिरवि कुंचली । स्वीय मनिषेची
कल्पना पटावरि मूर्ति नटवि चन्द्राची

भानुच्या प्रखर कांतिनें
तापलीं मनें । जीवसृष्टीचीं
ही काय प्रगटली करुणा जगदीशाची

चैत्राची ही पौर्णिमा
तिचा चन्द्रमा । स्नेह लडिवाळ
या गगनांगणिं हा खेळ खेळतो बाळ

ऋतु वसन्त सृष्टीवरी
पसरि माधुरी । मधुर हृदयाची
ही तीच मूर्ति का विकसे माधुर्याची

जी सप्तसुरी बांसरी
ठेवितां अधरिं । मोहि जगताला
स्वर भिन्न काय ते दावि एकरूपाला

सौभाग्य गौर मांडुनी
तिच्या पूजनीं । तारका बाळां
हा काय लाविती भक्तिदीप शोभेला

किति मन्द वाहतो पवन
स्पर्श करि मुळिं न । नाहिंसा भासे
कीं दीप विझुं नये ह्मणुनि रूप धरि ऐसें

कीं फुले मोगरा नभीं
तया सौरभीं । धुंद होवोनी
प्रांगणीं पहुडती बाल, वृद्ध, युव, रमणी

धुन्दींत त्याच गुंगुनी
मनःकल्पनीं । झोंपली लीला
त्या विविध रंगिंच्या बघत चन्द्र—चित्राला

परि चित्र होइना पुरें
अतां ती नुरे । आस केंव्हांही
त्या अपूर्ण चित्रा ह्मणुनि जगा कवि दावी

## १३

# देशबंधूचा स्वर्गवास

[ सबसे राम भजन० या चालीवर ]

रणधीर हिंदपुत्रांनो । हरहर महादेव बोला
गेला गेला आर्यजननिचा वदतां सुत गेला
तिलक हरपतां जिला रिझविण्या त्यागी सर्वस्वाला

स्वातंत्र्याचें पुष्प वहाया निज मातेच्या पदकमलां
मृदु शय्येवरि रुळणाऱ्या त्या कष्टविलें देहाला
वंगदेशिंच्या ह्या शेरानें चळचळ शत्रू कांपविला
सत्य सकल परि लाभ तयाचा काय हीनभाग्याला
भोग जियेच्या दुर्दैवाचा अजुनि संपला नाहीं
कितीक विपदा पुढतीं ऐशा नकळे तिचिया दैवीं
तरी शंभुसम उभे ठाकुनी संकट-गंगा शिरिं घ्यावी
परी त्या क्षणीं अगस्तिवाणी तिला घटघटा प्यावी
जिथें क्षणोक्षणिं घोर आपदा चहुंकडुनी कोसळताती
अपार सुखनिधि तिथेंच प्रकटे जगताची अनुभूति
दुर्धर संकट रुजवि बीज तें करुणाश्रू त्या घालि जला
धैर्याचल करि वर्धन त्याचें भोगि भावफल समयाला
संकटेंच प्रल्हाद करिति स्थित शाश्वत सुखशिखरीं
कशास चिंता मग विपदांची प्राप्त दिना व्हा सामोरी
काल थोर कीं हिन्दभूमिची वीर कूस थोर
प्रभु साक्षी ठेवुनी दाखवा भीम पराक्रम थोर
सुखें वाहुं द्या दोन्हीं नयनां अविरत जलधारांला
गगनभेदि परि मुखें होऊं द्या वीर गर्जनेला
श्रीभगवंता, पुण्यश्लोकां, भारतमातेला
पुन्हां एकदां वन्दन करुनी हरहर महादेव बोला
बोला, हरहर महादेव बोला

## १४

# जगाचा आनंद

[ आनंदकंद ऐसा० या चालीवर ]

आनंद जो मनाचा । आनंद तो जगाचा

मुरलीस वाजवावें
हृदयास तोषवावें
जरि भाव हा हरीचा । आनंद तो जगाचा

पूर्णेन्दु येइ गगनीं
फुलवीत चित्त नलिनी
जरि हेतु ना कशाचा । आनंद तो जगाचा

घेवोनि खेळण्याला
किति होति बाल-लीला
नच लेश सत्यतेचा । आनंद तो जगाचा

हंसते कळी स्वतांशीं
अलि गीत गाइ तिजशी
हा खेळ दो जिवांचा । आनंद तो जगाचा

वेषांत कोणत्याही
कवि काव्य जन्म घेई
परिणाम मात्र साचा । आनंद तो जगाचा

१५

# माधुरी

तेचि धन्य सर्वथा । दाविती सजीवता
रविशशी जोंवरी
विहरती महीवरी
तोंवरी जे स्वतां । दाविती सजीवता

प्रभुवचास परिसुनी
विजय तोपला मनीं
आचरी तसें रणीं
ती खरी न धन्यता । दिसुनि ये विलोकितां

प्रभुविशीं परोपरी
प्रेम परम अंतरीं
वसतसे धनुर्धरीं
ह्मणुनि त्या न थोरता । भाव ठेवि अंधता

अनुभवासि ध्यावया
जा कुठेंहि भुवनिं या
आजही घडीस या
परि दिसेल निरखितां । तीच अचल सत्यता

तिलक–चरित–माधुरी
तेंवि भारतांतरीं
कणकणीं सुधेपरी
भरुनि राहि तत्वतां । दावुनी अनंतता

## १६

# लीलाविलास

[ आनंदकंद ऐसा० या चालीवर ]

लीलाविलास हरिचा । आनंद तो सदाचा

अंधार घोर भुवनीं
तारे सतेज गगनीं
क्रम हाचि जीविताचा । आनंद तो सदाचा

उजळो प्रदीप कोठें
तमनाश होइ तेथें
जरि हा स्वभाव त्याचा । आनन्द तो सदाचा

जलिंच्या पयास प्यावें
हंसास मात्र ठावें
नच दोष हा कुणाचा । आनन्द तो सदाचा

रविला प्रभात दावी
संध्या तयास लपवी
हा खेळ भिन्नतेचा । आनंद तो सदाचा

चन्द्रा कलंक राही
शुचिवन्त चन्द्रिका ही
हा भोग जीवनाचा । आनंद तो सदाचा

समयीं वसन्त फुलला
ये कंठ कोकिलाला
संकेत गीतकाचा । आनंद तो सदाचा

१७

# स्नेहसंयोग

[ कुंजवनीं या कोण वाजवी० या चालीवर ]

मधुर गुंजनीं तुझ्या मधुकरा मूक कळी खुलली
अष्टांगें फुलली । पहा रे गोड किती हंसली

कोमल कलिका सुगंध कोमल
वातावरणीं विहरुनि अविरल
मोहुनि टाकी अखिल चलाचल
मधुरताच नटली । जणूं कीं चोहिंकडे सगळी

गीततरंगीं कलिका—जीवन
नाचत राही विसरुनि तनमन
अभंगतेचें सुन्दर दर्शन
योगवृत्ति रमली । जरी ती अविकारी असली

कलिकेस्तव तव मंजुळ गाणें
तुझ्याचसाठीं तिचें हांसणें
परस्परांचें मनोज्ञ लेणें
गिरिजा शशिमौली । विराजे राधा वनमाली

ती तव मानस तूंहि तदात्मा
एकरूप ह्या प्रेम—संगमा
नितान्त उज्ज्वल चित्सुखधामा
बघुनि सृष्टि डुलली । मुखानें 'तथास्तु' वच वदली

निधान केवळ तव हर्षाचें
हास्य चारुतर हें कलिकेचें
असेंच हंसतें ठेवि सदाचें
विनति अशा काळीं । मिलिंदा ! हीच तुझ्या जवळीं

१८

# चांदणी

[ जरठास तरुण हो० या चालीवर ]

चमकली चांदणी चिमुकली । जरि भवतिं सघन मेघावलि
रवि–किरण निबिडशा काननीं
घननील कोंदणीं हिरकणी
खल कुटिल मानसीं गुणमणी
त्यापरी तशा अवसरीं । साजिरी साजणी शोभली
केव्हांची तरि ही हांसते
मधु भाव कोणता दाविते
कीं नवल अंतरीं खेळतें
कल्पना कसलि होइना । हंसतेच सारखी आपुली
भेसूर असुर हे भोंवतीं
चिमुकला जीव हा त्यामधीं
नच दिसे कुणीही संगतीं
भयचिन्ह परि न लेशही । ती ध्यानिं कशाच्या रंगली

अंधार घोर वरि, खालतीं
करि स्वैर नर्तना खलमती
ही तिथें एकली हांसती
भयभीत दृष्टिं जग बघे । कौतुकें हांसरी सोनुली
खल काल भाव निज दावुनी
सामोर उभा मुख पसरुनी
नच काय तिच्या हें लोकनीं
स्वप्नांत काय ती रमे । हंसुनीच बापुडी राहिली
किति जीव चिमकुले ग्रासिले
निमिषांत अदयपणिं ह्या खलें
लोचनीं तियेनें देखिलें
हो स्मशान नंदनवन । तरि हंसेच अजुनी ही खुळी
जीवाची ज्योती उज्ज्वला
जीवाची शोभा निर्मला
जीवाची आशा कोमला
मावळेल झणिं ठाउकें । तरि हंसें सोडिना तिज मुळीं

१९

## नवल

हा कोणाचा बाइ बोलका बाळ
बोलतो मधुर किति बोल
जरि याची ही बाल बोबडी वाणी
तरि गोड साखरेहूनी

नच अर्थ दिसे बोलण्यांत जरि कांहीं
आनंद मनाला होई
हृदयास तोष जें देई
काय अर्थ कारण नाहीं
तो सहजपणें का होई
परि हेतुविना घडुनि कसें तें येई
हें नवल वाटतें बाई

२०

## देशद्रोही

[ उद्धवा शांतवन० या चालीवर ]

दुर्दैव हिंदभूमीचें । अजुनीहि संपलें नाहीं
कोणत्या मुहूर्तीं येई । हें बाळ गुणी जन्माला
शतकावरि शतकें होती । तरि दिसे तेंचि नयनांला
कीं सर्वेंचि अपुल्या आणी । तारुण्य, अमरपट्ट्याला
मिळवोनी विभव धुळीला
नाचवी तिथें श्वानांला
तरि शांति न तद्हृदयाला
करि सदैव तांडव नृत्य । नवरूप वेष घेवोनी
कटु छळना दारिद्र्याची । वर्षाव सुधेचा भासे
त्या तीक्ष्ण सुळावरि चढणें । मृदु शय्या सुखकर भासे
गळफांस पारतंत्र्याचा । फुलमाळ रेशमी भासे

परि ओष्ठीं मधु ठेवोनी
विश्वास थोर दावोनी
स्वजनांस भुरळ पाडोनी
तो नको नको तो देवा । झोंपेंत कंठ चिरणारा

रिपुकरीं देइ जयचन्द । स्वातंत्र्य दिल्लि नगरीचें
करि पिसाळ अर्पण यवना । स्वातंत्र्य महाराष्ट्राचें
विकियेलें नन्दकुमारें । स्वातंत्र्य वंगदेशाचें
स्वार्थाला वश होवोनी
पोंचविती हे निज जननीं
कौतुकें स्वतां परसदनीं
ती खनिच निराळी राही । वेगळाच तो जनिताही

नच कोणी बाहुबलानें । जिंकिलें भरतखंडाला
नच कुणी पारतंत्र्याच्या । पंकांतें बुडविलें त्याला
नच कुणी तया निजमतिनें । पारखें करी अन्नाला
दुर्दैवमिषें अवतरले
अपुलेच जिवात्मे असले
त्या कारण खल हे सगळे
आजही अशा या समयीं । अनुभवा तेंच कीं येई

कुठवरी उपेक्षण आतां । ह्या निरुपम खल बीजाचें
हे कंटक साधुपथाचे । पथदीपक परि शत्रूचे
निर्मूल झणिंच होईल । तरिच पुढें दिन सौख्याचे

कर्तव्य हेंचि या घडिचें
प्रत्येक हिन्दपुत्राचें
आजला खऱ्या भक्तीचें
परसत्ता राहिल राहो । पण नको बीज हें क्षणही
दुर्दैव हिंदभूमींचें । अजुनीहि संपलें नाहीं

२१

## याचना

वाजवी मुरली
कान्हया ! अशा रम्य कालीं
सुधाकर भुवनीं
फेंकितो । चन्द्र नभीं बसुनी
बघसि हें नयनीं
अचलसा । वरी मान करुनी
तुज न का हृदयीं
वाटतें । कांहिंच या समयीं
नादकर गगनीं
फेंकि रे। तूंहि महीवरुनी
चन्द्रमा हंसुनी
लाजवी । तुझी स्नेहधरणी

विसरुनी अपणा
　　विलोकीं । तीहि चंद्रवदना

जणूं या भुवनीं
　　नाहिं रे । हृदयरम्य कोणी

हंसे तो ह्मणुनी
　　मानसीं । भाव असा धरुनी

तरि मुका अजुनी
　　खेळतें । तुझिया काय मनीं

ऐक रे ऐक
　　माधवा ! घुमवि नाद एक

भुवन कीं गगन
　　पाहुं दे । जगा थोर कवण

## २२

# आरसा

[ पोवाड्याच्या चालीवर ]

तूं अससि कोण कोठला ?
तव कीर्ति काय उज्ज्वला ?
तूं कुण्या मिषें अवतरला ?
बघ वळुनि जरा मागुती । विनति संप्रति । जोडुनी पाणी
महाराष्ट्रा ! तुझिया चरणीं

बाहेरी धूलीमधुनी
विक्रमें येशि त्या क्षणीं
बैसुनियां सिंहासनीं
चहुंकडे त्रिखंडावरी । भानुच्यापरी । तळपसी धीरा
तो तूंच काय गंभीरा ?

लागता माग शंभूचा
ठाकला दूत शत्रूचा
सामोर उभा विप्राच्या
सुत ह्मणुनी तो त्या क्षणा । बसे भोजना । एक ताटांत
तो तूंच काय अजि दिसत ?

करि–चरणीं दोषाविणें
जनकास दिलें शंभुनें
तरि वाहि रामपदिं जिणें
जागला साहुनी हाल । खंडोबल्लाळ । राष्ट्रधर्माला
तो तूंच काय या काला ?

ज्ञानेश तुकादिक नाथ
तुज बघुनी दीन अनाथ
जिव वेंचुनि करिति सनाथ
श्रीसमर्थ तेंवि अनन्य । ओपि चैतन्य । रोमरोमांत
तो तूंच काय सांप्रत ?

वसईस फिरंगी प्याला
तयिं फोडुनि त्या उदराला
बाहेर काढिलें तिजला

शत्रूस करुनि हैराण ! उडवि धुळधाण । चिमाजी वीर
तो तूंच काय अजि शूर ?

प्रतिध्वनीच दोषी दिसतां
देहान्त शासना वदतां
मुळिं न भी त्यजुनि जी व्रता
ती न्यायीं, सम वैखरी । श्रवणभीतरीं । घुमतसे अजुनी
तो तूंच काय अजि भुवनीं ?

टाकुनी दर्भ हातिंचा
स्वीकार करी शस्त्राचा
परि ध्यास ब्रह्मकर्मांचा
अरुणोदय रणिं जंव होइ । अर्घ्य जो देइ । शत्रुरक्ताचा
तो तूंच काय अजि साचा ?

चौखूर वारु उडविला
बंगाल पायिं नमविला
हा शूर रघू भोंसला
शिशु अजुनी जइं रडतसे । 'रघुजि का दिसे' । वदति त्या युवती
तो तूंच काय अजि जगतीं ?

बलवन्त शत्रु चौफेर
विखुरला देश सामोर
स्थिति जरि ही परम कठोर
संताजि धनाजी थोर । करुनि रण घोर । उधळिलें त्याला
तो तूंच काय वद बोला ?

जणुं बारभाइ पाहतां
तरि राजनीतिनिपुणता
पटविली जगा सर्वथा
पेशवा सवाई ह्मणुनि । दावि निर्मूनि । यशा उजळीलें
ती तूंच काय या वेळे ?
वरिं स्नेहरूप खानाचें
अंतरीं गरल द्वेषाचें
हें येइ ध्यानिं शिवबाचें
खल भेटिस येतां क्षणीं । तसें चालुनी । चतुरता दावी
तो तूंच काय या समयीं ?
परधर्मिं लाभ विभवाचा
निज धर्मिं घात जीवाचा
परि भूप आर्यधर्माचा
रिपुकरीं प्राण दीधले । सुखें आपुले । धन्य संभाजी
तो तूंच काय रे आजी ?
झगडली पारतंत्र्याशीं
तिळमात्र भी न जीवासी
जी खाण शौर्य धैर्याची
स्त्री मृदुल भाव फेंकुनी । लक्ष्मी राणी । रणीं जणुं वीज
तें तूंच काय अजि तेज ?
प्राण ये राष्ट्र कंठाला
तरि मर्द बापु गोखला
अंतावरि रणिं झुंजला

ती छाती निधडी परा । भिववि थरथरा । ऐकतां केव्हां
तो तूंच काय रे येव्हां ?

हा धरुनि पुढतिं आरसा
गत आत्मरूप बघ कसा
मग लावि आजचें कसा
भिन्नता आलिया दिसुनि । करी निज मनीं । विचारा कांहीं
' तो मीच काय या समयीं '

संपेल कधीं झोंप ती
कधिं येइल तुज जागृति
कधिं जाणसि अपुल्याप्रति
भोंवतीं पडे घनदाट । शत्रुपरकोट । जीव रे जाई
तरि अजुनिहि सावध होई

भ्रममुक्त करुनि अंतरा
स्थिरचित्त होइ रे जरा
पदतलिंची बघ मग धरा
निज चरण कोणल्या पथें । चाललों कुठें । कोणता काळ
हें काय गौडबंगाल ?

तूं शूर वीर जातिचा
तूं स्वयं चतुर बुद्धिचा
निःस्वार्थ तसा हृदयिंचा
परि विगुण पतंगापरी । आज भूवरी । विचरिसी सखया
नच ताल बंध तव ठाया

तेंच तें तुला कथण्याचा
घेइ हा दोष रसिकांचा
तरि तेंच गाइ अजि वाचा
महाराष्ट्रा ! जाण साचार । हृदय तूं सार । जीवितामार्जी
तूं सदन आमुचें गाजी

वैभवीं चढसि ऐक्यानें
धूळींत मिळसि कलहानें
—पण नकोच तुज हें कथणें
जरि पुढति विभव इच्छिसी । तरी मानसीं । चित्र हें पाही
त्यापरी चाल लवलाही

## २३

# वैचित्र्य

[ नोहे हा पवन० या चालीवर ]

खेळतसे सकळिकींच विविधता खरी
ह्मणुनि जीव जीवनांत दिसुनि ये तरी

जरि रजनी तीच सतत
विमल, कृष्ण भेद वसत
सान थोर चन्द्र रमत
तारकांतरीं

वृक्ष, लता, फलें फुलें
पुष्करिणी, कुंज डुले
उपवन तें तरिच खुलें
विफल नातरी

एक रंगि चित्र जसें
एक सुरी गीत तसें
काय मना रुचत असे ?—
—विकलता धरी

एक रडे, एक हंसे
एक रुसे, एक पिसें
कोणि कुणा पुसत नसे
हीच माधुरी

एकांतिल विविधपणा
विविधतेंत एक गुणा
चारुतमा ही घटना
गुंग मति करी

विविध गुणी मनुजपणा
जगत तिथें करि नमना
अमरताहि गाइ गुणा
अमर जोंवरी

२४

# ध्यास

[ सुरा सुरा जणुं० या चालीवर ]

नको आडवा येउं माधवा ! कर जोडुनिया सांगतसे
तुझीच राधा कशास बाधा मग चिंतेची मनीं वसे

अंतर्बाह्यीं एकच माधव माधवमय हें जग सगळें
त्यांतचि निशिदिनिं गुंग होउनी मानस माझें बघ खेळे

जवळि राहि वा दूर असे तरि तुझीच हृदयीं विचारणा
मुळिं जाणेंना मुळिं ठावेना विचार दुसरा तुझ्याविना

कसल्या वृत्ती जगांत रमती कुणास ठावें जरा तरी
जिकडे तिकडे माधव माझा दिसतो मजला निरंतरीं

स्त्रीहृदयाच्या चंचलतेचा संशय येई काय तुला
ह्मणुनि अडविसी अशुद्ध मार्गे सोडुनि सुपथा असें मला

उपवनिं फिरतां जलीं विहरतां हितगुज करितां हृदयाशीं
तुझीच मूर्ती सदैव भंवतीं फिरती मन्मन बघण्यासी

तदा न असलें अतांच कसलें मनिं उद्भवलें तुझ्या पिसें
दोष तुझा हरि ! यांत न तिळ परि स्त्रीहृदयाचें वृथा हंसें

खरेंच कथणें तरीहि वचनें हंसेंच आणी तव करणी
राधामाधव-लीलालाघव ह्मणुनिच वानी कवि-वाणी

[ श्लोक ]

ओष्ठीं हंसें मधुरसें विलसे नितान्त
कीं चन्द्रकोर खुलली गगनिं प्रशांत
येवोनि माधव वदे तंव राधिकेसी
‘ स्वप्नीं असें नवल तें कसलें पहासी ?’

२५

# श्रीशारदावंदन

[ झंपा ]

नमन मम तिज असो माउली शारदा

विमल हृदयापरी
धवल वसनांकिता
मधुर चंद्रापरी
स्मितमुखी सर्वदा

घेइ वीणा करीं
गाउनी सुस्वरीं
नाद मंगल भरी
स्थिरचरीं कामदा

रामचरितांबुजीं
आदि कवि मधुप तो
गुंगुनी रंगुनी
प्रकटवी तोषदा

तीच शुभदायिनी
आर्य भूनंदिनी
स्नेहमंदाकिनी
होउ अजि सौख्यदा

२६

## स्वयमेव

[ श्लोक ]

सदय ह्रदय राही जातिचा जो जगांत
सम विषम कशाही कालिं तो शांत दांत
जलधर घन वर्षो वा न वर्षो उदंड
शुचितम अयि गंगा जेंवि वाहे अखंड

२७

## वीराची बडबड

[ नृपममता रामावरती० या चालीवर ]

येऊं दे कुरुसेनेला
तूं इतुकी भीसि कशाला । उत्तरे

मी शूर वीर जातीचा
काय त्या पाड शत्रूचा । मजपुढें
भट भीष्म, द्रोण ते असती
मज बघतांक्षणिं नत होती । मजपुढें

ते कौरवसुत बहु भाषी
यमसदनीं जाती निमिषीं । मजपुढें
अर्जुना
येउं दे रणा
पाहि त्या क्षणा
बांधुनी अणितों
तो काय शौर्य मिरवीतो । मजपुढें

राहुं दे उभा मज समरीं
मग चमत्कृती बघ सारी । उत्तरे
बघशील शत्रुसंभारा
पळतांना रणिं माघारा । उत्तरे
जयनाद दिशा गातील
सुमवृष्टि देव करतील । उत्तरे
दिनमणी
एकला गगनिं
जेंवि तळपुनी
जगाला दिपवी
जयशाली उत्तर तेंवी । उत्तरे

जिरविण्या शत्रुचा माज
हा समर्थ एकचि आज । उत्तरे
वृद्ध रथी जवळिं न कुणिही
नच राहो, परवा नाहीं । उत्तरे

दुरि जनक जाइ समराला
बरवेंच वाटतें मजला । उत्तरे
जोंवर
सजिव भूवर
असे उत्तर
तुझा हा भ्राता
तोंवरी कशाची चिंता । उत्तरे

फुरफुरति बाहु समरासी
जा आणी शस्त्रास्त्रासी । उत्तरे
जा त्वरें सांग कवणासी
वाजविण्या रणभेरीसी । उत्तरे
रथ विजयी जोडायासी
दे आज्ञा त्या सूतासी । उत्तरे
पळुनियां
शत्रु गेलिया
धरुनि मम भया
नतरि या वेळे
बोलेल काय जग बाळे । उत्तरे

झणिं पंचारतिला उजळी
प्रेमानें मज ओंवाळी । उत्तरे
ओंवाळिणि घाली तुजला
कुरुकुलिंच्या साम्राज्याला । उत्तरे

अर्पितो अंधपुत्रांस
तव वचना झेलायास । उत्तरे
जिंकिलें
तसें तुडविलें
आपुल्या बलें
जाण शत्रूला
निश्चित ठेवि हृदयाला । उत्तरे

[ श्लोक ]

बडबडुनि असें हा वीर जाई रणाला
अनुभविं उमजे त्या कीं न ही नाट्यशाला
समरिं समरलीला नाटकीं नाट्यलीला
परि कुठुनि कळें हें मूढ ऐशा जिवाला

२८

## खुळा चांदोबा

सुन्दर दिससी नयनांला
ह्मणुनी बघतों अम्हि तुजला
चेंडुपरी तूं गोल कधीं
इन्द्रधनूपरि कोर कधीं
चन्द्रा ! चन्द्रासम अससी
तुझी न तुलना कवणाशीं
कितीहि रडतां मूल दिसे
तुज दाखवितां क्षणीं हंसे

अह्मां मुलांचा गडी खरा
सदा रिझविसी तदंतरा
विचारितों पण मी तुजला
खरें तेंच कीं सांग मला
कुठेंहि दिसतां पाण्यासी
डोकावुनियां कां बघसी
दर्पण समजुनि का त्यासी
स्व-रूप सुन्दर विलोकिसी
शांतपणें तें पण तुजला
पाहुं न दे क्षण स्वरुपाला
इतुकेंच न तें उलट परी
सौन्दर्या तव छिन्न करी
तरी पुनरपी त्यापाशीं
स्वरूप बघण्या रे जाशी
सदा सदा जो धि:कारी
अपमानातें व्यर्थ करी
त्याच्या जवळीं बघ पुढतीं
मुलें न फिरुनी कधिं जाती
मुलां कळें जें बालपणीं
तेंहि न जाणसि का अजुनी ?
कितीहि असला रूप गुणी
जगा नावडे खुळा कुणी

२९

# फुलांचें संमेलन

[ दिंडी ]

विविध रंगी अभिजात रंगलेलीं
सुगंधाला उधळीत अंतरालीं
चित्तकोशा उकलीत पवनराया
अशीं सुमनें तीं मिळति एक ठाया

उभारणि त्या आकाशमंडपाची
तरुस्तंभावरि रम्य भव्यतेची
छत्र शोभे त्यावरी चंद्रिकेचें
तया भंवतीं आवरण वसन्ताचें

रूप सलिलीं शशि अविच्छिन्न पाही
शांति इतुकी निरखितां दिशा दाही
अशा समयीं सानंद एकमेकां
काय वदती कौतुकें तें विलोका

एक बोले, खेळुनी बालकांशीं
बाल लीला घेईन अनुभवासी
मौज लुटुनी मधु बाल संगतीची
आस पुरविन मनसोक्त अंतरींची

जाउनी ह्या आकाशमंदिरांत
तिथें पुष्पें जीं रुचिर विलसतात

तयां निरखिन किति रूप गंध वास
एक बोले, मनिं हीच एक आस

रुचिर रमणींचे भूषवोनि केश
मधुर खुलविन सौंदर्य तें विशेष
ललित दृष्टीं जगतास लोभवीन
एक बोले, नच हेतु तयावीण

जलीं लहरी करितात जलविहार
तसें विहरिन होउनी जलतुषार
तलीं मीनां भेटुनी वरतिं यावें
एक बोले, जलबिंदुसह रमावें

अमर कविचें जगिं अमर काव्यगीत
हृदय केव्हांही तोषवी नितांत
अशा कवनीं विहरेन सुखेनैव
एक बोले, प्रिय हेंचि मम सदैव

विहंगासम संचरुनि गगनधामीं
भुवन-शोभा पाहीन सर्वगामी
जगत सगळें का फुलांसारिखेंच
एक बोले, अंतरीं एक हेंच

राजमुकुटीं बैसुनी भूपतीच्या
घेइ सन्मानें वंदना प्रजेच्या
बघिन डौलानें जगा एक बोले
तरिच मानिन मम धन्य जनन झालें

विखरुनीया अधिराज्य सुगंधाचें
निमिषिं नंदनवन करिन यमपुरीचें
गर्व परिहारिन दुष्ट अंतकाचा
एक बोले, हा हेतु मानसाचा

मुग्धकलिका फुलवीन जीविताची
हांसुनीया हंसवीन रम्यतेची
मुकी सृष्टी हांसरी करायाची
एक बोले, ही हौस मन्मनाची

प्रथम मीलन मांगल्य विवाहाचें
वधुवरांचें नव दिव्य जीविताचें
कार्य सुफलित त्या करिन विधात्याचें
एक बोले, जगिं हेंचि इष्ट माझें

करुनि विश्रम जो श्रांत जीव झाला
झणीं मकरंदें शांतविन तयाला
क्लांति हरुनी चैतन्य विस्तरावें
एक बोले, मन्मना हेंचि ठावें

सकल सुमनां मिळवीन एक जागीं
होउनीया जणुं एक जीवभागी
फुल्ल हृदयें रिझवीन जनमनास
एक बोले, सारिखा हाचि ध्यास

त्रस्त जीवाचा ताप वारण्याला
उचित दिसलें वेंचणें जीविताला



20282

सुखें घडिला त्या करिन त्याग त्याचा
एक बोले, हा हेतु मानसींचा

जन्म दिधला जगिं मजसि हा जयानें
होय कौतुक मम सतत ज्या कृपेनें
ईशचरणीं त्या वाहुनी जिवा या
एक बोले, ही करिन धन्य काया

एक बोले, स्वातंत्र्य जीवनाचें
मुळिं न केव्हां वाहीन पदिं कुणाचें
सदा राही स्वच्छंद हा असाच
नसे मनिषा यावीण अन्य साच

कुणी कांहीं बोलती कुणी कांहीं
याचपरिनें हृदयिंचा भाव भावी
सभा तदुपरि निःशब्द शांत होतां
तोंच जागवि रव एक निखिल चित्ता

" पतित जीवां देखुनी जो स्वभावें
उद्धरीतां कळवळुनि मनोभावें
जाइ फासावरि लटकण्यासि जेव्हां
कंठ त्याचा मी गाजवीन तेव्हां "

वचन सरतां हें भरतवाक्य गाया
येइ विहगांचा थवा धांवुनीया
शुभद आशीर्वच देइ अरुणवाचा
काय वर्णूं तो थाट मीलनाचा

३०

# जागृति

जाग किं रे आला । गोपाला !
ऐकुनि तुझिया वेणुरवाला
येइल आतां मधुरव कानीं
तिष्ठत बसतां मधुराशांनीं
विकसित होई मन घडिघडिनीं
नाद परी कुठला । गोपाला !
विहरत गगनीं जंलधरमाला
चातक उघडी मुखकमलाला
मुख उघडें परि मेघ पळाला
होय तसें मजला । गोपाला !
काय करावें कांहिं सुचेना
हृदयोत्सुकता मुळिं थांबेना
ह्या आंदोलीं मति झुलतांना
स्नेहशशी नटला । गोपाला !
किरणजलीं त्या सचैल न्हालें
मोदरसीं त्या गुंगुनि गेलें
हर्षलहरिवरि मन तरंगलें
बहर नवा फुलला । गोपाला !
नाहिं निराशा मम हृत्कोशीं
आशेचें साम्राज्य विलासी

रवि-मंडलिं रवि-कांतिच जैशी
  जीव न हा दुबळा । गोपाला !

हृदयिं वेणुरव रक्षी अपुला
तसा जिवाहुनि अजवरि जपला
जो जीवाशीं समरस झाला
  तो हृदयीं घुमला । गोपाला !

नादामधिं त्या लोचन मिटती
पार हरपली उत्सुकता ती
क्षण स्थिति ही परि हाय पुढतीं
  जाग किं रे आला । गोपाला !

नंदनवनिंचें विजनीं यात्रें
कलशिं सुधेचें विष कीं व्हावें
विसतंतू यमपाश गमावें
  त्यापरि या घडिला । गोपाला !

कोण असिस तूं कोठें मी ही
काय भंवतिं मम नकळे कांहीं
काय बघे वा अनुभवि येई
  जीव पुरा भ्रमला । गोपाला !

त्या नादाहुनि निनाद तव हा
नीरस, भेसुर नुपजवि स्नेहा
कोठें पिक तो काक कुठें हा—
  वृत्ति करी विकला । गोपाला !

वाजवाजवुनि ह्या वेणूसी
कशास मन्मन जागृत करिसी
गोड सुषुप्ती माझी मजसी
आण तुझी तुजला । गोपाला !

## ३१
# संग्राम

[ पोवाड्याच्या चालीवर ]

संग्राम अतां कोठला
मित्र जाहला । शत्रु जेथें
खड्गाग्र उलटुनी छेदि आप्तकंठातें
संग्राम मुक्तिलाभासि
होइ शत्रूशिं । आजवरिचा
जल शैल भेदुनी मार्ग काढि गमनाचा
जल जलासि अडवी पथीं
दिसे संप्रति । नवें नवल
हें बघुनि हंसे गिरि उभा पुढतिं जो अचल
सुन्दोपसुन्द–संग्राम
देइ आराम । काय हृदया
ह्मणुनीच नाचते छातीवरि जग तुझिया
स्वातंत्र्य–कल्पना अतां
विसर भारता । अंतरींची
पळ घटिका मोजित वाट पहा मरणाची

## ३२

# राज्याभिषेक

[ उद्धवा शांतवन० या चालीवर ]

तो कुठें शिवाजी राजा । अभिषेक-महोत्सव कुठला
ते वेदमंत्रही कुठले । तो समर्थ-झेंडा कुठला
तें छत्र लोकगंगेचें । कुठलें जगिं तळपायाला
भाग्याचा, स्वातंत्र्याचा
आशेचा, मांगल्याचा
कुठला तो दिन सोन्याचा
सकलही लया तें जाई । आज हें ललाटीं येई
त्या समरदुंदुभी आतां । ये कुठल्या ऐकायाला
जयनाद मेघगंभीर । तोफांचा अजि तो कुठला
जयकार भाटबंदीचा । अजि कुठला गर्जायाला
चौखंड नाद दुमदुमला
दुमदुमुनि निनादित झाला
तो पावे अमरपदाला
आजही अशा कटु समयीं । चैतन्य तोच कीं देई
तो भव्य गडांचा हार । शोभाया कुठला आतां
ते मुजरे रणमर्दांचे । अजि कुठले पाहूं जातां
परदेश भूपमंत्र्यांची । अजि कुठें लीनता बघतां
अंबेची थोर कृपा ती
येइ हा भाव निज चित्तीं
स्मित खेळे जें मग ओठीं

तें मधुर हास्य हर्षाचें । अजि हाय ! कुठें दिसण्याचें

करिं राजमुकुट तो घेतां । जाहलें स्मरण भूपाला
त्या शूर समरगाजींचें । जे समर्पिती प्राणांला
अश्रूंचा सागर नयनीं । निमिषांत तुफानी झाला
त्या वीरात्म्यांच्या ज्योति
रत्नमिषें चमकुनि मुकुटीं
जणुं हृदयपूर्ति प्रकटविती
हें बघुनी सागर आला । भेटाया निज लडिवाळा

सानंद नयनपात्रानें । अभिषेक तदां जो होई
वीरांच्या त्या स्मृतिवरती । हृदयिंच्या मूकमंत्रांहीं
तोचि खरा महाराष्ट्राचा । राज्याभिषेक शुभदायी
ह्या परम दिव्य कथनास
कुणि न कथी जगिं इतिहास
बहु नवल गमे हृदयास
वाग्देवी ‘आनंदा’ची । म्हणुनीच गीत हें गाई

३३

## खेळकर मुलास

[ मज मदनें फसविलें० या चालीवर ]

उचित पदीं ठाकला
कृति होवो उज्ज्वला

चेंडु पतंगा खेळायाचें
हरिणशिशूपरि बागडण्याचें
वय न तुझें हें स्वैरपणाचें
तो दिन रे हरपला

याच वयीं रे धनुला भंगुनि
मिळवी रघुपति सीता रमणी
विक्रांतांना लज्जित करुनी
धन्य जगीं जाहला

याच वयीं रे श्रीभगवंतें
संहारुनिया कंसखलातें
निष्कंटक करि साधुपथातें
धन्य जगीं जाहला

याच वयीं रे त्या शिवबाचें
तोरण झळके विजयरवीचें
पाश झुगारुनि परवशतेचे
धन्य जगीं जाहला

परवश ऐशा भूमीवरती
जन्म दिला तुज देवें जगतीं
ह्मणुनि काय मनिं वाटे खंति
समज परी हा खुळा!

परवश कालिंच पौरुष-जीवन
स्वतंत्रतेमधिं सुखांत मज्जन

जग अजवरिचें करि अवलोकन
दिसुनी येई तुला
परवश–पंकीं जन्मा येशी
भाग्यवंत तूं खराच दिससी
करी विक्रमें सुखी जननिसी
कमलदला बघ मुला

## ३४

## हृदयपुष्प

[ तरुण कुलिन गोरा० या चालीवर ]

किතितरि शोधियलें माधवा ! किතितरि शोधियलें
तरि नाहिं गवसलें फूल एकही जरि उपवन फुललें
किति विविधरंगि बेरंगि फुलें नवनवीं
नुकतींच उमलुनी दाविति अपुलीं छवी
लडिवाळपणें मृदु पवन तयां डोलवी
मोहुनियां गेलें माधवा ! मोहुनियां गेलें
परि हृदय दिसेना सौंदर्यानें तयां लोभलेलें

आस बहू मोठी माधवा ! आस बहू मोठी
कीं हार फुलांचा रुचिर मधुर तव घालावा कंठीं
ताटवे फुलांचे सगळेही हिंडुनी
प्रत्येक फुलातें देखियलें निरखुनी
परि मनापरी तीं येति न मुळिं लोचनीं

निराशाच पुरती माधवा ! निराशाच पुरती
गंगेंत पोहुनी शुष्क रहावें कीं जैसें अंतीं
जगताची रीती माधवा ! जगताची रीती
का अशीच सगळी होउं नये कधिं हृदयाची पूर्ति
विसरेल कालही कालपणा दर्शनीं
जें नित्य सुगंधें टाकि तया मोहुनी
सौंदर्य तया जें नमवि पदालागुनी
मनिषा ही चित्तीं माधवा । मनिषा ही चित्तीं
ह्या अशा फुलांचा हार तुझ्यास्तव गुंफावा हस्तीं
फिरुनी कधिं तुजला माधवा ! फिरुनी कधिं तुजला
कीं घालायाचे श्रम नच व्हावे हार दुजा कसला
पण मलाच वध जें तोष मुळीं देइना
तें हर्षवील रे कैसें तुझिया मना
मग गोष्ट पराची बोलतांच येइना
शुचितम हृदयाला माधवा ! शुचितम हृदयाला
संतोष देइ जें तेंचि हर्षवी साऱ्या जगताला
विचार करि हृदयीं माधवा ! विचार करि हृदयीं
जें एक फूल लाधलें सुदैवें, जें अपुल्या ठायीं
जें विसरवि काला-कालपणा दर्शनीं
जें नित्य सुगंधें टाकि तया मोहुनी
जें सौंदर्यें त्या नमवि पदालागुनी
शेवटिं या समयीं माधवा ! शेवटिं या समयीं
तें हृदयपुष्प तव चरणिं वहातें गोड करुनि घेई

३५

# श्री तिलकस्मृति

अजि धन्य दिवस भाग्याचा
उगवला भरत खंडाचा
स्मरणीय तिलक–स्मरणाचा
त्या थोर जिवाचें स्मरण । करित दिनरमण । येइ दिग्प्रांतीं
उधळीत गुलाला हस्तीं

खलमणी कंस नामाचा
करि घोष कोणती वाचा
दावुनी भाव हृदयाचा
श्री नाथ कृष्ण भगवंत । मुळिं न ज्या अंत । तया जग ध्याई
श्री तिलक नाम जगिं तेंवी

यदुराज कृष्ण–गुणलेश
कधिं गाइ काय खल कंस
कोणता कथी इतिहास
प्राणांतावरि निंदिलें । आपुल्या बलें । त्यापरी तिलक
धि:क्कारी रविला वृक

जो पारतंत्र्य–तिमिराला
नाशाया सज्ज जहाला
तो कसा रुचे खलमतिला
फुंकरा मारुनी प्रबल । चेतवी अनल । आत्मतत्त्वाचा
तो धन्य तिलक नर साचा

वंदिलें साधु सन्तांला
खंडिलें अनयवन्तांला
हा दावि मार्ग जनतेला
तो पुरुष धन्य जाहला । तुह्मां आजला । उद्धरो स्मरणीं,
परवशता पंकामधुनी

३६

## हरिस्मरण

कां न ये
अजुनि हरि सये
निघाला म्हणसी
मग कुठें गुंतला वाजवीत वेणूसी

एकलें
तया सोडिलें
कशाला बाई
तुज काय तयाची रीत ठाउकी नाहीं

वांसरी
असलियावरी
कुणाची पर्वा
कुणि हंसो रडो त्या कांहिं न वाटे जीवा

जोंवरी
संगतीं हरि
तोंवरी अपुला
मग नसे कुणाचा, अनुभव हा सकलांला

सोबती
तयाला किती
मुळीं नच गणती
नच कुणा हवा तो, तळमळती हरिसाठीं

बोलिला
तसें विसरिला
कुठें तरि रमला
चल तुला दावितें सत्य माझिया बोला

नवतरंग
करुनि जल भंग
निघुनिया जाई
पट पूर्ण जलाचा, हरि–मानस गे तेंवी

* * *

मुखिं वचन
काढितां मुळि न
निमुट गे पाही
खेळांत तयाची वृत्ति दंग कशि राही

वाजवी
तसें नाचवी
वासुरें गाई
बघ जरा दिसे का भान कशाचें कांहीं

स्वच्छन्द
असे गोविन्द
वायुहुनि बाई
नेणतो स्मरण हरि स्मरण जगाचे ठायीं

३७

## ललितसंगम

परडी भरली पुष्पें सरलीं तरी ललित ललना
उद्यानांतुनि जाति न कैशा अजुनी निज सदना

फुलतिल आतां विमुग्ध कलिका जाणुनि का हृदयीं
कुतूहलें त्याकडे विलोकित फिरति ठायिं ठायीं

ललित उपवनीं ललित समय तो संध्यारागाचा
ललित सख्यांसह सहल करी जणुं विलास शांतीचा

ललित मनाच्या ललितपणाच्या ललित ललित गोष्टी
एकमेक हांसऱ्या मुखानें स्वैरपणें करिती

हृदयामधल्या आनंदाचा दडलेला गाभा
ललितपणें उघडुनी दाविती जीवाची शोभा

फुलल्या पुष्पीं खेळ खेळतो मृदुल पवन जेंवी
ओष्ठदलीं स्मित खेळुनि नाचति ललित बोल तेंवी

ललित चालणें ललित पाहणें ललित हांसणेंही
ललितमूर्ति त्या ललितारामीं विधि जणुं अवतरवी

ललितावर्णीं ललिताभरणीं ललितभाव रमणी
विस्मित होती हंसति न कलिका अजुनि कशा ह्मणुनी

हंसऱ्या जीवा हंसेंच भंवतीं विलसावें गमतें
रुष्टपणा कवणाचा कैसा रुचेल मग त्यातें

बघुनि निराशा प्रसन्नतेची विरस मना होई
हास्य पळालें ओंठावरलें मुग्धपणा येई

तोंच चिमुकल्या कळ्या हांसल्या सुगंध दरवळला
ओंठांच्या पाकळ्याहि फुलल्या उडुगण लुकलुकला

ओठ कोणते, कळ्या कोणत्या, ललित मधुर कोण ?
माधुर्याच्या ललित संगमीं करिल तुला कोण !

## ३८

# " कहां राजा भोज ? "

( माझी ' फकीर ' ही कविता प्रसिद्ध झाल्यावर " राष्ट्र-कल्याण फकीरा-कडून होत नसून ' अमीरा'कडून होतें " अशा विचाराची कविता कवि ' वसंतविहार ' यांनीं लिहिली. त्यानंतर " फकीर आणि अमीर हे दोघेही राष्ट्राचा उद्धार न करितां ' वीर ' करितो " अशा भावाची कविता कवि ' सरोजसुहृद् ' यांनीं लिहिली. त्यांना हें उत्तर आहे. )

[ उद्धवा शांतवन० या चालीवर ]

तो 'फकीर' फकीरच राही । ते असती 'वीर' 'अमीर'
सुम गुलाब जगतिं फकीर । कोराटी वीर अमीर
तो प्रशांत अब्धि फकीर । ते निर्झर वीर अमीर
रवि फकीर चंड प्रकाशी । दीपक ते वीर अमीर
रत्नाची कांचमण्यांशीं
तुलनाच करितसां कैशी
हा संभ्रम जड बुद्धीसी
वनराज सिंह तो कोठें । गजगती अश्व ते कोठें

ज्यापरी एक आकाश । भूषविते सकल जगास
ज्यापरी एकला पवन । जगता दे जीवनदान
ज्यापरी एक परमेश । आधार जीवमात्रांस
त्यापरिच धीरगंभीर
करण्याला जगदुद्धार
जगिं समर्थ एक फकीर
फकिराविण या जगताचें । पोरकें जिणें विभवाचें

अमिराच्या त्या अमिरीला । कांहिं तरी गणती राही
वीराच्या वीरत्वाला । मर्यादा दिसुनी येई
उत्कर्ष तसा उच्छेद । विधि लिही तयांच्या दैवीं
फकिराच्या परि फकिरीला
गणती वा मर्यादेला
मुळिं नसे बंध तो कसला
तो फकीर फकिरी त्याची । त्रैलोक्य शिरीं निज घेई
ती कुवेरता अमिराची । जेधवां दीनता घेई
तें जयी खड्ग वीराचें । ज्या समयीं हतबल होई
अंधारीं उघड्या नयनें । उभयतां सुचेना कांहीं
तैं फकीर पुढतीं येई
पट तिमिर झुगारुनि देई
धवलांकित जगती दावी
रजनीस छेदुनी उजळी । रवि दिव्य ज्योति जगिं जेंवी
उत्कर्ष परम विभवाचा । जाहला जरी अमिराचा
जरि प्रभाव त्या वीर्याचा । शिखरास जाइ वीराचा
वळतसे तरी का तेव्हां । जगहितार्थ ओघ तयांचा
कीं उलटा तापद होई
अनुभवीं कोणतें येई
इतिहास काय दे ग्वाही
तें तदांच घडुनी येई । जो राही हृदयिं फकीर
कोणत्या जगीं अमिरानें । निर्माण फकीरा केलें
कोणत्या जगीं वीरानें । निर्माण फकीरा केलें
वा वीर अमीर मिळोनी । निर्माण फकीरा केलें

परि रघुपति गाधीजानें
धर्मार्जुन श्रीकृष्णानें
चन्द्रगुप्त कौटिल्यानें
निर्मियले वीर अमीर । ऐसा हा धन्य फकीर

शिरिं भार जटेचा विलसो । वा राजमुकुट सोन्याचा
दिन कंठो गिरिं, कांतारीं । वा विहार प्रासादाचा
तो राहो पवनाहारी । वा भोक्ता मिष्टान्नांचा
परि फकीर जो हृदयाचा
तो फकीर आयुष्याचा
मग असो कुण्याही स्थितिचा
शुक, जनक, कृष्ण भगवंत । दुमदुमति 'फकीर' 'फकीर'

जगिं परिस्थितीच्या योगें । कुणि होई मनुज अमीर
जगिं परिस्थितीच्या योगें । उद्भवे तसा कुणि वीर
परि परिस्थितीच्या योगें । होइना कधींहि फकीर
तो चित्तभाव जातीचा
स्वयमेव खऱ्या हृदयाचा
बाध न त्या स्थल-कालाचा
हृदयींचा जो न फकीर । तो कैंचा वीर, अमीर

मथुरेचा कंस नृपाल । किति राही थोर अमीर
तैसाच गाजला लोकीं । बलशाली तो नृप वीर
कां होउं नये त्याकरवीं । जगताचा मग उद्धार
सान थोर त्याला भुवनीं
धि:कारिति परि कटु वचनीं
त्या समयापासुनि अजुनी

का कृतघ्न इतुकें जगत । करि उगिच कलंकित चरित

कोदंडशरांचा समरीं । भडिमार सारखा चाले
रणनिपुण उभयतां वीर । यश अपयश घेई झोले
इतक्यांत पुढतिं कर्णाच्या । याचकें करा पसरीलें
त्या कवचकुंडला याची
दीप्ती जी तनु–जीवाची
तरि करि तैं पूर्ति तयाची
मृत्युही सुखें स्वीकारी । तो कोण खरा नरवीर

महाराष्ट्र–भूप शिवबाचें । अमिरीचें जीवन सगळें
तैसेंच तयाचें जगतीं । वीर्य तेज अनुभवि आलें
राष्ट्राच्या मग कल्याणा । तेंच काय कारण झालें
परि मुकुट श्रीगुरुपायीं
जीवनासवें जो वाही
त्यामाजि मर्म तें राही
होइना शक्य केव्हांही । फकिराविण राष्ट्रोद्धार

झोपेला जागें केलें । जणुं दिलें जडा चैतन्य
करि निर्भय भीरुपणाला । झाडुनी मनोमालिन्य
वीर्याचे ठायीं ठायीं । निर्मियले वीर अनन्य
दाविली निराळी सृष्टि
आणिलें भावफळ दृष्टि
तो तिलक कोण या जगतीं
जणुं तिलकच सौभाग्याचा । कां होय हृदयसम्राट

धैर्याचा निश्चल मेरू । तो फकीर जगतामाजी
देवताच चैतन्याची । तो फकीर जगतामाजी
दीनांचा केवळ देव । तो फकीर जगतामाजी
जो फकीरींत आनंद
जो फकीरींत सुखकंद
जो फकीरींत मधुछंद
त्यापुढें तुच्छ कैवल्य । तोचि करी जगदुद्धार

मुळिं विषय न हा वादाचा । स्पर्धेचा वा तुलनेचा
जगिं फकीर, वीर, अमीर । हा भेद मात्र रूपाचा
तो दृढतर एकच पाया । फकीरीच ह्या सकलांचा
त्याविणें खऱ्या अमिराचें
त्याविणें खऱ्या वीराचें
त्याविणें खऱ्या फकिराचें
वैभव तें लटकें सारें । मग कुठला जगदुद्धार

विभवाच्या शिखरावरती । जग निखिल जरी बसलेलें
अवनतिच्या गर्तेमाजी । लोळतां जरी तें दिसलें
नियमांस तुडवुनी पायीं । बेबंद जरी वा झालें
प्रलयकाल वा जगताचा
होउनी भूतमात्रांचा
जरि नुरे ठाव नामाचा
तरि वटपर्णावरि राही । तो एकच थोर फकीर

"जन्मास तरिच ये जीवा ! जगिं असाच ह्मणवि फकीर"

३९

## सुमना डोल रे

सुमना डोल रे
विहंगमाला चित्तविनोदा
काढिल मग मधु बोल रे
परिसुनि बोल रे
हर्षित होउनि मानस माझें
घेइल समुचित तोल रे
बघुनी तोल रे
जग भंवतींचें विसरुनि जाइल
जीवन अपुलें फोल रे
जगतीं फोल रे
उदारहृदयी उदारतेनें
तयास करि बिनमोल रे
सुमना ! डोल रे

४०

## नादावली

[ ठुमरीच्या चालीवर ]

कुठुनि तरि मुरलिनाद येई । ऐक बाई
अतांवरी गे चातकापरी
वाट जयाची बघसि अंतरीं
तयाचा सहज लाभ होई । ऐक बाई

कुठें बांसरी कुठें श्रीहरि
कुठें खेळती निनाद–लहरी
नको गे विचारणा मुळिं ही । ऐक बाई

होय मनोरथ सफल मनींचा
कशास आतां शंकित वाचा
सुखें ग प्रेमरसीं पोही । ऐक बाई

तृषित समयिं नच बिंदु जलाचा
नसतां पुढतीं घट गंगेचा
तुझें ग थोर पुण्य राही । ऐक बाई

धन्य मुरलिचा धन्य मुरलिधर
विलास करि तव हृदयपटावर
तूंहि गे धन्य धन्य जीवीं । ऐक बाई

[ श्लोक ]

सखी विफल जल्पनीं श्रवणिं ये न नादावलि
ह्मणोनि उचली वरी नयन, नादिं नादावली
विनोदचतुरा सखी परि बघे तिथें कोठली
मुखांत मुरली अशी पुढति मूर्ति ती सांवळी

४१

## मानिनी

[ लावणीच्या चालीवर ]

हा नव्हे तुझा दिनमणी
बाइ कमलिनी
एकिचा ग

उन्मत्तपणें हांससी
जगाला अशी
        कशाला सांग

ह्या उदासीन कुमुदिनी
तुझ्या मैत्रिणी
        जवळि असतां
स्वच्छन्दपणें तुज असें
हांसणें कसें
        रुचे तव चित्ता

का विधिनें नच दीधलें
तुजसि श्यामले
        हृदय देहीं
ह्मणुनीच जगावेगळी
कृती काजळी
        दिसे गे तव ही

त्या हर्ष यदा दाविती
मंदिराप्रति
        नाथ येतां
कां कोपिसि मग त्यांवरी
तदां सुन्दरी
        कृति न निज बघतां

अभिमानिं तुझ्या तरि गडे
काय सांपडे
सत्य कांहीं
बघ नयनिं जरा भंवतिंचें
दृश्य सृष्टिचें
विनति तुजला ही

चैतन्य कसें कणकणीं
राहि खेळुनी
स्वैरतेनें
जणुं विश्वकमल प्रतिदलीं
हास्यमाउली
रमे हृदयानें

गे थोरांचें मानस
जणूं पायस
नंदिनींचें
वा छत्र सकळिकांवरी
अंबरापरी
कल्पवृक्षाचें

कोठली तिथें भिन्नता
अमर चारुता
थोरतेची

मग वृथा अनुभवाविना
करिसि वंचना
साधु करणीची

पण हृदय अदय नच तुझें
तरी जातिचें
मानिनींचें

नच कधीं तया हें रुचे
जरी जीविंचें
कथन कवणाचें

४२

## तुझ्यासाठीं

चल बाइ ग चल बाई
कानीं मुरली–रव येई

चल राधे करि घाई
अजुनि कळेना तुज कांहीं

साज किती चढवीसी
दाविसि तेथें कवणासी

जाशि कशा त्या ठाया
परिसाया कीं मिरवाया

वेणुरवीं नच महती
साजाहुनि या काय रति

कितिक अशी गे हंससी
ठेवी कांहीं तुजपाशीं

बोलुं नको फार गडे
सरतिल सारे बोल खडे

बाजुस त्या बघसि कुणा
ती तर यमुना ये नयनां

थांबसि कां या ठाया
हरिची नोहे, तरुछाया

पद उचली गे उचली
स्थिरता कुठली ही सुचली

तुजसाठिं ग तुजसाठीं
मंजुळ मुरली जगजेठी

* * *

काय तुला गे झालें
मिटसी चंचल हे डोळे

हास्य कुठें लपवीलें
कोपशरांना चढवीलें

बोल अतां बोल गडे
ओठावरचा बोल अडे

साज किती विस्कटला
नीट करी गे आणिं त्याला

काय तुझी तुज महती
मुळिं नच वाटे या जगतीं

हंसतिल गे तुज सगळे
रूप तुझें हें बघुनि खुळे !

जाशि कुठें कवणपथीं
इकडुनि रव ये श्रवणपथीं

थांब जरा थांब तरी
धरणिस लावी चरण तरी

ही घाई कुठलि अशी
माझ्यापुढतीं बघ जाशी

हरि मुरली जाति कुठें
जातां तेथें तुज भेटे

तुजसाठिं ग तुजसाठीं
वेणूमाधव अवतरती

## ४३

# वाजीव रे मुरारी

[ आनंदकंद ऐसा० या चालीवर ]

हृदयींच रंजणारी । वाजीव रे मुरारी

मुरली करांत तुझिया
तव ओठ वाजवाया
सामोर ऐकणारी । वाजीव रे मुरारी

संध्या स्व-रूप खुलवी
शशि-कांति भाव दावी
मधु गंध वायु-लहरी । वाजीव रे मुरारी

तुझिया मुखारविंदीं
स्मित हंस दंग छंदीं
भंवतीं रती विहारी । वाजीव रे मुरारी

सुखिंच्या सुखास मोही
मोहास मोह लावी
क्षण रम्य निर्विकारी । वाजीव रे मुरारी

हें दृश्य संगमाचें
सच्चित्तमंदिराचें
मग कां उगा विचारीं । वाजीव रे मुरारी

वदनीं प्रसन्नता ही
हृदयीं न काय राही
कुणि का वृथा विदारी । वाजीव रे मुरारी

जीवापरीस जपसी
विसरूनि जीवनासी
वध कोण वेणुगौरी । वाजीव रे मुरारी

चिंतानलास पिउनी
ती लीन स्नेहसदनीं
हृद्बंध तोडणारी । वाजीव रे मुरारी

तुज एक चिंतणारी
राधेस जाणणारी
आनंद-देहधारी । वाजीव रे मुरारी

४४

# मारुतास

[ हा हार तुझ्याकरितांच० या चालीवर ]

कोठुनी बोल रे येशी । मारुता
धरिसि कां अशा शांतीसी । मारुता
टाकिलें कुठें गंधासी । मारुता
ही तुझी खिन्न वाणी
जणुं शुष्क झऱ्यावाणी
मन्नयनिं येइ दिसुनी
जाहलें काय चित्तासी । मारुता
कोठुनी बोल रे येशी । मारुता

एकही फूल फुललेंना । काय रे
बांसरी मुळिंच बोलेना । काय रे
हरिवरति कुणी रुसलेंना । काय रे
जलतरंग यमुनेचे
अभिनव नव हर्षाचे
खेळति न तुजशिं साचे
अजि होय काय सकलांसी । मारुता
कोठुनी बोल रे येशी । मारुता

एकदांहि हरि हंसलाना । काय रे
क्षणभरहि कुंजिं रमलाना । काय रे
जागचे चरण उचलीना । काय रे

का सतत बघे अंबरा
विसरुनी खालची धरा
श्वासही सोडिना जरा ·
कां विषाद करि हृषिकेशी । मारुता
कोठुनी बोल रे येशी । मारुता

तूं कुठें कुठें रे जाशी । मारुता
भेटसी तसा कवणासी । मारुता
अनुभवीं काय रे घेशी । मारुता
रमविसी कुठें स्वमना
रिझविसी कुठें नयनां
स्थिर करिसि कुठें चरणां
तूं कुठे खरा संतोषी । मारुता
कोठुनी बोल रे येशी । मारुता

व्रजनाथ श्याम गोपाळ । मारुता
गोपींचा भंवतीं मेळ । मारुता
चालतां प्रेमरस खेळ । मारुता
श्रीहरी वेणु वाजवी
त्यामाजिं कुणा डोलवी
हें कुठें देखिलें भवीं
नच काय पडे दृष्टीसी । मारुता
कोठुनी बोल रे येशी । मारुता

ह्मणुनि का व्यथित मन ऐसें । मारुता

तुज आधिंच नकळे कैसें । मारुता
कीं राधा स्थल हरिचें तें । मारुता
चल सोड शोक आवरी
निज चपल मना सांवरी
देउनी धीर सत्वरी
स्थिर करी तसा स्वतःसी । मारुता
कोठुनी बोल रे येशी । मारुता

कशि गोड कळी हंसली ही । मारुता
मुरली–रव कर्णीं येई । मारुता
तव रूप रम्यपण घेई । मारुता
पण कुठें पळत जाशी
हें असें काय करिसी
रे अतांच ना येशी
हरि बघ हा राधेपाशीं । मारुता
कोठुनी बोल रे येशी । मारुता

## ४५

## "बंडखोर"

[ आनंदकंद ऐसा० या चालीवर ]

व्हा सावधान आतां । हा बंडखोर आला
वदनांत देशसेवा
हृदयांत अर्थ व्हावा
खल जो अगम्य असला । हा बंडखोर आला

स्वातंत्र्य नांव सांगे
जन सौख्य शांति भंगे
जो लाजवी विषाला । हा बंडखोर आला

सेवी पिता नृपातें
सुखशांति दे प्रजेतें
अणि संकटीं तयाला । हा बंडखोर आला

तुमचाच नित्य म्हणतो
तुह्मांस नागवीतो
अनुभूति ही सदाला । हा बंडखोर आला

जरि स्वामिभक्ति शिकवी
तिजला स्वतांच तुडवी
दिसतेंच डोळियांला । हा बंडखोर आला

अज्ञांस लोभ लावी
विपरीत मार्ग दावी
जगिं भ्रष्टशील असला । हा बंडखोर आला

वचनांत माधुरीसी
करणींत चातुरीसी
भुलवावया जगाला । हा बंडखोर आला

महाराष्ट्र–धर्म–नादें
ब्रह्मांड सर्व कोंदे
ही भूल वंचनेला । हा बंडखोर आला

रानावनांत भटके
गरिबींत जीव झाके
वकवेश दाविण्याला । हा बंडखोर आला

वश अंबिका स्वतांसी
करि नित्य वल्गनेसी
ही हूल मूढतेला । हा बंडखोर आला

झळके क्षणांत येथें
पुढल्या क्षणांत तेथें
ही जादु मोहिण्याला । हा बंडखोर आला

गड कोट ठायिं ठायीं
चोरापरी सदाही
पळतां दिसे तुह्मांला । हा बंडखोर आला

म्हणवी अनाथ–वाली
अपुलीच दे कपाळीं
परतंत्रता तयांला । हा बंडखोर आला

देश स्वतंत्र व्हाया
कथितो दुज्यां मराया
परि वांचवी स्वतांला । हा बंडखोर आला

विश्वास यावयाला
निज भासवीत लीला
कपिहूनि त्या न मोला । हा बंडखोर आला

महाराष्ट्र–वैभवाचें
यश गात गात वाचें
मिळवी तया धुळीला । हा बंडखोर आला

चैतन्य चेतवीलें
तारुण्य नाशियेलें
संतोष ठार झाला । हा बंडखोर आला

श्वानांस भुंकण्यातें
खर घूक नांदण्यातें
निज देश पात्र केला । हा बंडखोर आला

निज राज्य स्थापनेचें
वच फोल ते मुर्खांचे
लाभे शशी कुणाला । हा बंडखोर आला

प्रभु पाठवी अम्हां तो
म्हणुनीच राज्य करितों
सुख व्हावया तुम्हांला। हा बंडखोर आला

उंदीर डोंगरींचा
शठ जादुगार साचा
विश्वासितां कशाला । हा बंडखोर आला

४६

# ईश्वरी चीज

[ पोवाड्याच्या चालीवर ]

पशु ह्मणुनी ज्या बोधिते
तुच्छ लेखिते । सर्व काळ
ती मनुज-जीविता खरीच विनमोल

तो मुका विचारा जीव
काय जाणीव । जीवनाची
हालती चालती मूर्तिच दगडाची

तो काय बोलतो कुणा
कुण्याही क्षणा । ताडियेलें
तो शंख फुंकणें मनुजा दिधलेलें

धनि नेइल जगतीं जिथें
जातसे तिथें । गाइवाणी
पथ सरल बिकट वा घेइ काय ध्यानीं

जें येइ तयाच्यापुढें
भक्षि बापुडें । जीव जगवी
बंधनीं दुज्याच्या सर्वथैव राही

कुणि कसाब मानेवरी
चालवी सुरी । प्राण घ्याया
प्रतिकार काय करि तिळभर त्या समया

ही अशी सृष्टि-दरबारिं
चीज ईश्वरी । सजिवतेची
मनुजही हौस निज पुरवी हृदयाची

परि भेटवि खल मर्दुनी
उदधि लंघुनी । राम-रमणी
अशि जगा तयाची दिसुनी ये करणी

जगताच्या हितसाधनीं
असा पशु कुणी । येइ कामा
करि धन्य जन्मुनी निज जीवितधामा

तूं मनुज असुनि भारता
वल्गना वृथा । मात्र करिसी
कृति होइल केव्हां, काय ह्मणूं तुजसी

४७

## गीतशारदा

[ कुंजवनीं या कोण वाजवी० या चालीवर ]

हरि मुरलीचा मधुर गीतरव गुंगवि ज्या हृदया
मानव-गीत तया । कसें मग रुचेल जगतीं या

कल्पतरूचें फल भक्षाया
सुधा जान्हवी-जीवन प्याया
नंदनवन तें सहल कराया
लाभ जया असला । कधिं न तो इच्छिल पंकाला

नाथ जगाचा करुणासागर
चिदानंद द्यावया निरंतर
संतोषें अवतरला भूवर
गायक तो असतां । कां न मग तोष खरा चित्ता

गीत—शारदा कितिक मुखांतुनि
जगताठायीं प्रकटे निशिदिनिं
पार न त्यातें येई दिसुनी
सतत परी श्रवणीं । घुमत कां हीच गोड वाणी

दुर्मतिच्या करि निरास निमिषीं
देइ समाधी आलस्यासी
स्फुरवी कणकणिं चैतन्यासी
ही ज्याची करणी । कां न त्या होई वश धरणी

समानतेचा वायू चाले
विश्वप्रीती अखंड खेळे
कर्तव्याचा झोला हाले
विलास हा ज्याचा । कां न तें प्राणचि जगताचा

गीत—शारदे ! धन्य जनन तव
धन्यचि तैसा तुझा दिव्य रव
घडि घडि देई प्रमोद अभिनव
नत चरणीं तुझिया । ठेवि गे अशिच कृपाछाया

४८

## श्यामसुन्दर

[ चित्तरंजना० या चालीवर
आनंद-गीत, भाग दुसरा. ]

श्यामसुंदरा । हांस गड्या हांस जरा
तूझें हंसित । शोभे ललित । रे मनोहरा

मुक्त करी अधरांते । करुनि दुरी मुरलीतें
बोले हंसुनि । कोपे हंसुनि । नयनसुंदरा

रम्यपणा कुंजवनीं । राहि मुका बघ अजुनी
दावी ह्मणुनि । कांहीं हंसुनि । भावसुंदरा

हांसावें मधुर कसें । जगतां जें लावि पिसें
तूझ्याविण न । जाणें कवण । श्रवणसुंदरा

हांसतसे देवि उषा । करि प्रफुल्ल मन, आशा
येई हंसत । जाई रुसत । वृत्तिसुंदरा

जगिं हंसणें कलिकेचें । नच राही अक्षयिंचें
जैसें सुखवि । तैसें दुखवि । रूपसुंदरा

ताऱ्यांचें हास्य रुचिर । कुणि ह्मणती हृदयमधुर
लीला सकल । भासे तरल । जीवसुंदरा

गगनींच्या चन्द्राचें । काय रूप हास्याचें
अंधारांतुन । देई दर्शन । स्नेहसुंदरा

घडिघडिला मीहि हंसे । परिणामीं काय दिसे
वाऱ्यावरुन । जाई उडुन । हृदयसुंदरा

जें हंसणें तें हंसणें । मुळिं न दुजें त्यांत उणें
जेणें अंतर । नेणें अंतर । प्रेमसुंदरा

हास्य तुझें हास्य असे । मधुरताहि बघुनि हंसे
तूझें रंजन । माझें गुंजन । भुवनसुंदरा

४९

# गंगायमुना

'गंगायमुना' खेळ अतां
खेळूं आपण गे पुरता

जाइ गड्या तूं येथोनी
बाळ आमुचा कसा गुणी

खेळ तुझा तो विटिदांडू
नको मुलींशीं तूं भांडूं

आई देते खाउ तुला
सरेल नातरि जाच मुला

करिसि कशाला मधें मधें
नको त्रासवूं आम्हांते

खेळ मुलांचे असति तुला
अह्मां मुलींचे आम्हांला

पतंग उडवी आकाशीं
मौज बघूं दे आह्मांसी

आट्यापाट्या खेळ तुझा
सागरगोट्या अम्हां मजा

तुझिया कधिं तरि खेळाला
त्रास दिला का अम्हि तुजला

## आनंद-गीत

काढ तुझी ती तरवार
चोरावरि करिं जा वार

लांकडीच जरि ती असली
तरि नाहीं रे तुटलेली

बघ पण अपुला शूरपणा
दावुं नको फुलझाडांना

टवकारुनियां कां बघसी
पापण्याहि ना हालविसी

नका मुलींनों ! हंसूं तया
जाइल आतां इथूनियां

किती शाहणा हा बाळ
उगिच न कधिं तो घे आळ

बाळ आमुचा गुणी किती
तुम्हींच सगळ्या मूर्ख अति

गंगायमुना नको नको
इथेंच खेळे जाउं नको

बाळ हांसला पहा पहा
खेळ मजेचा अहा अहा

५०

# उद्धार

[ असावरी–त्रिवट ]

अणिलेंसी कां रे । मजला
ऐशा विपनीं । तशांत विजनीं
प्रकाश–रजनी । एकच नयनीं
अंधकार सगळा

सुतजननीचा । एकात्म्याचा
सहजपणाचा । स्फूर्ति–मतीचा
विभाग हा केला

जिच्या सुखास्तव । सारा सुखभव
त्यागी अभिनव । दृष्टि पडे तव
आपसुखें कुटिला !

संकटराशी । घडीघडीसी
येतां शीर्षीं । धरी तयांसी
जणूं सुमनमाला

कठोरतेला । शक्तिनृपाला
कृतांतकाला । चरणिं नमविला
धैर्याचल असला

त्या मेरूवरि । धीर धरुनि परि
तूंचि खरोखरि । चढसी अजवरि
तांडव करण्याला

तूं शेवटचा । जन खलतेचा
कोण कुणाचा । विजयी साचा
बघ रे क्षण आला

प्रेमा निर्मल । भक्ती उज्ज्वल
मम हृदयांतिल । खरीच अविचल
तोडि बंधनाला

स्नेहें माझ्या । या पंकाचा
त्राग फुलांचा । होइ, तयाचा-
करिन दास तुजला

हृदयभूमिवर । खेळे दृढतर
आशा भास्कर-। दीप निरंतर
कोण शमवि त्याला

परवशतेंतुनि । माझी जननी
मुक्त करोनी । दाविन भुवनीं
सुखशैलीं तिजला

५१

## सनातन धर्म

[ सबसे राम भजन० या चालीवर ]

ब्रह्मांड व्यापुनी उरला । तो हा धर्मसखा अपुला

ज्या वृक्षाचें मूळ रोविलें शेषशिरावरती
शेवट जाई भेदुनि गगना शेषभाग या जगतीं

तसा सर्वंभर अमोघ ज्याचा शाखाविस्तार
अनंत नामा, अनंत रूपा पावे जो साचार

ज्यावरि नाना विहंगमाला रंजविती जीवा
समभावें, समचित्तें ज्याचा कालहि करितो हेवा

शक्तिबलानें आपआपल्या सान थोर जीवें
पोशियलें ज्या जीवनधारा संतत वाहुनि भावें

कितिक अजवरी प्रहार होती अंत न मुळिं ज्याचा
एकच हेतू दृढतर मनिंचा नामशेष करण्याचा

त्याचमुळें परि ग्रीष्मरवीसम दिपवी जगताला
वृक्ष सनातन प्रकटवुनी जो विराट निज रूपाला

५२

## मधुरयामिनी

[ सज्ज करुनि चाप० या चालीवर ]

हीच काय बोलतात मधुर यामिनी
हंसत डुलत ललितपूर्ण विश्वमोहिनी
फुलति फुलें विविधगुणी
खुलति तारका गगनीं
गगनदीप ठायिं ठायिं बघति हांसुनी

वायु चरे मंद मंद
विरल, सतत उधळि गंध
उपजवितो सौख्यकंद हळुच स्पर्शुनी

## आनंद-गीत

तृणमुखिं दंव शोभतसे
मोत्याचे बिंदु जसे
प्रति बिंदुंत एक चंद्र राहि खेळुनी

हरितवर्णि नव पर्णीं
समजोनी मृदु धरणी
स्नेह दावि नाचुनियां स्नेहपर्वणी

यमुनेच्या जललहरी
स्वैर रमति बहुतपरीं
नील क्षणीं धवल क्षणीं सलिल लोचनीं

जणुं प्रवाह सरितेचा
पयपान्हा स्नेहाचा
उडुबाळें पीत पीत जात उधळुनी

चन्द्राचा पूर्ण गोल
फिरत सांवरीत तोल
घेई निज किरणवसनिं सृष्टि भामिनी

विहग सुखें झोंप घेति
तरु लतिका शांत नटति
तरलतेस योगस्थिति येइ या क्षणीं

शरदाचें राज्य कसें
होय क्षणार्धांत पिसें
मुदित दिसे तोहि असें नवल देखुनी

परम रम्य विश्वसदनिं
गोकुलिंच्या कुंजवनीं
प्रेम—हृदय एक मनें दंग मोहुनी

राधेच्या जवळि हरि
वेणूला अधरिं धरी
सप्त सुरां भुवनिं भरी गीत गाउनी

तूं बघसी मम वदना
मीहि बघे तव नयनां
नच वदतां मुळिं वचना उभयतां कुणी

अशिच काय रजनि मधुर
वदति जिला मधुर मधुर
मधुर मना सकल मधुर गमत परि जनीं

५३

# सूर्यास्त

[ जरि नाहिं कमल० या चालीवर ]

तूं जाइ गड्या मंदिरा । अतां दिनकरा
श्रांत होसी । कुठवरी विभव भोगिसी

सकलांग गलित जाहलें । तेज शांतलें
जीविताचें । करि समाधान हृदयाचें

अजुनि का तुझ्या मानसा । विभवलालसा
मोहवीते । नच बघतां परिणामातें

अधिकार शोभतो तया। म्हणवि जगतिं या
शक्तिवंत। दूषवी दुर्बला उलट

गगनिंच्या मुली चिमुकल्या। हंसूं लागल्या
तुच्छेतेनें। हें बघसि आपुल्या नयनें

ते ओठ पहा उघडिले। तुवां निज बळें
बांधिलेले। त्या सुमनजिवांनीं अपुले

तुजवरी कोपिती मनीं। तुझ्या बहुगुणीं
कमलरमणी। तुज हीनतेज पाहोनी

बाहेरी बुरख्यांतुनी। येइ यामिनी
धीट होई। हें कसें रुचे तव हृदयीं

स्तुतिपाठक सर्वहि तुझे। विभवकालिंचे
मुके होती। इतुकेंच न तुज त्यागिती

मानिसी जिवाचे सखे। जाण पारखे
सकल होती। तूं एकलाच शेवटीं

सन्तापें संध्यासती। दिसे संप्रति
रक्तवदना। जणुं सज्ज तुला शासण्या

कर चंडशक्ति जाहले। लुले पांगळे
सर्वपरिंनीं। हें काय ये न तव ध्यानीं

हीं अशीं कुटिल लक्षणें। तुजसि दिनमणे!
काय कथिती। तें जाणें अपुल्या चित्तीं

निज सिंहासन राजया। सुखें समयिं या
सोडिसी ना। तरि त्याग खचित या क्षणा

ह्या पश्चिम-शैलावरुनि। तुजसि लोटुनी
बावयासी। सामोर उभा बघ शशि

## ५४

# चमेली

( पावसाळ्यांतील अंधाऱ्या रात्रीं नागपूर नगरभवनाच्या मार्गावरून जात येत असतां बगीच्यांतील फुललेल्या चमेलीकडे पाहून गीतांत वर्णिलेलें दृश्य कोणाच्या प्रत्ययास येत नसेल? मला गीत लिहिण्याची इच्छा झाली त्या वेळीं शहरांत विजेचे दिवे आले नव्हते. )

[ भैरवी-दादरा ]

नवल देखिलें
आजि म्यां नवल देखिलें

तरुण समय वर्षाचा
तेंवि कृष्ण रजनीचा
मंडप नभिं मेघांचा
भयद वाटलें

वर खालीं कुणिहिकडे
नयनिं एक दृश्य पडे
घनतमिंचें चोंहिकडे
राज्य पसरिलें

तारका न एक गगनिं
दीप-किरण नच भुवनीं
तेज जणूं रूप गुणी
कधिं न जन्मलें

## आनंद-गीत

शीतल अति मंद पवन
हालेना मुळिंच पर्ण
तिमिरभयें जाइ पळुन
काय, भासलें

ती प्रशांतता विशाल
प्रलयजननि जणुं कराल
पसरी निज मोहजाल
धीर मावळे

जलधारा घन गर्जत
येइ अतां जणुं वर्षत
प्रतिचरणीं हृदयाप्रत
भ्रांति ही छळे

जणुं स्वतांहि तिमिरमूर्ति
चालतसे राजपथीं
टाकुनियां चपलगती
पुढतिं पाउलें

इतुक्यांतचि कुठुनि तरी
येइ हळुच गंधलहरि
चुकलेल्या पथिकापरि
मन विलोभिलें

भीति सरे, भ्रांति नुरे
कांहिं तरी हृदयिं स्फुरे

स्थिर होती चरण त्वरें
निमिषिं त्या बळें

मधुर गंध हा कुठला
असल्या या अवघडिला
दृष्टि फिरे बघण्याला
नवल पाहिलें

गगनींचा तारागण
धरणीवर कीं उतरुन
करित भुवन तिमिर हनन
आपुल्या बळें

निरखुनियां बघतां परि
मालतिच्या तनुवरती
स्वैरपणें गोड हंसति
लाडकीं फुलें

५५

## दर्शनयोग

[ वीरा भ्रमरा० या चालीवर ]

केव्हांपासुनि दारावरती मुला ! उभा राहसी
काय रे तुझ्या बाल मानसीं ?
चिंता कांहीं हृदयिं म्हणावी चिन्ह न वदनावरी
दिसे मुख प्रफुल्ल कमलापरी

तनुलतिकेला दुःख म्हणावें परि ये अवलोकनीं
नाचते सूर्यकांति लोचनीं
वेशावरुनी दिसे गरीबी परि अनुभव दाखवी
ऐट तव श्रीमंता लाजवी
माहेर जगीं जें चंचलतेचें वसे
मनसोक्त खेळतां जिथें सतत ती दिसे
तें बाळ हृदय तव बाल वयीं रमतसे
परि ती तरला या समयाला सोडुनि जाई तुला
दिससी प्रशांत सागर मुला
कांहिं न वदसी समोर बघसी कशास टक लावुनी
कुणाला बाहसि अपुल्या मनीं
वस्तु हरवली का आवडिची ह्मणुनि शोध लाविसी
करुनियां विचारणा मानसीं
का सुहृदांशीं विरोध होउनि येशि इथें त्रासुनी
तयांच्या सहवासा सोडुनी
नसतां मुळिं अपराध तुझा तरि गरीब तूं या जनीं
ह्मणुनि का आळ घेतली कुणी
का होय तुझी रे चुकामूक जननिशीं
त्यासाठिं तियेची वाट इथें पाहसी
मग राजपथावरि दृष्टि तुझी नच कशी
परंतु तुझिया वदनावरती कशाचीच आर्तता
दिसेना लेशमात्र सर्वथा
राग न खेळे लोभ न खेळे तुझिया मुखसारसीं
स्मिताची छटा मात्र सानशी

शुभ कल्याणी केवळ जननी प्रेमळतेची गिरा
अशी ही दृष्टि तुझी सुंदरा
शुचि गंगेची मूर्ती दिसतां श्रद्धा सहजीं जडे
तसें तुज देखतांच रे घडे
बालरवीचा उदय निद्रिता चैतन्याचा झरा
तसें तव दर्शन अचलांतरा
बोलका असुनही मुग्धपणा येतसे
बघतसों तरीही दृष्टि अंध होतसे
श्रवणीं न ऐकुं ये कांहिं, बधिर गमतसे
सद्‌वृत्तीच्या तरंगावरी मन्मन करि नर्तन
असो मग कोणताहि तूं जन

५६

ग्रंथ संग्रहालय ठाणे
20282

## नवस

[ सुटला पितृदिशेचा० ये चालीवर ]

जगिं तूं कुण्या जातिधर्माचा
बालक कुण्या जन्मभूमीचा
आचरिसी कसला पथ हा आयुष्याचा
होईल काय रे शेवट बोल तयाचा
तुजला आप्त शत्रु वाटती
गासी परक्यांची मुखिं कीर्ति
तव धन्य हृदय तें कुणीं घडविलें जगतीं
ज्या लाज मनाची जगताची वा नच ती

बसुनी परक्यांच्या नित दारीं
चढसी वैभवगिरिच्या शिखरीं
तव जननी क्रंदत पारतंत्र्य–पंजरीं
तुज धन्यवाद ती काय देइ अंतरीं

शिशुपणिं तुजसि दुग्ध पाजितां
तैसे दुःखक्लेश सोशितां
किति भव्य मनोरथ, आशा नव ह्रदिं येतां
तें एक ह्रदय तिज अपुरें भासे कितिदां

अपुलें दुग्ध पिउनि उज्ज्वल
सुत हा थोर गुणी होइल
रिपुकरीं कंठ निज हाच–हाच देइल
हें कसें माउलिस स्वप्न पडावें विकल

धरितो कुणि जी मनिं कामना
होवो पुत्र गुणी आपणा
कीं रिपुहस्तें तो मरणाच्या यातना
देईल, जन्मभर गाळाया अश्रूंना

अपुल्या जाणसि का जननीसी
तिजला सुखवाया मानसीं
जगदीश निरंतर येइ तियेच्या कुशीं
तूं तिच्याच पोटीं कुळदीपक हा येशी

तुज घे आंगाखांद्यावरी
पोहे सुखब्रह्मसागरीं

तिज फेंकुनि देसी दुःखपंकिं निज करीं
ती जननी सुत तूं धन्य त्रिखंडावरी
आप्त स्वकीय अवमानुनी
किंकर परक्यांचा होउनी
हांसवी प्रमोदें काय आपुली जननी
तो एक दाखवी आईचा सुत भुवनीं
निज मातेच्या प्रेतावरी
नाचूं थयथय परताल्स्वरीं
हा नवस तुझा का मागिल जन्मांतरीं
दुंदुभी वाजवो देव तुझी अंबरीं
असशी शूर वीर गुणवंत
तैसा धैर्यमेरु बलवंत
इतुकेंच दुःख परि तव हे सुगुण समस्त
उत्कर्ष रिपूचा करिती रे दिनरात

५७

## भाविक

[ यरकारि लेलो० या चालीवर ]

सरदारि तुझी ती नको अह्मां
लखलाभ आमुचा गरिबपणा
या जगीं आमुचे अम्हीं असूं
इतरांना तैसें इतर दिसूं

जगिं एकच आई अम्हां असे
जी घालुनि जन्मा पाळितसे
प्रभु एकचि शिवबा जगांतरीं
जो हरुनि आपदा सुखी करी
जगिं हेंचि ठाउकें एक मना
रे नको आणखी दुज्या गुणा
अजि जसा अम्हां तूं नच अमुचा
रे तसाच होई अखेरचा
जिव निघुनी जाई परलोकीं
कृति राहि सदाची इहलोकीं

५८

## वसंतकोकिल

वसंत हा आला
कोकिला ! तुजला गायाला
आम्रासव पिउनी
अतां गा । गोड गोड गाणीं
रुचिर मंजिऱ्यांना
डुलवि रे । मंजुळ गातांना
ह्या मधुमासाचा
लाडका । तूंचि एक साचा
उगाच नच कोणीं
कौतुकें । गाइ तुला गानीं

थोरासचि गाती
भक्तिनें । सान थोर जगतीं
तुजसाठिंच राहे
सर्वथा । वसंत—वैभव हें

वैभवांत रमुनी
कुणा परि । न कधीं अवमानी
थोरपणा म्हणुनी
नातरी । करशिल कटु करणी

लाभे ज्या सुगुणीं
थोरता । जिवास या भुवनीं
पण तें विसरोनी
अहंतें । कृतघ्न होवोनी

तयालाच पुढतीं
मूढ तो । देइ सुळावरती
स्वतांसवें अंतीं
जगहि ने । अधःपात—पंकीं

दीपाची ज्योति
तमा हरि । म्हणुनि तिला महती
पण रविसामोरी
मिरवितां । डौलानें भारी

काय तदां होई
निरंतर । अनुभविं तें येई
दीप तशी ज्योति
कळेना । त्यांची काय गति

रवि न जिथें जाई
तिथें तम । नाच पुन्हां दावी

जीवाचें हांसें
कशाला । व्हावें उपहासें
कथितों हें म्हणुनी
तुजसि रे । मधुमासागमनीं

' वसंत-कोकिल '
सकलमुखिं । निघोत हे बोल
मदांध नच होईं
वसंता । विसरुं नको कधिंही

तयानेंच तुजला
चढविलें । अशा वैभवाला
थोरपणा जगिं तो
सतत जो । सकलां भूषवितो

५९

## बालशिवाजी

[ तलवार लांकडी ही० या चालीवर ]

तुज गमे काय हृदयीं । बोल आई
मेटीस शहाच्या सवें आपुल्या तात अह्मां नेई

अमुचा न शहा तो कुणिही
नच कुणी तयाचे आम्हीं
पाचारी कां मग आई
उभयांत अह्मां अरिमित्र भाव हा केवळ गे राही

भूपासनिं तो बैसेल
आह्मांस उभें ठेवील
मग अमुचें शिर नमवील
जें तुझ्या पदांबुजिं विनत होउनी आशीर्वच घेई

हा देश आमुचा राही
धनि तसे आमुचे आम्ही
वांकेल कसें शिर समयीं
तो शृगाल कोठें, कुठें सिंह अम्हि संबंध न कांहीं

दासत्व असे जनकास
आम्ही न तयाचे दास
उपभोगित स्वातंत्र्यास
तो चंड प्रभाकर कधीं काजव्या शरण काय जाई

जगिं थोर उदार ह्मणोनी
नत व्हावें भावें चरणीं
तरि तसेंहि नच ये दिसुनी
कधिं कुणी ऐकिलें कुटिलात्मा बक पुण्यात्मा होई

प्रभु-मूर्ति भंगिल्या नाना
भ्रष्टविल्या कितितरि ललना
गाईच्या कापी माना
हरघडी तयाच्या लीला असल्या बघतों नयनांहीं

तरि हास्य मुखावरि अणुनी
वंदिती तयाच्या चरणीं
दोन्हींही कर जोडोनी
निज शीलभ्रष्ट जन असे आजला वाचामनदेहीं

तस्करा भूप समजोनी
धन्यता मानिती भजनीं
सर्वस्व तया अर्पोनी
स्वजनांच्या निशिदिन रक्तस्नानें रंगविती क्षिति ही
उधळिलीं फुलें हास्याचीं
ती पुण्यभूमि आर्यांची
अजि गाळि माळ अश्रूंची
तरि अजुनि फुटेना मुळींच पाझर कवणाचे हृदयीं
नयन शुष्क रडतां झाले
चैतन्य लयाला गेलें
विगतभान जीवित सगळें
तरि वदति कौतुकें शहा—कृपें तिज नवजीवन येई
त्याचिया कृपाचंद्रास
अल्पमात्र वश करण्यास
बहुपरी करिति सायास
जो कुणी आडवें येइ सन्मनें म्हणति तया द्रोही
धर्म फिरे रानोरान
सर्वथा-सत्य हैराण
नीतीची तुटली मान
थैमान कुटिल कौटिल्य आपुलें घालि ठायिं ठायीं
रावणा वधुनि रघुराई
मुक्त करी सीतामाई
त्यापरी जाण लवलाही
खल शहा मर्दुनी राष्ट्र हिन्दवी मुक्त करूं आम्हीं

गे तरीच तुझिया ठायीं
हा शिवबा जन्मा येई
जन्माचें सार्थक होई
नातरी उदरिं तव कुलांगार अम्हि निपजलोंच आई
पण अशी परिस्थिति व्हाया
शठ शहाच गे कारण हा
जावें का मग भेटाया
कथशील एक तूं शुभद कोणतें अम्हां अशा समयीं

६०

## चांदण्यांची मौज

ही मौज चांदण्यांची
शोभा गगनमंदिराची
रजनिंत खुलती
दिनिं मावळती
ही मौज कौतुकाची
हांसत येती
हांसत जाती
ही मौज जीविताची
हांसत जगणें
हांसत मरणें
ही मौज अंतराची

आपण हंसती
जगा हंसविती
ही मौज चारुतेची

हांसत मरती
तरिहि सुखविती
ही मौज धन्यतेची

सदैव जगती
ठेविति हंसती
ही मौज जीवनाची

जिणें तयांचें
नकळे साचें
ही मौज नेहमींची

६१

## दिव्य लेखक

[ वीर शिरोमणि सकल० या चालीवर ]

आकाशाच्या निळ्या फळ्यावर रत्नाचीं अक्षरें
प्रति निशीं कोण काढितो बरें
एका पंक्तित दोन नसति कीं सगळ्यांची स्थिति अशी
तयांना वाचावीं मग कशीं
कुणास कुणि वा लिही पत्रिका गूढ अशी सर्वथा
शोधितां प्रयत्न होती वृथा

कीं पृथिवीची ही शाळा अवलोकुनी
वघण्यास परीक्षा गुरुशिष्यांची कुणी
त्यापुढें ठेवि का कोडें हें मांडुनी
परंतु ऐसा चतुर बुद्धिचा अजुनि दिसेना कुणी
दाखवी समस्त तें उकलुनी

युगायुगाची स्फूर्ति–शारदा कष्टवुनी बुद्धिला
लागती नऊ अक्षरें तिला
स्फूर्ति–तुरंगम अगतिक पुढतीं, दहावें न उमजलें
सकल जरि वेंची बळ आपुलें
चातुर्याची, सामर्थ्याची शिकस्त होई परी
शेवटीं विफलताच ये करीं
तीं नउच अक्षरें क्षणोक्षणीं नाचवी
गुण, कीर्ति तयांची गाउनि जग मोहवी
जणुं दुजें कुणिच ना त्याविण नभिं भासवी
अंबरपट परि अक्षराविणें रिता न तसुभर दिसे
सत्य हें मानावें मग कसें

कुंठित मतिची दुर्बल लीला चाले ही केवळ
जाणितो लेखक परि सोज्वळ
लिखाण ऐसें लिही कशाला गूढ अक्षरांकित
कळेना हेतु काय अद्भुत
लिहितो, पुसतो पुनः पुन्हां तो विश्वविलक्षण असें
तयाला काय जडे हें पिसें

हें पिसेंच त्याचें लावि जगा परि पिसें
तें पिसें विलोकुनि हंसें अंतरीं पिसें
हें फिरे अजवरी चक्र सारिखें पिसें
दिव्य लेखका ! पिसा खेळ हा थांबणार केधवां
तुजविना कळेल कवण्या जिवा

६२

## जन्मोत्सव

अमर भाव रवि घोर निशेंतुनि क्षितिजिं भारताच्या
किरण फुलें उधळीत येइ हा चरणीं शिवबाच्या
स्वयंप्रकाशी तेजोराशी हृदयभावतरणी
भारतास चैतन्य-मंदिरीं न्याया हो तरणी
दगडांचे एकदां बनविले देव आत्मकृतिनें
तत्पदकमलीं जगा नमविलें त्या शिवरायानें
तेचि आजला परवशतेच्या अशा हीन समयीं
पुन्हां मूल रूपांत नाचती जरि जगताठायीं
देवपणा भोगिला मिरविला कृपामृतें ज्याच्या
शक्य कसें निमिषांत विसरणें पदांबुजा त्याच्या
सत्तेच्या धुंदींत विसरणें क्षणांत उपकार
इतुकेंच न पुढल्या क्षणिं चिरणें कंठा बिनघोर
ब्रीद नव्हे हें पहा शोधुनी खऱ्या भारताचें
भोगो मग कसल्याहि जगावरि भोग अवस्थेचे

राममहोत्सव कृष्णमहोत्सव कशास होतात
प्रति प्रभातीं जगत भानुच्या दंग उत्सवांत

असेल जेथें दिसेल जेथें तेज पौरुषाचें
सहज धर्म हा तेथें रमणें कायामनवाचें

कंठ वाहुनी कंठ रक्षिला जयें भारताचा
त्या कंठीं मग घोष तयाचा कां न राहि साचा

महाराष्ट्राचें—नव्हे आज जें नाम भारताचें
नाम मात्र महिवरी तया श्रम त्या पुण्यात्म्याचे

त्याच राष्ट्रपुरुषाचे स्मरणीं येइल देवपणा
दृढतम अशि ही श्रद्धा वाणे अमुच्या आर्यमनां

त्या श्रद्धेला अवरोधाया समर्थ मग कोण
अजवरि जे जे येति आडवे होई तच्चूर्ण

त्या भावामधिं चैतन्याची अथांग भागिरथी
जड देहाची जड जीवाची भारत—हृदयरती

अमर भाव तो अमर मनाच्या अमर देवतेचा
मरण कोठलें तया असे जो स्वयंप्रेरणेचा

शतत्रयें—नच प्रति दिवशीं वा क्षणोक्षणीं होई
जन्मोत्सव त्या नरश्रेष्ठाचा, समाधान नाहीं

त्याच गतीनें पारतंत्र्य—तम—विनाश होईल
स्वातंत्र्याचा मांगल्याचा शुभ दिन येईल

त्या राजाचा त्या नामाचा जयजयकार असो
'आनंदा'च्या वाग्देवीसहि हेंची वेड असो

६३

# प्रबोधन

[ ऊद्धवा शांतवन० या चालीवर ]

भारता ! ऊठ रे ऊठ । झोंपसी असा किति काळ
साम्राज्य तमाचें सरलें । हें गीत गाइ चंडोल
हा अरुण दूत सूर्याचा । जागवी सकल भूगोल
उदयाचल कर वरि करुनी । हर्षाचा उधळि गुलाल
उघडी रे उघडी नयन
तरि आलस्या टाकून
बघ जरा भंवतिंचें भुवन
तेजाग्नि स्वातंत्र्याचा । चहुंकडे उडवि कल्लोळ
—भारता ! ऊठ रे०

शर्वरी दिना समजोनी । झोंपणें शक्य नच आतां
तें आलिंगन निद्रेचें । विसरणें भाग तव चित्ता
ते विलास आलस्याचे । दुरि पळती नच कळवीतां
ह्या दीप्ताग्नीच्या ज्वाला
चौफेर तुझ्या शरिराला
दाहिती दावुनी लीला
तो स्मशान शांती—लाभ । मग कुठला तुज लाभेल
—भारता ! ऊठ रे०

गतकाल—कीर्ति या पुढतीं । नच तुझिया कामा येई
पोवाडे गतवीरांचे । मुळिं नच अजि तुज शुभदायी
गतविभव—स्मृतिस्मरणी ती । जीवना बुडवि जलडोहीं

म्हणशील काळच्यापरिनें
झोंप तरी येइ सुखानें
पण शक्य न तेंही घडणें
जागृतीच तव यापुढतीं । मनिषेची पूर्ति करील
—भारता ! ऊठ रे०

तव निकट स्नेही चीन । या प्रदीप्तशा तेजानें
अंधार सदनिंचा अपुल्या । घालवी यत्ननिकरानें
मुख उज्ज्वल करुनी अपुलें । मिरवि तो पुन्हां कांतीनें
परवशता त्याचा ठाव
परवशता त्याचा भाव
परवशता त्याचा देव
दृढ समज जगाचा ऐसा । निमिषांत करी बघ फोल
—भारता ! ऊठ रे०

पुरुषांच्या पौरुषतेनें । आणिलें गृहीं तें तेज
ललनांच्या माधुर्यानें । वर्धिलें उचित तें तेज
तरुणांच्या तारुण्यानें । तळपळें जगीं तें तेज
शतकानुशतक अंधार
जणुं धनीच जो साचार
तो कुठें पळाला पार
इतुकेंच न फिरुनी बघतां । नव्हताच दिसे तो काळ
—भारता ! ऊठ रे०

मानिति निज भक्ष्य तया जे । तेचि त्या भक्ष्य पुरवीती
लेखिती बहिष्कृत जगतीं । तेचि तया हृदयीं धरिती
तुडविती निरंतर पायीं । तेचि तया शिर नमवीती

ज्या गुलाम नामीं ख्याति
ज्या गुलाम नामीं महती
ज्या गुलाम नामीं सिद्धि
तो धनी आज, त्यावरती । उधळिती फुलें दिक्पाल
—भारता! ऊठ रे०

जागचा न जरि हलशील । तें चुकें न अजि दैवाचें
स्वातंत्र्य–तेज अनिवार । नच रोधन होइ तयाचें
धि:कारीं वा सत्कारीं । तें मात्र तुझ्या मनिषेचें
एकाचें लक्षण मरण
दुसऱ्याचा शुभ परिणाम
विधि आधिंच ठेवी लिहुन
तरि उठि रे उठि वेल्हाळ । 'आनंद'–कृष्णगोपाळ!
—भारता! ऊठ रे०

६४

## तो कोण

[ सुटला पितृदिशेचा० या चालीवर ]

नाहीं नामर्दांची महती
नाहीं नामर्दांची प्रगती
नामर्द कोण तो वैभवशिखरावरती
आरूढ जाहला पराक्रमें या जगतीं

हरघडि पाही अपुल्या नयनीं
माता, भगिनी, दुहिता, रमणी
भ्रष्टवितां, जातां परक्यांच्या त्या सदनीं
ज्या क्रोध येइना, कोण असे तो भुवनीं

म्हणवी धर्माचा अभिमानी
गाई सदैव त्याचीं गाणीं
बेगुमान परका तया तुडवितां चरणीं
आसवां गाळि तो कोण जगा ये दिसुनी

ज्याची हृदयीं मंगल वसती
जी सगुणरूप हरि–मूर्ति
ती विछिन्न होतां बघतो जो रिपुहस्तीं
तरि शांत, सजिव तो कोण असावा जगतीं

तरुनी संकट–जलधी नेई
तोची बंधु खरा जगिं राही
जंबुकापरी जो बुडवी संकट–डोहीं
तो उमजेना ज्या कोण म्हणूं तो देहीं

दावी प्रभाव निज तेजाचा
ठावें प्रताप त्या युवतीचा
स्वीकार करी तो समयिं वीरवेषाचा
कां लज्जा वाटे पुरुषासचि गोषाचा

अपुला आज पराक्रम सगळा
दिसतो घरच्या म्हातारीला

चालवितों अपुल्या घरींच समशेरीला
निर्लज्जपणें त्या माजवुनी कलहाला
मग तो कशास ये जन्माला
शिणवी कशास निज मातेला
स्वातंत्र्य-सुधेचा अधिकार न मुळिं त्याला
तो विराट-उत्तर ठाउक सकल जगाला

६५

## विकल्पविमोचन

कशास बससी उगा श्रीहरी वाजवि रे बांसरी
हवा कशाला श्रोता तुजला स्वयं नादमाधुरी

जगताचा जडपणा जडासम बसे ठायिं ठायीं
नादांतिल चैतन्य लुटाया आतुर बहु होई

खेळायातें नादकणांशीं प्रदक्षिणा घाली
शांतरूप घेउनी पवन हा तुजला वनमाली

प्रति नादावर वृष्टि कराया अपुल्या जीवाची
सज्ज होति बघ फुलें फुलुनियां वृक्षलतांवरचीं

कालिंदीचे तरंग तिष्ठति निनाद झेलाया
चंचल होती अधीर होउनि आपुल्याच ठाया

येइल केव्हां नाद श्रवणीं डोकावुनि बघती
क्षितिजावरुनी शिर वरि करुनी हळुच मेघपंक्ति

उगीच चपला तांडव करुनी करील रसभंग
कोंडुनि ठेवी ह्मणुनि मेघ तिज सोडुनियां संग

अजुनि मुका राहसी माधवा काय तुझ्या ठायीं
कसला तरि वाटतें अन्यथा जप चाले हृदयीं

येइल राधा करील आर्जव विनवुनि नानापरी
जीव नकोसा करुनि तियेला वाजवुं मग बांसरी

अशा कल्पना–तरंगांमधीं असशिल तूं रे जरी
आज तरी ही तुझी मनीषा सफल होइना हरि

जाइल कर्णीं रव मुरलीचा तरीच राधारती
तुझ्या दर्शना यापुढतीं रे येइल धांवत सती

कशास ध्यावा आळ तिजवरी असली जरि मागुती
सुखदु:खाचा थांग न दे निज जगिं ती कवणाप्रति

काय वाटतें तिच्या मनाला तें राही तन्मनीं
स्मितलहरी खेळती मुखाब्जीं बघो कदाही कुणी

कुणी कसाही येवो जवळीं तरी गोड वचनें
तया शांतवी हांसत खेळत प्रसन्न हृदयानें

तुजविषयीं विपरीत विनोदें वदतां कुणि कांहीं
झांकुनि घेई श्रवण झडकरी ऐकेना मुळिंही

तुझ्या स्तुतीचा पाठ कुठेंही चालत असतांना
देहभान विसरते सर्वथा तदा ऐकतांना

अशी राधिका तुझ्या चिंतनीं सदैव रतलेली
कसा वागशी तिजशिं यादवा कृति आठव अपुली

‘ वाजिव मुरली ’ उत्सुकतेनें वदतां ती तुजसी
क्षणींच त्या एकदा तरी तूं काय वाजवीसी

दुग्ध प्यावया येतों सदनीं आपसुखें ह्मणुनी
कितिदां तरि केलीस निराशा काय न तव ध्यानीं

जलिं घट भरतां सोडुनि देशी प्रवाहिं यमुनेच्या
कष्टी होतां राधा मुखिं तव लहरी हास्याच्या

भरतां भरतां घटा ओढिसी हळुच जलामधुनी
करुनि तिजसि भयचकित हांसुनी दाविसि घट दुरुनी

झोंके घ्याया स्वतांच ह्मणुनी कुंजवनीं नेशी
नकळत पुढतीं जाशि कुठें तरि तिजला तिष्ठविसी

हताश होउनि गाळि तदां किति नयनांतुनि सलिल
तेथिल तृण कोवळें उगवतें साक्षी देईल

हार गुंफितां तोडुनि पळशी फुलें घेउनीयां
हार कुठें तिज ह्मणुनि बोलसी तूंचि पुन्हां राया

अपुल्या मागें तिला सारखें वण वण फिरवीसी
परंतु तिजसी मुळिं न भेटसी काय ह्मणूं तुजसी

जिथें हरघडी अशाच लीला जिच्या अनुभवाला
कां नच व्हावें दुःख तयांचें तिच्या मानसाला

म्हणशिल नच ती दुःखी तरि मग गात गात गाणीं
भंवतिं सख्यांचा मेळा असुनी कां नच ये अजुनी

आलें म्हणुनी मन्मनिंचा तुज कथायास किंतु
काय वाटतें बोल कान्हया यांत तिचा हेतु

हंसूं येइ तुज या कथनाचें हांस सुखें हांस
गरीब मी, मजवरी पुढें तूं देउं नको दोष
परि शेवटचें ऐक सांगतें मजसि राहवेना
टाकुनि दे रे स्वैरपणा हा, सुखद सकळिकांना
बोलुनि ऐसें दृष्टि मागुती सखिनें वळवीतां
गात सख्यांसह दिसे राधिका हरिकडेस येतां
चकित जाहली नवल वाटुनी सखी राधिकेचें
समोर बघतां वेणु विराजे अधरिं माधवाचे

## ६६

## ' उचित ही करणी '

( ' पेशवा ' पत्रानें गोब्राह्मण प्रतिपालक श्री छत्रपति शिवाजी महाराज यांची विटंबना कां करूं नये ? )

[ पोवाड्याच्या चालीवर ]

तो महाराष्ट्र शिवबाचा
लोपला सर्वथा साचा
लेशही मुळिं न अजि त्याचा
आजला जरी राहता । जगा सांगता । कोण शिवराणा
हाय ! तो हरपला दाणा

अजि दर्शन महाराष्ट्राचें
जणुं काय पिशाच तयाचें
दृष्टि पडे त्या यवनांचे
नामर्द मराठा जीव । पूर्ण जाणीव । यवनहृदयाला
कां बोलुं नये मग बोला

हा दोष नसे यवनांचा
हा दोष खरा शिवबाचा
संताप वृथा मग कैंचा
महाराष्ट्र सिंहासनीं । यवन मर्दुनी । जगीं बसवीलें
का पुण्यकार्य हें झालें
महाराष्ट्र देश आपुला
परचरणीं नच वाहिला
नच हर्ष त्यांत देखिला
तें धैर्य, बुद्धिचतुरता । दवडुनी वृथा । पिशापरि कृतिनें
स्वातंत्र्य मिळविलें त्यानें
अटकेंत शिवाजी असुन
हें शौर्य मोंगली बघुन
तरि जाइ तेथुनी पळुन
मोंगली युक्तिला सकल । करुनियां विफल । धुळीला मिळवी
सत्कृती काय ही होई
परराज्यि न गणि धन्यता
परवशिं न स्वर्ग जाणतां
नृप कशास होई स्वतां
अपराध घोर हा असा । चुके त्या कसा । शासनावीण
ह्मणुनी ही दैना दीन
मशिदीस सजिव ठेविलें
इतुकेंच न तिज पोशिलें
यवनांस प्रेम दाविलें

तें पुण्य उणें जाहलें । तयाचीं फलें । आज खलवचनें
.कां भोगुं नये शिवब्रानें

स्वीकरी भवानी हातां
पूजिली धेनुका माता
रक्षिली ब्राम्हणी जनता
गाजविली जगिं वीरता । तशी मनुजता । जन्म घेवोनी
कथियलें तया हें कोणीं

'तुम्हिं तरी समयिं या अतां
दाखवा कांहिं सुज्ञता
दावुं नका मतिभ्रष्टता
तो मूर्ख शिवाजी ह्मणुनि । थोर गर्जनीं । कथुनि जगताला
धन्य करा महाराष्ट्राला

यावीण आज या घडिला
सुचणार काय प्रतिभेला
पाहतां पूर्व चरिताला
ह्या पिशाचभूमीवरी । पिशाचापरी । उचित ही करणी
ब्रीद तरिच गंगेवाणी

हा ब्राह्मण हा शूद्र वा
ह्या कलहिं कलह वाढवा
कर्तव्य हेंचि भासवा
रक्ताचा वाहुनि पाट । सुखें घ्या घोट । एकमेकांच्या
जग गाइल वीर्या तुमच्या

६७

# माणिकमोती

[ भैरवी-केहरवा ]

माणिक मोती हवे कुणा
मानसभूषा विभूषणा

श्रृंगाराचा साज लेवुनी
माधुर्याचें तेज चढवुनी
सौंदर्याची कांति पसरुनी
खेळवि राधा निजात्मना

हळुच तदां ये हरि त्या ठायीं
रुचिर मधुर तें निधान पाही
डोळे भरुनी, तृप्ति न होई
विसरुनि जाई पदा गुणा

राधा नेणें माधव येई
माधव नेणें समोर कांहीं
राधामाधव जणुं त्या समयीं
माणिक मोती विलोचना

६८

# विरोधाभास

का हृदय हांसलें । काय जाहलें

कुणी न हंसतां । कुणि न हंसवितां
कांहिं न घडतां । कशामुळें

पवसासंगें । मानस रंगे
मधुर परागें । विलोभिलें

वरती गगनीं । शशांकराणी
डोळे भरुनी । विलोकिलें

समोर सरिता । दिसे नाचतां
शशिमुख बघतां । सुधाजलें

शुभ्र रुपेरी । मोहविणारीं
भंवतीं सारीं । फुलें फुलें

मुखांत माधव । श्रवणिं वेणुरव
जीवनराजिव । सुखावलें

यांत कशाचें । हंसावयाचें
गांभीर्याचे । घडे खुले

का हृदय हांसलें । काय जहालें

६९

# लीलासंगम

[ भैरवी-केहरवा ]

मधुकर येई भेटायाला
हांस फुला रे हांस फुला

स्वागत त्याचें कोण तुजविणें
करील सु-मनें या समयाला

अम्हीं कितीही जरि आदरिलें
दुरचे आम्हीं—मोल न त्याला

सहजपणाचा नियम जगाचा
प्रिय तें राही ज्याचें त्याला

या तरि योगें तव हास्याच्या
कळुं दे आम्हां सौंदर्याला

कशास कथणें—जाणिसि सगळें
उशीर मग कां तव हंसण्याला

तव नामाचा पाठ तन्मुखीं
ऐकुं न येई कां रे तुजला

कितिहि योजिलें तरि परिणामीं
दिसत खरें मन सहज जगाला

खचित सांगतों दिसशिल हंसतां
भ्रमराच्या त्या प्रिय दृष्टीला

* * *

फूल फुलें कीं मधुप आधिं ये
विसरे बघतां संगम—लीला

७०

# शारदेचा फुलबाग

मनोज्ञ सुमनांचा
फुले हा । बाग शारदेचा

सुगंध दरवळला
मोहवी । निजजन–हृदयाला

भाव अंतरींचा
एकचि । जग रंजविण्याचा

खल कटुता जगतीं
त्यासवें । दूर घालवीती

उज्ज्वलता चित्तीं
सुप्त जी । जागृत ती करिती

लोकमित्र–किरणीं
दिसत हें । सुमन–रूप नयनीं

* * *

तिमिर न कधिं दावी
फुलांची । शुचिता असली ही

तशांत जे वैरी
तयांची । चिंता कोण करी

तिमिरनाश व्हाया
फुलांचा । जन्मच जगतीं या

मग कैसा धरिल
सदिच्छा । तयांविशीं तिमिर

लोकमित्र ह्मणुनी
अवतरे । प्रतिदिनिं या भुवनीं

* * *

थोर शारदा ती
तियेचीं । फुलें थोर असती

लोकमित्र दावी
थोरता । ह्मणुनि थोर तोही

थोर थोर गानीं
गाइ जी । तीहि थोर वाणी

अशा संगमाला
विनतकवि । करी वंदनाला

## ७१

# भाविका

[ स्वभावाच्या साध्या भोळ्या० या चालीवर ]

" तुझ्यावीणें नाहीं कोणी जगतीं मजला
सोडोनीयां जाशी कैसा हरि ! या घडिला
राजपथाची आडपथाची रति रति शोधियली
तुझ्या पदाची खूण लोचना मुळिं नच आढळली
जाऊं कोठें पाहूं कोठें वद रे तुजला । तुझ्यावीणें०

ठायीं ठायीं कोकिलांचा रव ये श्रवणीं
जेथें तेथें फुललीं पुष्पें दिसती नयनीं
पवन सुगंधी सखीगणापरि भंवतिं सारिखा हा
पीत पीत मकरन्द फुलांतिल गाती भ्रमर पहा
पर्वणी ही आजी कैंची सुखदा अतुला । तुझ्याविणें०

हरि जेथें तेथें खेळे रुचिता असली
हरि जेथें तेथें नांदे शुचिता सगळी
परि कोठेंही इथें दिसेना हरि कवण्या ठायीं
कसें जहालें असें आजला उमजेना कांहीं
कदापिना घडे ऐसें, भ्रम का मतिला । तुझ्याविणें०

जेथें राधा तेथें सारी हंसरी जगती
हरि बोले ह्मणोनी का अजि ही प्रचिती
कोंदण भंवतीं मोदरसाचें कमल जणूं फुललें
पण त्यामधलें मानसमाणिक मलिन असें जडलें
शोभेवीणें शोभा नाहीं जरि ती विमला । तुझ्याविणें०

कोकिलांची वाणी वाटे हरि तूं वदसी
पुष्पांच्या ह्या कोशीं भासे हरि तूं हंससी
श्रवण तोषती नयन रंजती हृदय मात्र तिमिरीं
प्रेमानंदें नाचाया तें पात्र न काय हरि
प्रेमी तैसा स्नेही तूंही वदुं का तुजला । तुझ्याविणें०

आढळेना वेणु जेव्हां क्षण रे नयनां
मना वाटे तेव्हां कैसें वद रे वचना

तूं नच दिसतां तशीच होई स्थिती मन्मनाची
मूर्ति भिन्न तरि उभयांमाजीं हृदय सारिखेंचि
राही सीमा सीमेला ह्या जरि ती विचला। तुझ्याविणें०

तुला वेणु प्यारी तैसा हरि तूं मजसी
जैसें तुझें तैसें माझें मन हें विवशी
तुझियासंगें वेणु असावी सदा सर्वकाळ
मग राधेसह कां न रहावें तुवांच गोपाळ!
—कोण झांकी बाई डोळे—"
—" वद गे हरिला "

७२

## लहाना बाळ

[ वंधांत सदा प्यारा० या चालीवर ]

आनंद मला झाला। आई बघोनि बाळा

अजवरी कुठें गे राही
पाहिलें तया नच कधिंही
मग हा कुठुनि सांग आला

याहुनी किती मी मोठी
एकदां न घेशी पोटीं
हाची मांडिवरि सदाला

हात पाय हलवी कैसे
मनाशींच सुंदर हांसे
याचा खेळ तो ग कसला

हांसतो 'लबाडा' म्हणतां
रडतसे 'शहाणा' वदतां
दिसतो वेडपाच मजला

वळवितो मुठी हाताच्या
काय राहिती गोडाच्या
कैसा चोखितो ग त्याला

मजकडे न देखे मुळिंही
तुजकडेच टकमक पाही
दावी जीभ, ओठ अपुला

हात करुनि वरवरती गे
काय बाहुली हा मागे
हातीं धरिल कसा तिजला

जुनी बाहुली मी देतें
बरी चिमुकली ती दिसते
हलकी तशिच खेळण्याला

बोलतां 'जुनी' पण आई
लागला रडाया पाही
'उगि रे नविच घेइ तुजला'

हा तुझा लहाना बाळ
खेळतें सवें त्या खेळ
माझ्याजवळिं दे तयाला

७३

# बिचारा अक्रूर

[ बंधांत सदा प्यारा० या चालीवर ]

हें काय दिसे डोळां । सारा मुकुंद भरला

जा कुठेंहि कवण्या ठायीं
कृष्ण नाम कर्णीं येई
न दुजा नाद जणूं कसला

ओष्ठदलीं स्वच्छन्दानें
हरिमिलिंद निशिदिन असणें
हाची खेळ रंजनाला

हृदयसरीं गोकुळधामीं
हरिसरोज हंसरें नामी
जणुं कीं तिलक सुभगतेला

कृष्ण कृष्ण खालीं वरती
कृष्ण कृष्ण एकचि भंवतीं
हरि हा चोहिकडे रुजला

तृण, शिला, तरू, लतिकांना
सान थोर जड जीवांना
वाटे कृष्ण जीव अपुला

बोल कृष्ण एकचि ठावें
तयालाच संतत गावें
विहगां तोचि मोद सगळा



" सारा मुकुंद भरला "

All rights strictly reserved.

धेनुका कशा ह्या येथें
सोडिती न पळभर हरितें
बघती सतत हरिमुखाला

प्यावया मिळावें हरिसी
वासुरें न पीति पयासी
ऐसा हरिस्नेह अतुला

ल्हान ल्हानशीं हीं पोरें
हरिसाठीं विसरिति सारें
न कुठें दिव्य लोभ असला

वडिल माणसें हीं मोठीं
वडिलकीस हृदयिं न धरिती
स्मरती मधुर हरिगुणाला

प्रेमहृदयवीणेवरती
प्रेम–गीत गोपी गाती
अपुल्या प्रेम–माधवाला

प्रति रती इथें हरिमय ती
छे !–गमे साच हरिमूर्ति
कैंचा कृष्ण–लाभ मजला

प्रेम–पंजरांतुनि हरिं ! या
केंवि मुक्त होशिल समया
नकळे दीन अक्रुराला

७४

# निवेदक

[ लिहूं कविता कोणती० या चालीवर ]

किती गाशी । किती फिरसी
तरूतरुसी भेटसी

हर्ष कशाचा मोद कशाचा
इतुका रे तुजसी । कोकिला
काय जहालें काय वाटलें
तुझिया हृदयासी । कोकिला

कुठें अजवरी असिस भूवरी
मुळिं न कसा दिससी । कोकिला
अतांच कुठुनी ऐसा भुवनीं
अवचित अवतरसी । कोकिला

एके ठायीं पाय न राही
वण वण रे फिरसी । कोकिला
सकाळ नाहीं दुपार नाहीं
सदैव रे गाशी । कोकिला

स्तोत्रपाठ कीं पाठ स्तुतिचा
अखंड हा करिसी । कोकिला
मनोविनोदनिं किंवा रंजनिं
मतिला गुंगविसी । कोकिला

स्वरूप उज्ज्वल मानस कटु खल
अनुभव जगतासी । कोकिला

काळ्या रूपीं शुचिता व्यापी
तयास कीं कथिसी । कोकिला
खरें असो तें नसो तरी पण
दिसते करणीसी । कोकिला
चराचरीं चैतन्य ओपिसी
प्रफुल्लता अणिसी । कोकिला
स्वरूप राही स्वरुपा ठायीं
कोण पुसे त्यासी । कोकिला
अंतरंग परि जगत चितारी
तेंचि रूप—साक्षी । कोकिला

७५

## वात्सल्य

[ दीन मुला० या चालीवर
—आनंदगीत, भाग दुसरा ]

हांस जरा । हांस जरा
होइ घाबरा । हा जीव सुंदरा
हास्य तुझें । सुख माझें
त्याविणें दुजें । ना सुखवि मजसि जें
मज भंवतीं । बहु जगती
मम जिवाप्रति । तूं एकमात्र ती

रिझवाया । सुखवाया
एक राजया । तो तूंचि लोकिं या
तूंच जरी । खेद करी
जीव मम तरी । हा विफल भूवरी
मम आशा । रे मनिषा
तूंचि सकलशा । या जननिं पाडसा
तुजवरती । मम ज्योति
राहि जागती । या घडिस संप्रति
मधुरपणें । करि वचनें
इच्छि मम उणें । हें जगत परि गुणें
तूं मजला । मी तुजला
जननि मी तुला । तूं तनय रे मला

## ७६

# लीलावती

[ वद जाशि कुठें यदुराया० या चालीवर
—आनंद-गीत, भाग दुसरा]

तेथेंच गड्या राहि उभा क्षणभरी तरी
तव नयनमधुर रुचिर वदन पाहुं दे हरि
वच टाकुं नको एकहि रे पुढतिं पाउला
नच घेइ तिळहि पाठीशीं तेंवि त्याजला
मुळिं इकडे ना तिकडे ना वळवि दृष्टिला
रे स्थिर नयनें स्थिर चरणें स्थिरपणा धरी

येतांच जवळिं अपुलेंपण हृदय धरितसे
होतांच दूरि दूरिभाव नेणतां वसे
हा दृष्टिदोष, अपराधी यांत कुणि नसे
म्हणुनीच तिथें मूर्ति तुझी शोभते बरी

तूं ऐक अतां हळुच ठेवि अधरिं बांसरी
रे काढि मृदुल मंजुळशी नादमाधुरी
मम हृदयसरीं सांठवुं दे निज मनापरी
तिज सार दुरी, कळली तव कुशल चातुरी

तूं हंसुनि अतां अधरदलां फुलवि कांहिंसे
रे हंससि किती, फार नको, सकल मुख दिसे
जणुं दावि अधरिं स्मितवसंत सहज रमतसे
मनिं ठसलें तव अतुल हास्य, थांबवी तरी

तूं बोल अतां गोड गोड बोल तत्वतां
कीं ऐकुनियां लाजावी पूर्णचन्द्रता
तें बघुनि देव तुच्छ वदो सुरसुधामृता
तव अमर बोल, राहि उगा, घुमत अंतरीं

तूं झेल अतां वरचेवरि फूल फेंकितें
रे चुकलें ना, बघसि कुठें, शिरिं तुझ्याच तें
तुज इतुकेंही होईना नवल वाटतें
धरिलास कसा सांवरुनी एवढा गिरि

तूं क्षणचि एक घेइ अतां नेत्र लावुनी
रे सांग नीट कोठें ही राधिका झणीं

बघ उचललीस, मज दिसलें, हळुच पापणी
तुज ह्मणति थोर जगिं वाटे तें खरोखरी !

तूं येइ अतां हंसतमुखें जवळिं माझिया
तेथेंच उभा, कोपलास काय राजया
पण तुजविण मम पुरवि कोण हौस समयिं या
तुज जगत तरी तूं मजला एक भूवरी

७७

## राघो भरारी !

[ पोवाड्याच्या चालीवर ]

काय केलें तुवां राघोबा
असिस वाघोबा । दुस्मनांचा
मग शुद्ध मती तव कशी भ्रष्टली माग न मुळिं याचा
तो मराठ–वारु फेंकुनी
भरदौड मारुतावाणी
पाजिलें सिंधुचें पाणी
नाठवे कसें हें तदां । स्व–जनसंपदा । तुच्छ गणिली
काय रे कृती ही झाली

वारुचे तुझ्या लोचनीं
धूलिकण गगनिं । देखतांना
सोडिती पटापट शत्रु भयानें तिथेंच स्वप्राणा

'आला रे राघो भरारी'
ऐकतांच ही ललकारी
जो रिपू दडे अंधारीं
सेवितां तयाचे चरण। काय हें स्मरण। तुज न होई
घेतला शत्रु निज गेहीं

स्वजनांची बंदी तुला
करी व्याकुला। काय हृदया
फासांत शत्रुच्या आपसुखें तूं ह्मणुनि जाशि राया
बाजिचे खड्ग जयवंती
नानाची अतुला कृति
भाऊची निधडी छाती
हे कोणि न का तेधवां। तुला राघवा। आडवीती
तुजलाच काय ते भीति

आयुष्यीं पापी कृति
करिसि रे किती। गणति नाहीं
परि होसि शत्रुचा गुलाम नच त्या तोड कशाचीही
शत्रुनें तरी निज बळें
कोणत्या पदा चढविलें
तेंहि तुझ्या अनुभविं आलें
आपुलें कार्य साधुनी। लाथ मारुनी। घात केला
नरकांत लोटिलें तुजला

तूं गुलाम होसी जरी
दाविसी तरी। सदन रिपुसी

गृह, धर्म, देशिं निज शत्रुकरानें नांगर फिरवीसी
महाराष्ट्र परतंत्रता
तदुपरी ग्रासि भारता
त्यासवें जाइ धर्मता
सुतपौत्रहि तव शेवटीं । जान्हवीतटीं । माळ जपती
तव नामिं अश्रु ढाळिती

तूं आज कुठेंही जरी
भूतळावरी । वघे तिथुनी
प्रसवली कोणतीं, कशीं फळें ती तुझी पापकरणी
कलहतरू फोफावले
स्वार्थाचीं फुलतीं फुलें
दारिद्र्य सबळ जाहलें
जळ, तेज, वायु, अंबर । शत्रुचा कर । जाति धरुनी
होतांच पारखी धरणी

जन्मास राघवा जरी
भरतभूवरी । मुळिं न येता
इतिहास भारतीं परम रम्य किति दिव्य रूप घेता—
—पण कलीरूप घेउनी
दुर्दैवें त्वां अवतरुनी
हें रूप दिलें कष्टुनी
कलि—पुराण खोटें नसे । निधी तो असे । सत्यतेचा
इतिहास साक्ष अजि अमुचा

७८

# टणत्कार

( 'अश्वमेधयज्ञाचा अश्व सोडून दे' असें सीतेनें ह्मटल्यावरून लवानें जें उत्तर दिलें तें खालील गीतांत कथन केलें आहे.)

आई ! सोडणार नाहीं
हय हा । सोडणार नाहीं
कशास चिंता तुझिया ठायीं
पुत्र तुझा मी आई । आई०
विजयी वारू जग जिंकाया
फिरुनी भूवरि राही । आई०
आजचि कांहीं देवदयेनें
निर्वीर न धरणी ही । आई०
मीहि वीर गे अपुल्यापरिचा
करिं कंकण मम नाहीं । आई०
समरा भिउनी हया सोडिलें
ऐसें वदतिल पाही । आई०
थोर केवढा सूर्यवंश तो
जन्म तिथें मम होई । आई०
दशमुखजेता पिता मम असा
तत्कीर्ती जग गाई । आई०
वंद्य श्रेष्ठतम महान् गुरूचा
प्रिय शिष्या मी राही । आई०

भीरुपणानें माझ्या ऐशा
कलंक सकलां येई । आई०

असोत अवघे परंतु आई
कूस वृथा तव होई । आई०

धीर धरोनी तुझ्या लवाचा
बघ विक्रम नयनांहीं । आई०

टणत्कार मम केवळ धनुचा
पळवाया रिपु लावी । आई०

७९

## साधु कीं जादुगार

[ मी तप्त जरी मदन० या चालीवर ]

मज कोडें हें उकलेना सांग श्रीहरि
किति यत्न करी विफल तरी विकल अंतरीं

वदनारविंद रुचिर तुझें देखतां क्षणीं
मम चित्तभृंग गुंगतसे भान हरपुनी
तें गुंजणेंहि शेवटिं रे जाय विसरुनी
तव दर्शनसुख तरल हृदय विरल कां करी

किति बोलावें वाटतसे तुजशिं भेटतां
अनिवार होति हृत्तरंग जरि निरोधितां
मग स्वतांशींच होय कथन अंतिं तत्वतां
परि भेटतांच कां होई मूक वैखरी

नच भेट तुझी होय तरी हृदय कोपतें
कीं इतुकें तनु थरथरुनी कंप पावते
तुज ताडावें कटु वचनीं बहुत वाटतें
पण देखतांच कां निमिषीं होय हांसरी

तव मुरलिगानिं श्रवण मुके वदन बोलकें
तव मुरलि मुग्ध श्रवणमुक्त वदन हो मुकें
नच गीत तदां ये उभयां बधिरपण निकें
ही जादु नव्हे मजहि गमे, भास कां परी

सहवासिं तुझ्या मन्मन रे शांत राहिना
अपरोक्ष तुझ्या सुखद शांति वाटते मना
विपरीत अशी अनुभविं कां स्नेहकल्पना
तुज साधू कीं जादुगार काय म्हणुं तरी

८०

## नव भारतास

[ अंबरगत परि पयोधरांतें० या चालीवर ]

कशास येशी जन्मा बाळा ! भारतवर्षी गड्या
कोणत्या मनीं योजिल्या उड्या
ठावें तुज का जन्मा आलों आपण कवण्या स्थलीं
येशि कीं नेणतांच भूतलीं
एक वेळ जो वैभवशाली दिपवी तेजें जगा
तोचि अजि दारिद्र्याचा फुगा

निवारिण्या अंधार सदनिंचा रत्नदीप पाजळे
तिथें बघ तिमिरदीप तो जळे
ही नसली तरि जाणीव असूं दे सदा
आयुष्यिं तियेचा विसर न पडुं दे कदा
ही एकच तुझिया जीवनिं गुणसंपदा
तिच्यावीण सुखशांति–लाभ नच लाभे तव मानसा
तीच रे तव जीवितपथदिशा

भारतवर्षा ह्मणती तेव्हां अमरांचें मंदिर
तेथले जन सारे सुरवर
दृश्यरूप सत्याचें रघुकुल रामचंद्र भूपती
जानकी प्रेमाची पार्वती
मनुजपणाचें व्यवहाराचें कृष्णाचें जीवन
दधिचि ऋषि त्यागाचें दर्शन
ध्रुवबाळाची निश्चल ध्रुवता चिरंजीव जाहली
वीर्यता हनुमंतें दाविली
करि खडा पहारा रात्रंदिन हिमधर
कर जोडुनि किंकर आज्ञांकित सागर
गंगादिक माता स्नेहाच्या आगर
असा देश जो तया सन्मनें ह्मणसि काय सर्वथा
आणखी स्वर्ग दुजा कोणता

पुण्यबळें वा दैवबळें वा दुर्भाग्यें ह्मण तरी
जन्मसी असल्या स्थानावरी
इतस्ततां या भारतवर्षा बघशिल तूं जेधवां
बोलशिल अह्मां खुळे तेधवां

‘ हाच काय तो स्वर्ग सुरांचा, हें तर मृत्युस्थल
सारा जिवंत प्रेताचल
कुठें सत्य, व्यवहार, त्याग तो प्रेम, वीर्य, निश्चय
भुतांचें विशाल नृत्यालय, ’
या अशा विचारें दु:खद वैतागुनी
अनुताप तुला निज जननाचा होउनी
होशील सज्ज तूं तनुच्या त्यागा झणीं
प्रथमच म्हणुनी तुला कथियली सगळी स्थिति बालका
तुझा करि विचार आतां निका

जिथें जन्मसी तिथें तयासी कृतघ्न होणें मुला
न शोभे कदापि आतां तुला
कृतज्ञतेची एकनिष्ठता तच्चरणीं वाहणें
हेंचि रे यापुढतीं तव जिणें
जगत्–दृष्टिनें असेल पतिता, तरी तुझी जननि ती
सकळिकीं थोराहुनि थोर ती
सुखदु:खाची तुझ्या विभागी एक अतां जन्मभू
तीच तव प्राणांचाही प्रभु
ज्या स्वर्गाचा हा मृत्युलोक पाहसी
त्या पुन्हां चढविणें स्वर्गाच्या पदविसी
कर्तव्य नव्हे का उचित तुझें आजसी
आचरितां आचरितां ह्या रे कर्तव्या निशिदिन
सरो हें एकनिष्ठ जीवन

जुगार, मदिरा, जातीसंकरा, स्वैराचरणा जनीं
नको हें शिकवायातें कुणी

मातापितरां कृतघ्नतेनें तुडवाया पदतलीं
हवी रे कशास ग्रंथावलि
संस्कृतीस आपुल्या निंदुनी परकी आलिंगणें
नको हें कुणास कुणि सांगणें
मानवबुद्धी कुमार्गगामी उपजत राही खरी
कठिण तिज सुपथिं वळविणें परी
तारुण्यमदानें स्वैर धुंद होउनी
अपुलेंपण कधिंही जाउं नको विसरुनी
मी कोण, कुणाचा सदैव हें जाणुनी
जन्मतांच तूं तुझा नससि रे, तूं तुझिया आइचा
भारता ! सफल करी ह्या वचा

८१

## धन्यता

[ मधुर मुरलि मधुनाद० या चालीवर–आनंद-गीत, भाग दुसरा ]

मनमोहन हा येई राधे ! वाजे बांसरी
वचनातें सावरी

अतांवरी जे दुर्वच वदली
काय तयानें हौस न फिटली
थांब जराशी तरि या कालीं
तूंहि घेइ कांहीं माधुरी वाजे बांसरी

आतुर सगळ्या ऐकायाला
ऐकूं दे गे वेणु अह्मांला

यास्तव तरि धरि मुग्धपणाला
उदारता दावी अंतरीं वाजे बांसरी

आपण होउनि रंजविण्याला
माधव येतो या समयाला
किती धन्यता ही अपणांला
भाग्य कुणाचें हें भूवरी वाजे बांसरी

तुझें एकदां नसेल हरिनें
कधीं ऐकिलें मनापरीनें
सदैव ह्मणुनी का रागविणें
अग अपुला हरि तो सुंदरी वाजे बांसरी

हरिचें कैसें निर्मळ मानस
त्यांत न रतिभर दिसतें किल्मिष
बघा कदाही उज्ज्वल पायस
रागविता जरि तो कधिं तरी वाजे बांसरी

लाभ हरघडी तुज वेणूचा
लेश अह्मां नच त्या भाग्याचा
प्राक्तन फळलें तरि या घडिचा
देइ लाभ न करी तिज दुरी, वाजे बांसरी

कोपशील तूं आतां वेगें
घडिनें त्याच्या जाशिल मागें
क्षण हा कधिं ये पुन्हां अह्मां गे
बोल गडे उगि कां वैखरी वाजे बांसरी

८२

# स्वतंत्र भारत

[ आनंदकंद ऐसा० या चालीवर ]

लाभेल याच काला । स्वातंत्र्य भारताला
अजि दास जो दुज्याचा
धनि तो उद्यां स्वतांचा
बघतां दिसे जगाला । स्वातंत्र्य भारताला
नामर्द हिन्द सारा
बोलो कुणी बिचारा
बोलेल तोचि बोला । स्वातंत्र्य भारताला
स्त्रीवेश पार्थ घेई
स्त्री का म्हणोनि होई
येतांच त्या क्षणाला । स्वातंत्र्य भारताला
सविता सदा न जेंवी
राही निशा न तेंवी
मग कां न शक्यतेला । स्वातंत्र्य भारताला
हें कालचक्र फिरतें
स्थिरता मुळीं न त्यातें
ह्मणुनी बघाल डोळां । स्वातंत्र्य भारताला
देवो कुणी न देवो
घेवो कुणी न घेवो
न टळे अतां विधीला । स्वातंत्र्य भारताला

श्रद्धा पराक्रमाची
निष्ठा निजात्मतेची
सामर्थ्य हें कृतीला । स्वातंत्र्य भारताला

जीवा विनाश नाहीं
जीवंत जीव राही
तो जीव जीविताला । स्वातंत्र्य भारताला

अन्य स्वतंत्र होती
येई सदैव दृष्टी
सन्देह तो कशाला । स्वातंत्र्य भारताला

परमेश जो तयांचा
या तोचि भारताचा
दे छत्रचामराला । स्वातंत्र्य भारताला

नव काल जन्म घेई
नव तेज तेज दावी
नव दिव्य दिव्यतेला । स्वातंत्र्य भारताला

८३

## शिलेदार

[ लावणीच्या चालीवर ]

स्वतंत्र होतां देश उद्यां हा
शिलेदार होणार
शिलेदार होणार
पगडी शिरावरी चढणार

काठेवाडी घोड्यावरती
होईल मग हा स्वार
होइल मग हा स्वार
लटके कमरेला तरवार

सांजसकाळीं बुरुजावरुनी
आबादी बघणार
आबादी बघणार
रिपुशीं जागरूक असणार

बसुनि चावडिंत गांवकऱ्यांच्या
मुजऱ्यांना घेणार
मुजऱ्यांना घेणार
त्यांचा समाचार पुसणार

चोरि चहाडी लांडि लबाडी
ध्यानामधिं अणणार
ध्यानामधिं अणणार
न्यायें शासन त्या करणार

वेष पालटुनि बेरात्रींचा
गांवामधिं फिरणार
गांवामधिं फिरणार
फितुरी अचुकपणें धरणार

घुसलेलें दारिद्र्य दुःख तें
सुळावरी देणार

सुळावरी देणार
सुमनें शांतिसुखा लुटणार

चार पंच जमवुनी गांवचे
विचारणा ठरणार
विचारणा ठरणार
अमुचें रामराज्य दिसणार

देशाला स्वातंत्र्य लाभलें
सुदिन तोचि भजणार
सुदिन तोचि भजणार
करुनी अखंड जयजयकार

स्वदेश माझा धनी सर्वथा
मी त्याचा मुखत्यार
मी त्याचा मुखत्यार
त्याचें हित माझें साचार

८४

## भावगीत

[ वाजवी मुरली० या चालीवर
—आनंद–गीत, भाग पहिला ]

विठूनगरीला । हरिभक्तांचा मेळा
चालला गात विठ्ठलाला

टिळा चंदनाचा । गळां हार तुळसीचा
शिरीं वर्षाव अबीराचा

टाळविणा हातीं । मुखीं नामसृष्टि
अंतरीं प्रेमभावभक्ति

तालसुरावरती । चरण नाचताती
विराजे स्कंधिं पताका ती

नाद मृदंगाचा । विश्वशारदेचा
प्रवाहित लोकजान्हवीचा

सारखा घोष । मुळिं न हृदय-दोष
सकळिकीं हाचि एक तोष

नारीनरबाळें । एकवृत्ति सगळे
विठूच्या नामिं रंगलेले

भुले जडजडता । तिथें सजिव मानवता
गुंगली नवल नसे बघतां

विठूची लीला । कोणत्याहि काला
दिव्यपण दावी जगताला

नाम विठोबाचें । हृदय माधुरीचें
सार हें परम दिव्यतेचें

मुखीं ज्या वसतें । तिथेंच तें रमतें
तया निजरूप रमुनि देतें

अखंड नामाचा । खंड करायाचा
करुनि हा विचार स्वमनाचा

समयिं त्या तरणी । तळपुनि सकल कलांनीं
दाहिलें जगत चंड किरणीं

पाखरूंहि कोणी । न फिरे वातावरणीं
मग तिथें कुठें मनुजप्राणी

परी त्या कृतिनें । नामगर्जनेनें
कोंदलीं निखिल तदा भुवनें

शेवटीं स्वमनीं । निराश होवोनी
चालला परत रवी सदनीं

वरुण हें बघुनी । कोपे अंतःकरणीं
दावि मग उदंड निज करणी

सरीवर सरी । वर्षति धरणिवरी
जणूं कल्पांत अतांच, तरी–

नामाचा मधुर । अभंग चाले गजर
कणकणीं घुमला सर्वभर

उलट दुज्या घडिला । जीव घेउनी अपुला
कळेना वरुण कुठें दडला

जिथें स्वच्छंद । विहरे ब्रह्मानंद
कोठला तिथें भेदछंद

धरुनि खिन्नतेला । वरुणामागुनि तरला
गवाक्षीं बैसति उडुबाला

देवलोकींचें । सौंदर्य थोरवीचें
लुप्त कां बघती पुण्याचें

मंगल नामसुधा । तोंचि श्रवणीं येता
जाहल्या मंत्रमुग्ध वनिता

विसरिती बघणें । तसेंच परतुनि जाणें
ऐकती विठाइचें गाणें
किंवा नयनांते । वैकुंठ धरेवरतें
अकल्पित काय दिसे त्यांते
धन्य तें धाम । धन्य भक्त काम
धन्य तो विठू धन्य नाम
धन्य धन्यतेतें । अगम्य वैकुंठातें
भेटवी मर्त्य जीवनातें
धन्य ‘ आनंद ’ । धन्य गीतछंद
गावया लाभे गोविंद

८५

# निर्झर

[ लावणीच्या चालीवर ]

सृष्टीचा लडिवाळ बाळ वेल्हाळ कुठें चालला
बोलवी जननि तया प्रेमला
“ थांब रे थांब श्यामला
हा जीव तुझा चिमुकला
श्रमशील वृथा कोमला
मांडीवरि ये तुज खेळवितें, तूं माझा तान्हुला
खेळ वा समोर माझ्या मुला

" हृदयींचा निष्पाप तुझ्यासम तूंचि खरा आजला
मलिनता इतरिं दिसे निर्मला !
पण अजाण तूझें वय
तें नसे मुळिंच निर्भय
वाटतें ह्मणुनि रे भय
अजाण जीवावरी नाचवी सुजाण निज हेतुला
अनुभवीं कळेल पुढतीं तुला

" तुझ्यापरिच ह्या मत्स्यगणांचा नायक तूं एकला
खेळवी मनापरी त्यांजला
हे बालतृणांकुर गडी
त्यांसवें खेळ हरघडी
पुरवि तूं तुझी आवडी
अपुल्यावाणी अपुल्या मेळीं जो कोणी खेळला
तयाचा खेळ होय चांगला

" नानापरिच्या आमिषांस रे दाविल कोणी तुला
न भुलतां येउन सांगे मला
अजि कोपशील मजवरी
परिणाम सुखद हो परी
आइची सत्य वैखरी
सगळ्या ब्रह्मांडीं ह्या आइच एक अशी निस्तुला
तिची सर न ये कुण्या वस्तुला

" ऐक ऐक रे धरूं नको बघ बाळहट्ट हा खुळा—"
तरी पण पुढेंच तो चालला

आसिलें कुणी सांगती
जान्हवी कुणी बोलती
कुणि रत्नाकर बोधिती
परंतु अजुनी ' ये, ये बाळा ' बोल असा बोलिला
ऐकुं ये पितां प्रवासी जला

८६

# कलदार

[ उद्धवा शांतवन० या चालीवर ]

कवडीच मोल कवडीचें । कोठुनी येइ कलदार
मिरविली कितिहि डौलानें । घेउनी रूप कलदार
जरि शंखनाद बहु केला । तरि कोण देइ कलदार
कलदारावरि कोपोनी
त्या शिव्याशाप देवोनी
मन तनू वृथा शिणवोनी
शेवटीं लाभ बघतांना । कवडीच पदरिं येणार

जरि सहस्रशा कवड्यांना । जमवीलें एके ठायीं
तरि एक्या कलदाराची । काय तया महती येई
कवडीच्या आयुष्यीं वा । करुं नयेच ती आशाही
काजवे कितिक लुकलुकती
क्षण रम्य लोचना दिसती
तरि काय चंद्रमा होती
काजवा कुठें तो चंद्र । त्यापरी कवडि, कलदार

साम्राज्यीं विश्वाच्या ह्या । थैमान घालि अंधार
चन्द्रमाच त्यातें वारी । फेंकुनी किरणसंभार
काजवा कुठें तइं दडतो । नकळे जणुं मुग्धा नार
काजवा उलट लुकलुकतां
तिमिराची घन भेसुरता
दाखवी मात्र या जगता
तशि करणी ऐन घडीला । प्रकटवी कवडि, कलदार

एकेक थेंब पाण्याचा । मिळुनिया जलाशय होई
प्रत्येक थेंब म्हणुनी का । कासार स्वतांला म्हणवी
अंधही वदेल न ऐसें । मग डोळस दूरच राही
एकेक मिळुनि कवडीला
कलदार घेइ जन्माला
नच खोटें हें बघण्याला
तरि कवडी कवडीमोल । कलदारमोल कलदार

कवडीला कवडी म्हणतां । कां राग तयाचा यावा
वदणारा त्या वचनाला । नच धरी शुभाशुभ भावा
बोलतों सहजवृत्तीनें । जो बोल मुखीं बोलावा
वेड्याला वेडा ह्मणणें
मातीला माती वदणें
सोन्याला सोनें कथणें
यामाजी कसलें पाप । न्यायानें करि कलदार

कवडिचें अहित चिंतूनी । कोणता लाभ कलदारा
कवडीचें रूप स्वतां ये । तो जाणे ह्या अविचारा
कवडिचें क्षुद्रपण बघुनी । दे उलट कृपेचा थारा

झालियास ईर्षा हृदया
मोहोरपदा गांठाया
झिजविल तो अपुली काया
चकमकिच्या द्वेषाहूनी । कृति दुसऱ्या रविला थोर
दगडावरि पडतां कवडी । होय तिचा जीवित—नाश
पण चुकुनि जवें कलदार । पडतां तरि दे नादास
ह्मणुनीच जगत हें सारें । कलदारीं धरि लोभास
सांगणें तरी कवडीला
ठेवुनी द्वेषबुद्धीला
यश कदापि ये न कुणाला
सन्मनें झटावें यत्नें । व्हावया मूर्त कलदार

८७

## झोला

[ ये धांवत कृष्णाबाई० या चालीवर ]

टाकुनी कसें रे मजसी । बा हृषिकेशी
एकलाच झोंके घेशी
आपुलें काय ठरलेलें । हरि ! त्या वेळे
दोल्याला जइं बांधियलें
इतुक्यांत कसा विसरीसी । निज बोलासी
घटिकाहि न होय तयासी

जाईल पळुनिया झोला । वाटे तुजला
म्हणुनि का करिसि घाईला
हा झोला नयनीं येई
मनिं सहजीं इच्छा होई
जणुं घडेच आधिं न कांहीं
हा भाव दिसे तव वदनीं
नवख्यावाणी । परि ही करणी
मज पुरती ये समजोनी

तुम्हि पुरुष आपुल्या कामीं । मोठे नामी
नच तुलना त्रिलोकधामीं
अबलांस कसें झुलवावें । स्ववश करावें
पुरुषांसचि पुरतें ठावें
सुजनता किती दावावी । किति ठेवावी
क्षणिं कवण्या उलटी घ्यावी
हा उपजत गुण पुरुषांचा । कौतुकतेचा
परि घेइ जीव अबलांचा
झोल्यास बांधितां तरुसी
किति गुलगुल गोष्टी करिशी
श्रम मुलींच वाटुं न देसी
साधितां तुझ्या हेतूला
त्या बुरख्याला । फेंकुनि, अपुला
उधळलासि गुण अंताला

म्यां तुझियाजवळीं यावें । तुज विनवावें
नयनांतुनि जल गाळावें

त्वां ध्यानिं न तें आणावें । म्यां कोपावें
संतापुनि निघुनी जावें
मग हळुच हांक मारावी । जाणिव घ्यावी
कीं सहसा ऐकुं न जावी
पुनरपी मजचि बोलावें । जनिं सांगावें
निज दोषीपण झांकावें
तुज नको कुणीही जवळीं
हा हेतु तुझा या काळीं
म्हणुनि ही घडे कृति काळी
पण आधिंच कां मनिषेला
कथिसि न मजला । छे, पण तुजला
सरळपणा इतुका कुठला

संकेत असा आधींचा । ठरला साचा
जरि अपुल्या हरि ! दोघांचा
तरि धीर धरोनी हृदयीं । क्षण रे कांहीं
राहसी न अपुल्या ठायीं
नच जाता पळुनी झोला । राधाबाला
तैसाच तूंहि गोपाला !
अंतरिंचा माझ्या भाव । कीं अनुभाव
घ्यायाचा होता ठाव
म्यां स्वतां करें हिंदोलीं
बसवावें तुज वनमाली
ही आस मन्मनामधली

हळुहळुसे झोंके द्यावे
गाणें गावें । तुज रिझवावें
तें पाहुनि म्यां हर्षावें

ही अणिली चंपकमाला । घालायाला
तव कंठीं शोभायाला
शिरपेंच गोड कलिकांचा । तव मुकुटाचा
जणुं रुचिर मोतिदाण्यांचा
हे गजरे करचरणींचे । जाइजुईचे
गुंफिले किती मौजेचे
हा साज तुझ्या मुरलीचा । नानापरिचा
घे बघुनि तुझ्या आवडिचा
हौसेनें श्रृंगारावें
तें डोळे भरुनि बघावें—
जाउं दे कशास कथावें
दुखविलें अकारण सदया
उत्सुकहृदया । ऐशा समया
तुज काय ह्मणावें राया

रे कशास आतां मजसी । बोलावीसी
बैसाया अपुल्यापाशीं
मजसाठीं दोल्यावरुनी । श्रम घेवोनी
उतरिसी कशाला ह्मणुनी
कर माझा धरिसि कशाला । हंससि कशाला
मधुर वचा वदसि कशाला

नोहे तो क्षण आतांचा । हा राधेचा
तो कधिंच न परतायाचा
तूंचि अतां झोंके घेई
वाटेल तसें या समयीं
वेणूवरि गाणें गाई
मग खुशाल उघड्या नयनें
शांतपणानें । संतोषानें
क्षण राधेचा बघ कृतिनें

या समोरच्या·शाखेला । बांधुनि झोला
घेईन अतां झोंक्याला
तूं येशिल येथुनि तेथें । निश्चित वदतें
मज झोंके देशिल हातें
हा साज फुलांचा सगळा । घालुनि मजला
सजविशील तूं गोपाला !
वेणूच्या आलापांनीं । मज रिझवोनी
डोलशील तूंचि स्व-मनीं
क्षण खराच तो भाग्याचा
जो चिदानंद राधेचा
जो हरिच्या अनुरागाचा
ती राधामाधव—लीला
नमवी काला । चढवि कवीला
तो धन्य अनुभवी झोला

८८

# आनंदाचें साम्राज्य

[ सबसे रामभजन० या चालीवर ]

स्वातंत्र्य भारता लाभे । सारा आनंदी आनंद

भगवंताचें अधिष्ठान जें भ्रमें विसरुनी गेलें
मनोमंदिरीं दिसेल पुनरपि तया स्थापियेलें

रात्रंदिन कष्टुनी पोटभर अन्न मिळेना ज्यांना
हृदय-तृप्ति होउनी तयांची देतिल ते दीनांना

रत्नमोलि परि धुळिंत रत्नपण विचारिना फुकटाला
कोहिनुरासम तेचि दिपवितिल समस्त जगताला

तुटल्या फुटल्या गंजुनि गेल्या बंदुक तरवारी
भुवनीं तेजें वीजेवाणी लखलखतिल त्या भारी

गांवगांव ओसाड जाहले, ओळखही पटतेना
सौंदर्याचें आगर केवळ दिसतिल ते डोळ्यांना

भव्य भव्य प्रासाद भंगुनी गर्दभ करिती नृत्याला
तिथें थोर मुत्सद्दि बुद्धिचे खेळतील खेळाला

कलह निरंतर, कुणि न कुणाशीं वदति गोड बोला
सुखदु:खाचें एक्या मेळीं कथितिल निशि हृदयाला

कविता ह्मणुनी विटा रचुनि जो बडबड करि वाया
चिरंजीव ती काव्य-चंद्रिका तन्मुख लागे गाया

देवि शारदा, देवी कमला, देवि अंबिका ती
करांत कर टाकुनी विहरती भारत-हृदय-प्रांतीं

स्वातंत्र्य भारता लाभे । सारा आनंदी आनंद

८९

# सती

[ होय मला अपशकुन० या चालीवर ]

काय तुझ्या अतरा दयाळा
सांग मला तें या समयाला

तुज भेटाया माझें येणें
काय रुचेना तव हृदयाला

येणें माझें केवळ येथें
तुझ्या मनाला रंजविण्याला

समाधान तुज ज्या गोष्टीनें
या जननीं तरि प्रिय ती मजला

येउन गेलें, ठाउक नव्हतें
दुखवुं नको निज मन, विनतीला

उद्यांपासुनी कथिशिल जरि तूं
वर्ज्य करिन ह्या साच दिशेला

कुठेंहि पाळिन, न करी चिंता
मम हृदयींच्या प्रिय धर्माला

राधा आतां नच राधेची
ती कृष्णाची या वेशाला

१०

# खरें काय

हें चंद्राचें चांदणें
जणूं शोभणें । शोभिवंताचें
शोभतें ज्यापरी वैभव जगिं मनुजाचें

वाढवी विभव आपुलें
मनुज निजबलें । थोर आशेनें
चंद्राच्या चढत्या कलेपरी करणीनें

गांठतां शिखर वैभवें
उतरितें जवें । दुज्या घटिकेला
अवकळा जशी ये पूर्णचंद्र—कांतीला

जीवना पूर्ण वैभवीं
नित्य खेळवी । दिसेना कोणी
चन्द्राची उपमा देति काय त्या ह्मणुनी

चन्द्राची पापी कृति
अशी दुर्गति । भोगवी त्याला
दुष्कृती व्यापि का तेंवि मनुज—विभवाला

९१

# कविबाला

[ आधीं मन मुंडा० या चालीवर ]

येई कवि-बाला । भेटाया रसिकाला

इन्दु वितरि तिज रुचिर कांति निज, उदधि रत्नमाला
सुगंध अर्पी फुलें सुगंधित, मारुत दावि पथाला

तिच्या सभोंतीं वसंत अपुल्या पसरि वैभवाला
मंजुळ मंजुळ विहंग कूजनिं गाती कीर्तिगुणाला

तेजें न्हाणी अरुण, शारदा नेसवि वसनाला
रजनी लावी तीट कपोलीं, श्री कुंकुमतिलकाला

सुरनदिनें निज निर्मलतेनें भरिलें ओटीला
सिंचन केलें सुधासखीनें प्रतिपदिं माधुर्याला

परमेशाचें ललित हास्य मुखिं करी नर्तनाला
अंबेची चैतन्य वैखरी ओठावरि करि लीला

वीणेवरि कर छेडुनि नादवि ब्रह्मनिनादाला
अणुरेणूंमधिं ठाव आपुला भासवि ब्रह्मांडाला

तदंतरीं कवि-हृदय खेळवी प्राणज्योतीला
चित्र जणूं रेखीव देखुनी प्रसन्न ब्रह्मा झाला

कुतूहलानें कौतुकतेचें कौतुक व्हायाला
अवनितलावर अवतरली ही द्याया आनंदाला

## ९२

# अभिनंदन

[ माझे स्नेही रा. नारायण केशव बेहरे यांनीं " सन १८५७ "
हें पुस्तक लिहून लेखणी सार्थ केली याबद्दल नानांचें
जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे. ]

करचरणांना बांधुनि टाकी दास्य–शृंखला ती
परसत्तेचे सदैव लटके खड्ग शिरावरती

तरी जयानें मना आपुल्या स्वतंत्र ठेवियलें
इतुकेंच न त्या स्वातंत्र्याचें तेज प्रकटविलें

ज्या कथनाचा परसत्तेचे बृहस्पती भाट
अजवरि जगता विकृतरूपीं दाविति चित्रपट

मनांत असुनी देशभक्त वा इतिहास–ज्ञानी
जया कथाया, उच्चाराया धरिती भीति मनीं

अखेरची स्वातंत्र्य–रण–कथा ती स्व-भारताची
सत्य कथन करि निर्भय चित्तें, धन्य माय त्याची

अतीव कपटी, क्रूर, खलात्मा या परसत्तेचा
स्वजनां दाखवि दुरी सारुनी पडदा दृष्टीचा

कर्मगतीनें दास होय तो जरि परसत्तेचा
स्वार्थापायीं तरी करी नच विघात देशाचा

इमान राखी, कृतज्ञ राही स्वीय जन्मभूशीं
अशा स्थितींतही सार्थ आपुल्या केलें जननासी

मुक्त असो वा असो बंधनीं जीव कोणताही
दृढ निष्ठेला अडवुं शकेना सत्ता कसलीही

स्व-जन दास, आदर्श त्यापुढें ठेवी निज कृतिचा
खरा भूषिला, खरा शोभला पुत्र भारताचा
तशांत मग तो 'माझा नाना' विनती तुज देवा
अशिच घडूं दे त्याच्याकरवीं सतत देशसेवा

९३

## सदा मंगलम्

[ श्लोक ]

गौरीचा हृदयेश शंभु विलसे वा शंभुची पार्वती
जोत्स्नेला जगिं चन्द्रमा नटवितो चंद्रास वा कौमुदी
किंवा खेळतसे कवींत कविता वा काव्यिं खेळे कवि
शोभो तेंवि जगांत हे वरवधू-कुर्यात् सदा मंगलम्

श्रीकृष्णा वसुदेवदेवकिसती जन्मास कीं घालिती
जन्मोनी शिवभूप दे अमरता जीजाशहाजीप्रति
किंवा उद्धरिलें कुलास अपुल्या त्या बालगंगाधरें
लाभो पुत्र तसाच या वधुवरा-कुर्यात् सदा मंगलम्

लोकेशा करुणाकरा गुणनिधे दामोदरा माधवा
घेशी तूं कृतिनें सुमंगलपदा, वाटे अशां मानवां
तैसे हे जगिं बोलवो वरवधू सर्वामुखीं मंगल
दे आशीर्वच हें तयां, विनवितों-कुर्यात् सदा मंगलम्

९४

# जयोस्तु तिलकस्य

[ भैरवी—केहरवा ]

श्री तिलकाचा विजय असो

हिन्दभूमिच्या त्या फकिराचा
त्या फकिराच्या देशभक्तिचा
त्या भक्तीच्या उज्ज्वलतेचा
विजय असो तो विजय असो

परवशतेच्या निविड तमांतुनि
चैतन्याचा दीप उजळुनी
मार्ग दावि जो पुढतिं होउनी
त्या तिलकाचा विजय असो

परसत्तेच्या तीक्ष्ण कट्यारी
त्याहुनि दुर्मति स्वजन विषारी
भंवतीं असतां मुळिं न भय धरी
त्या तिलकाचा विजय असो

दुर्धर येती आपदा शिरीं
तरि न डगमगे कुण्या अवसरीं
धैर्याचा जो जणूं हिमगिरी
त्या तिलकाचा विजय असो

परिस्थितीला दास बनविलें
निज मनिषेपरि तिला वळविलें
वळवुनि ज्यानें करिं नाचविलें
त्या तिलकाचा विजय असो

धनसुतदारा–सुखा त्यागिलें
निज देशाच्या हिता वाहिलें
त्यापायीं जीवना वाहिलें
त्या तिलकाचा विजय असो

बृहस्पतीसम बुद्धि जयाची
ज्ञानसंपदा श्रीव्यासाची
तशी चतुरता श्रीकृष्णाची
त्या तिलकाचा विजय असो

होइल केव्हां स्वतंत्र भारत
हेंची चिंतन, ध्यास जयाप्रत
‘ राम ’ अंतिंचा ‘ स्वतंत्र भारत ’
त्या तिलकाचा विजय असो

९५

# चंद्रग्रहण

[ वागेसरी–झंपा ]

गुणी दुर्गुणी । राहो कुणी
सुत सारिखे गे । तुझिया ठिकाणीं

दुजा भाव तेथें । धरावा जगानें
तुझा स्नेहपान्हा । परि स्नेह जाणें

गुणा दुर्गुणांना । सुख शांति घ्याया
तुझी माउलीची । जगीं एक छाया

जिथें स्वार्थ नाहीं । जिथें किंतु नाहीं
जिथें प्रेममाया । अशी एक आई

जसा सूर्य राही । तसा चन्द्रमाही
तुला सारिखेची । तुझे पुत्र दोन्हीं

अशा भिन्नभावा । तुवां कां धरावें
कळेना मुळीं तें । धरे ! लोकमाये

करी त्याग माता । जगीं ज्या मुलाचा
तया कोण धाता । वृथा जन्म त्याचा

रवी घेशि पोटीं । सुधांशूस पाठीं
दिसे गे अशी ही । तुझी बुद्धि खोटी

तिरस्कारभोगा । भोगावयातें
समस्ता जगाच्या । तया पात्र केलें

९६

# शेवटचें मागणें

[ अजि अकुर हा० या चालीवर ]

कां बघसि असा शून्यदृष्टिनें बाळा
ह्या पुढल्या प्रासादाला
तुज वाटेना कांहिंच का पाहोनी
पोटिंचें न हाले पाणी ?
तुज ठावें का कोण नांदलें येथें
कथिलें वा कुणि न तयातें
प्रासादशिरीं ध्वज तो विभवश्रीचा
फडकला इथें कवणाचा
जरि तुजला ठावें असतें
तरि शून्यदृष्टिनें त्यातें
देखिता न कधिंही वाटे
बघतांच तुझी वृत्ति दिसति बावरली
क्रोधाची चढती लाली

बेभानपणें ओठ चावुनी अपुला
घालिता हात खड्गाला
रे वेगाच्या तुझिया चरणाघातीं
ही भूमी कंपित होती
निज वीर्यमदें छाति बाहु फुरफुरुनी
बोलती प्रतिज्ञा वाणी

"जो नागवि विभवश्रीला
ध्वज ज्यानें पदिं तुडवीला
प्रासाद कलंकित केला
त्या अधमाच्या करिन छेद कंठाचा
घे तरिच घोट पाण्याचा '

जो साच धनी दावुनि त्या विश्वास
लाविला गळा गळफांस
तद्रमणीला पाहि कराया भ्रष्ट
रिपु नीच खलात्मा नष्ट
त्या क्षणिंच दुरी करुनि अंकिंच्या बाळा
करि सती प्राणत्यागाला
सुत एकुलता वेल्हाळ
उगवता भानु तेजाळ
या विभवश्रीचा लाल
अजि तोचि इथें प्रासादाच्या द्वारीं
राहि उभा दीन भिकारी

तो बीजांकुर अंकुरींच खुडण्याला
रिपु पळवि तेथुनी त्याला
पण धरणीवरि कुठें तरी तो सजिव
ही निश्चल मम जाणीव
येईल इथें कधिं तरि तो या ठायीं
हा भाव हृदयिं दृढ राही

तो राजस देवदयेनें
देखियला मम दृष्टीनें
त्या कपोलिंच्या चिन्हानें
तो तूंच मुला ! माझ्या प्राणा ! असती
रे समाधान हृदयासी

गत जन्मींचें भाग्य फळाला आलें
साफल्य जिवाचें झालें
यासाठिंच मी जिवंत राही अजुनी
डोळ्यांतिल पिउनी पाणी
टक लावुनिया मुखाकडे माझीया
कां बघसी ऐसा राया
मी धूळ तुझ्या जननीच्या पायाची
जी राशी प्रासादाची
नयनिं ये प्राण या घडिला
मागणें एक अंताला
दे इतुकें म्हातारीला
निज बाहुबलें मिळवी प्रासादाला
भूषवी स्वराज्यकुलाला

[ श्रीकृष्णार्पणमस्तु ]

# आमचा देश

[ बँडच्या चालीवर ]

हा भरतखंड आमुचा
गंगादि पूज्य देवता
हिमवंत जलधि भूषिता
जो देह साच आमुचा
हा भरतखंड आमुचा

सौंदर्यसार प्रीतिचें
आनंदधाम शांतिचें
जो जीव साच आमुचा
हा भरतखंड आमुचा

अह्मि जेथ जन्म पावतो
हा पिंडब्रह्म पोशितो
जो प्राण साच आमुचा
हा भरतखंड आमुचा

यशगौरवा तयाचिया
जगिं वाढवूं झटोनिया
जो श्वास साच आमुचा
हा भरतखंड आमुचा

त्याच्याचसाठिं कीं जगूं
त्याच्याचसाठिं कीं मरूं
जो देव साच आमुचा
हा भरतखंड आमुचा

—वन्देमातरम्—

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. 20242
REFBK-0020242